
शनिवार । १४ जुलै १९७९
७५ पैसे

# माणूस



देवराज अरस

## कोण म्हणतो यांनी बंड वगैरे केले ?

देवराज अरस यांची राहणी पूर्वीपासूनच राजेशाही आहे. त्यांची विचारसरणीही १५ जून १९७९ पर्यंत राजेशाहीला साजेशी अशीच होती. १५ जूनला त्यांनी एकदम घुमजाव केले आणि सर्व देशाचे लक्ष आपल्याकडे वेधून घेण्यात ते यशस्वी झाले. गेली आठ–दहा वर्षे ते इंदिरा गांधींबरोबर होते. इंदिरा लाटेवर स्वार होऊन त्यांनी कर्नाटकात सत्ता हस्तगत केली. इंदिरा गांधींची आणीबाणीची काळी राजवटही त्यांनी आपल्या राज्यात उत्साहाने राबवली. लॉरेन्स फर्नांडिस किंवा स्नेहलता रेड्डी ही प्रकरणे या काळात त्यांच्याच राज्यात घडली. याच काळात संजय गांधीचे राजपुत्रानेही हेवा करावा असे स्वागत करण्यात त्यांनी कसलाही संकोच मानला नाही. आणीबाणी संपली. इंदिरा गांधी पडद्याआड गेल्या. त्यांना पुन्हा राजकीय मंचावर आणण्यात पुढाकार घेतला तो त्यांनीच. दिल्लीच्या कर्नाटक भवनात डिनर डिप्लोमसीचे चेंडू त्यांनीच उडवलेले नव्हते का ? पुढे कॉंग्रेस फुटली. इंदिरा कॉंग्रेसची स्थापना करण्यात अरस यांचा सिंहाचा वाटा नव्हता असे कुणी म्हणू शकेल का ? चिकमंगळूरचा किल्ला इंदिरा गांधींना कुणी सर करून दिला ? इंदिरा गांधींच्या व त्यांच्या आणीबाणीतील सहकाऱ्यांच्या चौकशीसाठी अस्तित्वात आलेल्या विशेष न्यायालयांना अरस यांनी सुरुवातीस विरोध केला. इतकेच नाही तर बंगलोर–कर्नाटकात यासाठी आंदोलनही घडू दिले. चरणसिंगांनी इंदिरा गांधींना अटक केली तेव्हा बंगलोर केवढे उसळले होते ? महाराष्ट्रात सांगली–पुणे–नागपूर उसळले त्याहूनही अधिक. इतकी निष्ठा इंदिरा चरणी अर्पण केलेल्या,

त्यांचे सर्व चढउतार जवळून पाहिलेल्या, त्यात सहभागी झालेल्या अरस यांना इंदिरा गांधी हुकुमशहा आहेत, त्यांच्या मुलाचे त्यांच्यावर वर्चस्व आहे, तो अरेराव आणि धुडगुस घालणारा आहे, त्याचे वाढते वर्चस्व देशाला आणि पक्षाला धोकादायक आहे, हे सर्व कळत का नव्हते? हे सर्व कळत आणि दिसत असूनही त्यांनी संजयसकट इंदिरा गांधींच्या राजकीय पुनरागमनासाठी सर्व आटापिटा कालपरवापर्यंत अगदी हिरीरीने चालवलाच होता. इंदिरा संजय हुकुमशाही वृत्तीचे, घराण्याची सत्ता स्थापन करू पाहणारे आहेत हे गृहीत धरू. पण अरस यांना या गोष्टीचे वावडे आहे हे कसे मान्य करायचे? त्यांनी कर्नाटकात आजवर काय वेगळे केले आहे? अरस यांना मुलगा नाही हे खरे; पण ती उणीव जावयाने भरून काढलेली आहे. भाऊही मागे नाही. ग्रोव्हर कमिशनने हा सगळा घराणेदार मामला शब्दबद्ध करून ठेवलेला आहे. इंदिरा काँग्रेसच्या स्थापनेपासूनच कर्नाटक प्रदेश काँग्रेस समितीचे अध्यक्षपद आणि मुख्यमंत्रीपद स्वतःकडेच ठेवणाऱ्या अरस यांच्या लोकशाही प्रेमाविषयी काय बोलावे? जे जे इंदिरा गांधींनी दिल्लीला केले ते ते सर्व आपल्या राज्यात स्वतः करणाऱ्या, त्यांच्या राजकारणात, त्यातील भ्रष्टाचारात, त्यातील हुकुमशाही प्रवृत्तीत आकंठ बुडालेल्या अरस यांनी एकाएकी हे राजकारण, हा भ्रष्टाचार, ही प्रवृत्ती सोडून द्यावी, हुकुमशाहीविरुद्ध एकदम हाकाटी सुरू करावी, लोकशाहीची पताका खांद्यावर घ्यावी, जी काँग्रेस आपणच दोनदा मोडली ती एकसंध करण्याचा संकल्प सोडावा, हा सगळा काय प्रकार आहे? गोंधळवून टाकणारा हा सर्व प्रकार असला तरी अगदीच न कळण्यासारखा मात्र नाही. हें घुमजाव करणे त्यांना परिस्थितीने भागच पाडले. त्यामुळे त्यांच्यासमोर शूरपणा दाखवण्याशिवाय, लोकशाहीचा राग आळवण्याशिवाय दुसरा मार्ग नव्हता. कोण म्हणतो त्यांनी बंड वगैरे केले? त्यांच्यावर मर्दुमकी लादली गेलेली आहे. समजा १५ जूनला त्यांची हकालपट्टी झाली नसती तर त्यांनी काय केले असते? हकालपट्टी झाल्यावर त्यांनी चपळाईने हालचाली केल्या, देशाचे लक्ष वेधून घेणारा मेळावा बंगलोर येथे संघटित करण्यात व कर्नाटकात आपण कर्तुमकर्तुम आहोत हे दाखवून देण्यात यश मिळवले हे खरे आहे; पण ही प्रतिक्रिया झाली. इंदिरा गांधींनी हल्ला केलाच नसता, पहिली गोळी झाडली नसती, कर्नाटक प्रदेश काँग्रेस समितीचे अध्यक्षपद त्यांच्याकडून हिसकावून घेतले नसते तर अरस यांनी लोकशाही दिंडीत एकदम मुसंडी मारण्याची घाई केलीच असती, असे त्यांच्या गेल्या दहा वर्षांतील कारकीर्दीवरून तरी कुणी म्हणू शकणार नाही. घाई केली, लोकशाहीची पताका त्यांनी फडकावली, काँग्रेसऐक्याची झालर या पताकेला जोडून दिली हा सगळा त्यांच्या राजकीय कौशल्याचा भाग झाला. सवालाला जबाब त्यांनी चोख व चांगला दिला; पण मूळ सवालच काय होता? संजय गांधी वाकुल्या दाखवतो, अरेरावीने वागतो हा मूळ सवाल होता.

¤

मूळ सवाल हा नाही. मूळ सवाल आहे विरोधी पक्ष कसा उभा करायचा, यासाठी कोणती रणनीती अवलंबायची याबद्दलचा. ७७ मार्चमध्ये काँग्रेसचा दारुण पराभव झाला. तीस वर्षे सत्तेवर राहिलेल्या काँग्रेसला विरोधी पक्ष म्हणून जेमतेम स्थान उरले. हे स्थान टिकवून धरणे, अधिक बळकट करणे हाच पुन्हा सत्ताधारी होण्याचा राजमार्ग होता. या राजमार्गावरून जाण्याऐवजी काँग्रेसच्या नेतृत्वाने काय केले? राज्यकर्त्यांशी, जनता पक्षाशी संगनमत करून इंदिरा गांधींना अलग पाडणे, त्यांचे अस्तित्व पुसून टाकणे एवढाच उद्योग हाती घेतला. राष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीपासून खास न्यायालयांच्या विधेयकापर्यंत गेल्या दोन-अडीच


## साप्ताहिक माणूस

वर्ष : एकोणिसावे
अंक : सातवा
१४ जुलै १९७९
किंमत : ७५ पैसे

संपादक
श्री. ग. माजगावकर

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी :
चाळीस रुपये



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.



राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे, येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

साप्ताहिक माणूस
१०२५ सदाशिव, पुणे ३०. दूरध्वनी : ४४ ३४५९

वर्षांत काँग्रेस-नेतृत्वाने जनता पक्षाला, राज्यकर्त्यांना आव्हान असे दिलेच नाही. राज्यकर्ता पक्ष म्हणून जनता पक्ष हा शत्रू क्रमांक एक ठरवण्याऐवजी इंदिरा गांधी शत्रू क्रमांक एक ठरवण्यात आल्या व काँग्रेस नेतृत्वाची सगळी शक्ती त्यांना नामोहरम करण्यात खर्ची पडली. याउलट इंदिरा गांधींनी आपले मोर्चे बांधले व विरोधी पक्ष म्हणून जनमानसात स्थान पक्के करण्यावर त्यांनी प्रथमपासून भर दिला. बेलचीला त्या कशासाठी गेल्या होत्या ? त्या सत्तेवर असताना अत्याचार होत नव्हते असे नाही. हे अत्याचार कोण करतो, त्यामागील सामाजिक, आर्थिक किंवा राजकीय कारणे कोणती या सर्व गोष्टींची त्यांना कल्पना नव्हती असे नाही; पण जनता पक्षाला विरोध करायचा, पर्यायी पक्ष म्हणून उभे राहायचे तर दलितांची बाजू घेऊन वर उसळी मारणे याशिवाय त्या वेळी दुसरा आशेचा किरणच त्यांना उपलब्ध नव्हता. इतर कोणताही वर्ग, समाजघटक त्यांना जवळ येऊ द्यायलाही तयार नव्हता. म्हणून त्या बेलचीला धावल्या. जनता पक्षावर हत्यार उपसायला त्यांना यामुळे एक संधी मिळाली. त्यांच्या घणाघाती, एकतर्फी प्रचारामुळे लोकांना खरेच असे वाटू लागले की, जनता राजवट आल्यापासून हरिजनांवर, दलितांवर अत्याचार वाढले. वास्तविक हे मुळीच खरे नव्हते व नाही. अगदी बिहारातही पूर्वी हे सर्व घडतच होते. दक्षिणेत, अगदी अरस यांच्या कर्नाटकातही आजसुद्धा अत्याचार घडतच आहेत; पण तरीही दलितांची सहानुभूती इंदिरा गांधींना लाभली व जनता पक्षाला बचावात्मक पवित्रा घेणे भाग पडू लागले. असे विरोधाचे एकेक मुद्दे शोधून, त्या आधारे जनमत संघटित करण्याऐवजी प्रस्थापित काँग्रेस नेतृत्वाने इंदिरा हटावला प्राधान्य दिले, यासाठी सत्ताधाऱ्यांशीही हातमिळवणी केली. परिणाम असा झाला की, हे प्रस्थापित नेतृत्व दरबारी राजकारणात अधिकाधिक गुरफटत गेले व जनता पक्षाला जाणवावा, लोकांनी मानावा असा प्रखर विरोध फक्त इंदिरा गांधींच्या नावावरच जमा होत राहिला. संपूर्ण भुईसपाट झालेला काँग्रेस पक्ष केवळ दरबारी राजकारण खेळून वर आणण्याचा प्रस्थापित नेतृत्वाचा प्रयत्न आणि असंतोष संघटित करून, विरोध अधिकाधिक कडवा आणि प्रखर करून हे कार्य साधण्याचा इंदिरा गांधींचा आग्रह, या दोन परस्परविरोधी भूमिकांमुळे काँग्रेस पुन्हा फुटली व इंदिरा गांधींनी स्वतंत्र पक्ष स्थापन केला. स्वतःला राजकीय मृत्यूपासून वाचवणे हा यात उद्देश नव्हता, नसेलच असे नाही. तेवढा स्वार्थ राजकारणात प्रत्येकालाच असतो; पण तो मुख्य उद्देश काँग्रेसफुटीमागे नव्हता. मुख्य उद्देश जनता पक्ष खिळखिळा करणे, समर्थ आणि एकमेव विरोधी पक्ष म्हणून काँग्रेसची प्रतिमा जनमानसात खडी करणे हा होता. या प्रयत्नात, या उद्दिष्टसाधनेत त्या कितपत यशस्वी ठरतात न ठरतात हा भाग अगदी अलाहिदा आहे. त्यांना यशस्वी ठरू द्यावे किंवा नाही हाही तीव्र मतभेदाचा मुद्दा ठरू शकतो. प्रश्न आहे त्यांच्या हालचालींमागील सूत्र काय आहे हे ओळखण्याचा, त्यांची रणनीती समजून घेण्याचा. अरस यांच्यासारखा एवढा मोठा मोहरा सध्याच्या अडचणीच्या काळात त्यांनी उगाच गमावलेला नाही. एक राज्य आज त्यांच्या हातातून गेले. कशासाठी त्यांनी एवढी किंमत मोजली असावी ? केवळ संजयच्या मायेपोटी, हे उत्तर पुरेसे नाही. अरस जनता पक्षाशी जरूरीपेक्षा जास्त जवळीक साधू पहात होते. साटेलोटे सुरू झालेले होते. हा मुळावरच घाव होता म्हणून इंदिरा गांधींनी त्यांना गोळी घातली. गोळीमुळे हा म्हैसूरचा वाघ आता चवताळला व त्याने दिल्लीवर झडप घालण्याचा आक्रमक पवित्रा घेतला हे रीतसरच झाले. शेवटी ही लढाई आहे. वाघ कोसळतो का शिकारीच संपतो याबद्दल अंदाज कोणीच आज बांधू शकत नाही; पण संजयने वाकुल्या दाखवल्या म्हणून हे सर्व घडत आहे यावर विश्वास ठेवणे कठीण आहे. हा हुकुमशाही विरुद्ध लोकशाही असा लढा आहे यावरही विश्वास ठेवणे कठीण आहे. अरस जरी उद्या दिल्ली काबीज करून पंतप्रधान झाले तरी इंदिरा गांधींपेक्षा मूलतः वेगळी राजवट ते आणू शकतात का, लोकशाही त्यांच्या हाती तरी सुरक्षित राहणार आहे का, हा खरा प्रश्न आहे आणि अरस यांचे पूर्वचरित्र पाहता आज तरी याचे उत्तर नकारार्थीच द्यावे लागेल. मग भले त्यांच्या तथाकथित बंडाचे कोणी कसेही स्वागत करो. जनता नेत्यांनी यामुळे हुरळून जाणे, अरस यांचेसाठी पायघड्या घालणे हा तर उतावीळपणाचा, अदूरदर्शीपणाचा कहरच ठरेल.

—श्री. ग. मा.

सप्रेम नमस्कार....

# ' बजाजमधील गोळीबाराच्या निमित्ताने '

◻ ' बजाजमधील गोळीबाराच्या निमित्ताने ' हा लेख उब्दोधक आहे, तसा त्यातील माहितीच्या रूपाने मन विषण्ण करणारा आहे. श्री. देवस्थळे यांनी या लेखात जी माहिती जमा केली आहे ती खरोखरीच तशी असल्यास त्यावर सर्वच असत्ताधारी संघटनांनी व त्यांच्या कार्यकर्त्यांनी संघटनात्मक विचार करून त्यावर एक कार्यक्रमही तयार केला पाहिजे· बजाज ऑटो हे एक उदाहरण समजले पाहिज.

कामगारांच्या प्रश्नामुळे कारखानदार, भांडवलदार बेचैन होतात व माणुसकीच्या दृष्टिकोनातून त्यांच्या समस्यांकडे ते पाहू शकत नाहीत ही सत्य गोष्ट आहे; इतकेच काय परंतु सामान्य दुकानदाराचीही त्याच्या नोकराबाबत हीच वृत्ति दिसून येते. यातून शिक्षणसंस्थाही सुटू शकत नाहीत. 'बड्या भांडवलदारांनी, सत्ताधाऱ्यांनी, चालकांनी व मालकांनी आपल्या हाताखालील नोकरांना फक्त राबवायचे व त्यांच्या पदरात ' काही तरी ' टाकावयाचे ही वृत्ति आता बदलणे अपरिहार्य आहे.

भांडल्याशिवाय काही मिळू शकत नाही हे सत्य वारंवार सिद्ध होत आहे. एकाच राष्ट्राचे नागरिक पोटापाण्यासाठी एकमेकांच्या जिवावर उठतात हा दैवदुर्विलास आहे. आपण एका विचारसरणीचे म्हणवून घेतो. राष्ट्रपतींपासून अगदी सामान्य नेत्यांपर्यन्त ऊर फुटेपर्यंत हा एकीचा उद्घोष या निमित्ताने ऐकविला जातो. नित्यात मात्र बेदिली, नाराजी, बेबंदशाहीच अनुभवास येते. काँग्रेस सरकारे जाऊन जनता सरकारे आली पण त्यात नावाव्यतिरिक्त सरकारात फरक नाही. देखावा आणि दुरावा यातील फरक सामान्य माणसाला देखील सहज समजू शकतो. 'वरं जनहितं ध्येयम्' 'क्रियेवीण वाचाळता...' इत्यादि सद्विचार राजकारणाच्या खुंटीवर बांधून ठेवले गेले असल्यामुळे सगळीकडे विचारांची झोटिंगशाही निर्भयतेच्या नावाखाली धुडगूस घालीत आहे. त्यातून बजाजऑटोसारखे उद्रेक बाहेर पडतात. पूर्वीच्या सरकारांनी आणीबाणीच्या नावाखाली जनतेची मुस्कटदाबी केली त्यातून निर्भयपणे बाहेर पडून आगेकूच नव्या सरकारने सुरू केली आहे. नव्या सरकारने सुरुवात चांगली केली, पण दोन वर्षांच्या कालावधीत ते बाभळीच्या काट्यासारखे पुढून टोचणारे आणि मागून पोचट दिसते. एक विचार, एक प्रणाली, एकजिनसीपणा, एकसंधता यांचे नावनिशाण कोठे राहिलेले दिसत नाही. सगळीकडे तुकड्यांचे राजकारण पक्ष, उपपक्ष, आघाडी यांचे पेव फुटल्यासारखे झाले आहे. शिक्षण, कामगार, आरोग्य, दारुबंदी, सीमावाद, प्रांतवाद, भाषावाद, पोलिसदल इत्यादि सर्वच गोष्टी एकराष्ट्रीयत्वाच्या भूमिकेतून दुरावल्या गेल्या आहेत. कोणी, कोठे, काय, किती व का बोलावे याचा ताळही नाही व तंत्रही उरले नाही.

कामगारसंघटनांची वर्षानुवर्षे असणारी नेते मंडळी सुदैवाने सत्तारूढ झाली, एक नवा कायापालट झाला. काही दिलासा मिळेल अशी आशा होती, पण युतिआघाडीचे राजकारण खेळूनही कामगारांच्या न्याय्य हक्कांना अग्रस्थान दिले जात नाही. अशा या पार्श्वभूमीवर बजाजऑटोची घटना काय सुचविते ?

कामगारसंघटनांनी आता एकत्र आले पाहिजे. आतापर्यन्त त्यांनी दिलेले लढे एकांगी स्वरूपाचे होते. त्यात त्यांनी यशही मिळविले, परंतु प्रयत्न व फल यांचे प्रमाण व्यस्त दिसते. कामगारलढ्याची मुख्य साधने म्हणजे संप, मोर्चा, धरणे, टूल डाऊन, गो स्लो, घेराव व तत्सम होत. या साधनांनी काही गोष्टी काही प्रमाणात साध्य होतात, पण त्या सर्वकाली उपयुक्त ठरतीलच असे नाही. वाटाघाटी, लवाद, शिष्टमंडळ, चौकशी कमिशन हा दुसरा मार्ग. पहिल्या साधनांचा उपयोग केल्यानंतर या मार्गाने जावे लागते. या दुसऱ्या मार्गाने काही गोष्टी साध्य झाल्या तरी काही सोडून द्याव्या लागतात. त्यामुळे मूळ मागण्यांसाठी पुन्हा पुन्हा लढे द्यावे लागतात.

पुन्हा पुन्हा लढे देण्यामध्ये जसे फायदे आहेत तसे तोटेही आहेत. वारंवार संपादी शस्त्रे वापरून हळूहळू प्रमाणात जरी मागण्या मिळत जात असल्या तरी त्यात शक्ती फार वाया जाते. ती शक्ती तीन प्रकारची असू शकते. एक म्हणजे सांघिक शक्ती, दुसरी वैयक्तिक शारीरिक शक्ती व तिसरी वैयक्तिक मनोशक्ती.

कामगारसंघटनांमधील कामगार हे याचे सभासद असतात. सभासदांची संख्या हे संघटनेचे सामर्थ्य. वारंवार लढे देऊन पदरी फार थोडे पडत आहे असे दिसल्यावर कामगारांची संघटनेबद्दलची आस्था कमी होते. संघटनेच्या पुढारी मंडळींचे कारखानदारावर वजन पडत नाही, मालक संपफोडू धोरण अवलंबतात इत्यादि नाना प्रश्न उभे राहतात. सर्व कामगार सभासदांना एके ठिकाणी आणण्यास संघटना प्रभावी उपाय योजण्यास असमर्थ ठरते. त्यात या संघटनेपेक्षा ती संघटना चांगली आहे असाही प्रचार–अपप्रचार होतो. त्याचाही अनिष्ट परिणाम होतोच. अशा परिस्थितीत मिळतील ते सभासद घेऊन लढ्याचे काम चालवावे लागते व शेवटी निराशाच पदरी पडते.

कामगारसंघटना निरनिराळ्या पक्षांच्या आहेत. त्या त्या संघटना आमच्याच पक्षाच्या धोरणाने कामगारांना न्याय मिळवून देईल अशी ध्येयधोरणे हिरीरीने पुढे मांडतात. ध्येयनिष्ठ पुढारी पक्षाची धुरा सांभाळतात. त्यातून पक्षबळ वाढते; परंतु एका पक्षाचे बळ सर्वांगीण असू शकत नाही. काही उणेपणा राहातो. या उणेपणामुळेच बऱ्याच प्रसंगी संघटनांना माघार घ्यावी लागते.

सर्व पक्षांच्या संघटनांचे उद्दिष्ट कामगारांचे कल्याण साधणे हे आहे. उद्दिष्ट एक आहे, समान आहे. फलश्रुती मात्र नाममात्रच. अर्थात् तीस वर्षांच्या कालखंडात कामगारांची शेकडो गाऱ्हाणी सुटली आहेत हे खरे; पण मुळातले प्रश्न कायम आहेत. पगारवाढ, बोनस, रजा, पाळणाघर, प्रसूतिरजा इत्यादि सवलती प्राप्त करून देणे ही कार्ये निरनिराळ्या संघटनांनी प्राप्त करून दिलीत

हे खरे आहे; पण त्याने प्रश्न सुटत नाही. भाववाढ, महागाईवाढ, पगारवाढ हे दुष्ट चक्र आहे. यातून राज्यकर्ते अद्यापपर्यंत यशस्वी वाटचाल करू शकले नाहीत. निश्चित धोरण व निश्चित योजना आकारू शकत नाहीत.

**श्री. आ. मांडके**

### खुलासा

'बजाजमधील गोळीबाराच्या निमित्ताने' हा लेख 'माणूस' प्रतिनिधीने लिहिलेला आहे. त्याखालील 'सुभजय'वरील लेख सरिता देवस्थळे यांचा आहे.

---

## स्वातंत्र्यवीर सावरकर अध्यासन निधि-पूर्तता समिति

# विनम्र आवाहन

---

सप्रेम नमस्कार, वि. वि.

भारताच्या संरक्षणसिद्धतेची स्वातंत्र्यवीर सावरकर यांची तळमळ आणि प्रयत्न सर्वांना ज्ञात आहेत. सामान्य नागरिकांनाही संरक्षण-व्यवस्थेची जाण असावी म्हणून युद्धाभ्यासाची व्यवस्था विद्यापीठ पातळीवरून केली जावी असे प्रयत्न ठिकठिकाणी त्यांच्याच प्रेरणेने सुरू झाले. त्यानुसार पुणे विद्यापीठात कै. मे. ज. परांजपे यांच्या नेतृत्वाने १९६३ साली 'डिफेन्स स्टडीज' हा विभागही सुरू झाला. त्याच विभागात 'सावरकर युद्धाभ्यास अध्यासन' निर्माण करण्याची योजना करण्यात आली. २ लाख ४० हजार रुपये जमा झाल्यास तसे अध्यासन सुरू करण्यास पुणे विद्यापीठानेही मान्यता दिली.

या कार्यासाठी स्थापन झालेल्या त्या वेळच्या समितीने सुविख्यात गायिका लता मंगेशकर व संगीत-दिग्दर्शक सुधीर फडके यांच्या साहाय्याने १ सप्टेंबर १९६४ ला ८१ हजाराचा पहिला हप्ता विद्यापीठाचे स्वाधीन केला. पुढे अनेक अडचणींमुळे हे काम रेंगाळले. एका अर्थाने समितीही अस्तित्वात राहिली नाही. परंतु मूळ रकमेतील काही भर आणि आजवरचे तीवरील व्याज असे मिळून आता ही रक्कम पुणे विद्यापीठाकडे २ लाख ६५ हजारपर्यंत जमा झाली आहे.

दरम्यान १५ वर्षांचे काळात सर्वच खर्च वाढल्याने संकल्पित रकमेत ३॥ लाखांपर्यंत वाढ होणे अपरिहार्य आहे असे विद्यापीठातर्फे मार्च १९७९ च्या विधिसभेत सांगण्यात आले. ही आवश्यक रक्कम सुमारे ८० हजारांपर्यंत आहे. ती जमा झाल्यास गेली १५ वर्षे रेंगाळत पडलेले युद्धाभ्यासाचे 'सावरकर-अध्यासन' पुणे विद्यापीठात विनाविलंब सुरू होण्यास काहीच अडचण राहणार नाही.

यासाठी आम्ही काही मंडळी प्रकट आवाहन करीत आहोत की, महाराष्ट्रातील उदार नागरिकांनी सहकार्य देऊन हा उर्वरित निधी पूर्ण करण्यास हातभार लावावा व सावरकरांचे अधुरे स्वप्न साकार करावे. या अध्यासनाला मिळणाऱ्या देणग्यांवर सेक्शन ८० जी अन्वये प्राप्तीकर माफ आहे.

मिळणाऱ्या देणगीची पावती दिली जाईल. तसेच देणगीदारांची नावे व हिशेब वृत्तपत्रांतून प्रसिद्ध केला जाईल. तरी आपली देणगी, सावरकर-अध्यासन, पुणे विद्यापीठ, पुणे ७, या नावे पुणे विद्यापीठाकडे अथवा श्री. वसंतराव गीत, टिळक रोड, सदाशिव पेठ, पुणे ३० या पत्यावर पाठवावी अशी विनंती आहे.

**डॉ. राम ताकवले**, कुलगुरु, पुणे विद्यापीठ
**श्री. ब. ना. भिडे**, वकील, पुणे
**श्री. मोहनराव गवंडी**, कार्याध्यक्ष, शिक्षण प्रसारक मंडळी, पुणे
**सौ. सुशीला पांडुरंग आठवले**, सदस्य, पुणे विद्यापीठ कार्यकारिणी
**श्री. गणपतराव नलावडे**, माजी महापौर, पुणे महानगर पालिका
**प्रा. स. वि. कुलकर्णी**, उपप्राचार्य, लॉ कॉलेज, विधिसभा सदस्य, पुणे
**श्री. मो. श. किवळकर**, व्यापारी व कारखानदार, पुणे
**श्री. म. ह. गोडबोले**, वकील, सांगली.
**श्री. पु. रा. वैद्य**, उपमुख्याध्यापक, पेठे हायस्कूल, नासिक
**श्री. अनंतराव देशपांडे**, इंजिनिअर, मुंबई
**श्री. वसंत प्रल्हाद गीत**, विधिसभा सदस्य, पुणे विद्यापीठ, (निमंत्रक)

□

---


### नवीन दाखल झालेली पुस्तके

1. **Pakistan's Islamic Bomb** – (Regional implications of Pak's nuclear capability) – Maj. Gen. D. K. Palit & PKS Namboodiri — Rs. 30/–
2. **City of the Dead** – (Medical novel) – Herbert Liberman — Rs. 21·15
3. **The Matarese Circle** – (Bestseller thriller) – Robert Ludium — Rs. 22/–
4. **The Island** – (Bestseller Novel) – Peter Benchley — Rs. 25/–
5. **Far Pavilions** – (Bestseller Novel) – M. M. Kaye
6. **Ashanti** – (A motion picture stoıy) – Vazquez-figueroa Alberto — Rs. 16·70
7. **The Last Convertible** – (Bestseller Novel) – Anton Myrer — Rs. 22/–
8. **प्रतापी बाजीराव** – (चरित्र) – म. श्री. दीक्षित — रु. ३०/–
9. **बदनसीब** – (बहादूरशहाची शोकात्म कहाणी) – प्रतिभा रानडे — रु. १६/–

**आमच्या दीर्घ मुदतीच्या वर्गण्या भरून कमी वर्गणीत उत्तम पुस्तके वाचा.**

**फिनिक्स लायब्ररी, ७२७ सदाशिव पेठ, पुणे ३०**

संध्याकाळचे पुणे । दि. बा. मोकाशी

# साखरेचे खाणार....

मला त्यांच्या मंडळात बोलण्याचे बोलावणे देताना सेक्रेटरी श्री. रामभाऊ जोशी म्हणाले की, येथे साखरेवाचून कोणताही विषय वर्ज आहे.

मला त्यांच्या सांगण्याची मोठी गंमत वाटली. कारण ज्या मंडळीसमोर बोलावयाचे ती साखरउद्योगातीलच तंत्रज्ञ मंडळी होती. निवृत्तीनंतर या उद्योगातील एकेक तंत्रज्ञ पुणे येथे स्थायिक होऊ लागला. त्यांची संख्या वाढली. हे निवृत्त तंत्रज्ञ सहज गप्पासप्पांसाठी डेक्कन शुगर टेक्नॉलॉजिस्ट असोसिएशनच्या वास्तूत येऊ लागले व त्यातून महिन्यातून एकदा जमण्याची व त्या वेळी बाहेरच्या कुणाचे तरी भाषण ठेवण्याची कल्पना निघाली. या उपक्रमात बोलण्यासाठी मी गेलो व मला ही असोसिशन, ही निवृत्त मंडळी, सारे आवडले. 'संध्याकाळच्या पुण्यात' हे घ्यावे असे ठरवले, पण माझेच बोलणे मी सांगणे अप्रस्तुत म्हणून माझे मित्र श्री. वि. ग. कानिटकर यांना जेव्हा सेक्रेटरी रामभाऊ जोशी यांनी बोलण्यास बोलावले तेव्हा स्वतःसाठी निमंत्रण बोलावून घेऊन मीही गेलो. वि. ग. कानिटकर यांनी बोलण्याचा विषय दिला होता. 'सरकारी नोकरांच्या जीवनातील हसू आणि आसू.' त्यांनी आरंभ केला, 'तारुण्य हे सहजसुंदर असतं, पण सुंदर वृद्धत्व मात्र कमवावं लागतं. ही तुमची वृद्धसभा सुंदर आहे. कर्तबगार वृद्ध सुंदर दिसतात' अशी सुरुवात करून कानिटकर म्हणाले, 'आपल्या मध्यमवर्गात पिढीजात कारकुनी असते. आजोबा कारकून, बाप कारकून, मुलगा कारकून. कुटुंबात सर्व कारकूनच. ज्याला कारकुनी जमायची नाही तोच डॉक्टर किंवा इंजिनिअर व्हावयाचा. एकेका चाळीत चार चार जोशी व तीन तीन आपटे असावयाचे. सर्व कारकून. ते ओळखू येण्यास कस्टम जोशी, जीआयपी जोशी, पोस्टे जोशी अशी नावे ठेवली जात.'

□

आम्ही असोशिएशनच्या इमारतीच्या वरच्या हॉलमध्ये व्याख्यानाला बसलो होतो. ही इमारत आकाशवाणीवरून, शिवाजीनगर एस. टी. स्थानक उजव्या हातास ठेवून पुढे गेल्यावर आकाशवाणीच्या हाताने सातवी आठवी असावी. जिना चढून वर जाताच आपण हॉलमध्ये उभे राहतो. हा जिना चढत असता आपणास साखरेविषयी काय माहिती आहे याचा मी विचार करीत होतो. १) साखर गोड असते २) ती पारदर्शक पांढरी असते. ३) 'मुंगी साखरेचा रवा' म्हणून तुकारामांनी साखरेचा उल्लेख केलेला आहे. ४) साखरेचा भाव कधी स्थिर नसतो. ५) जाड साखर जास्त गोड असते ६) वेगवेगळ्या साखरलॉबी महाराष्ट्राचे राजकारण हाकतात. या माझ्या माहितीपैकी काही बरोबर ठरली तर काही चूक ठरली, ते पुढे येईलच.

हॉल दोनशेएक खुर्ची मावेल एवढा मोठा होता. समोरच्या भिंतीशी एक खुर्ची-टेबल-त्यासमोर एका हातास तीसएक व दुसऱ्या हातास तीसएक खुर्च्या मांडलेल्या. जिन्यातून वर येताच डाव्या हातास एक पुतळा आहे. आपणास साखरेबद्दल किती कमी माहिती असते हे या पुतळ्याने दाखवून दिले. हा पुतळा महाजन नावाच्या गृहस्थांचा होता. हे गृहस्थ लो. टिळक यांचे भाचे होते. आपल्या मामाप्रमाणे, त्यांना राष्ट्रसेवा करावयाची होती, पण उद्योगधंदे शिकणे व वाढविणे हीही देशसेवा आहे असे मामाने पटवून दिल्यावर ते बेलापूर शुगर फॅक्टरीत फार्ममॅनेजर झाले. ही फॅक्टरी ब्रिटिश मालकीची होती. तिला ब्रॅडी कंपनी म्हणत. १९२५:२६ साली निघालेली ही कंपनी बुडणारच होती. कारण जेवढ्या किमतीचा ऊस निघे तेवढाच तो काढण्याचा खर्च येई. तेव्हा महाजन यांनी जावा येथे जाऊन नव्या जातीचा ऊस आणला व ३२।३३ साली कंपनी सावरली. या उसामुळे एकरी ३०।४० टन ऊस निघू लागला. साखरकारखान्यात उसावर सत्तर टक्के खर्च होतो तर तीस टक्के खर्च साखर तयार होईपर्यंत होतो. ब्रॅडने दाखविले की स्वतःचा ऊस लावून फायदा होतो. त्याच वेळी सरकारने साखरेची आयात बंद केली. तेहतीस-चौतीसमध्ये सासवड माळी साखरकारखाना निघाला.

हा इतिहास सेक्रेटरी रामभाऊ जोशी यांनी सांगितला. त्यांचे सहसभासद श्री. वैद्य म्हणाले, अन्नधान्य वाढावे यासाठी ब्रिटिशसरकारने नीरा, प्रवरा वगैरेवर धरणे बांधली; पण धान्याच्या पिकासाठी कालव्याचे पाणी विकत घेणे शेतकऱ्यांना परवडत नव्हते. सरकारने ४।५ वर्षे वाट पाहिली. धरणांचे काय करावे हे सरकारला कळेना. काही उद्योगपतींनी (ब्रॅडी, डहाणूकर, वालचंद, जोसेफ के) यांनी हे फुकट जाणारे पाणी आपणास कॅश क्रॉपसाठी द्यावे अशी सरकारला विनंती केली. तेव्हा अमुक टक्के अन्नधान्य व अमुक टक्के कॅशक्रॉप काढावे या अटीवर सरकारने त्यांना पाणी देण्यास मंजुरी दिली. १९३३–३४ या दरम्यान आज दिसत असलेले एकूणएक खाजगी साखर कारखाने निघाले. आपटे – मफतलाल, माळीनगर, फलटण, वालचंद, श्रीपूर, बेलवंडी, महाराष्ट्र शुगर, रावळगाव, कोल्हापूर वगैरे. यांची कपॅसिटी तशी फारच कमी होती. म्हणजे ४०० ते ५०० टन होती.

श्री. वैद्य म्हणाले, साखर आणि ऊस-उत्पादन यांचे तंत्र तेव्हा एवढे अवगत नव्हते. सर्वच चाचपडत होते. पुढे काही वर्षे साखर-उद्योग तोटयात होता. १९४० मध्ये तर त्यांच्यावर लिलावात निघण्याची वेळ आली. साखरउद्योग लोंबकळत चालला होता. अठ्ठेचाळीस साली रेशनिंग उठवले व साखरेचा भाव आठ आण्यांचा रुपया केला. त्याआधी शेतकऱ्यास एक टन उसाला पंचवीस रुपये मिळत. उसाचे उत्पन्न एकरी जास्तीत जास्त वीस टन होते आणि बहुतेक शेतकरी एक एकरवालेच होते म्हणजे त्याला वर्षास जेमतेम पाचशे रुपये मिळत. साखरेचा भाव रुपया झाल्यावर त्याला टनी चाळीस रुपये मिळू लागले. हळूहळू परिस्थिती सुधारू लागली. महाराष्ट्रातील साखरउद्योग पहिल्यापासून प्रगत वृत्तीचा, नवे नवे प्रयोग करणे,

नवीन यंत्रे आणणे, त्यांनी जुनी यंत्रे बदलली तसेच उसावर प्रयोग करून उसातील साखर ९°/० पासून १४°/० वर नेली. साखरकारखाने गर्तेतून बाहेर आले. याच सुमारास म्हणजे १९५० साली साखरेच्या उद्योगात सहकारी क्षेत्राचा उदय झाला.

¤

एकूण साखरेची गोष्ट मोठी रोमँटिक वाटते.ती पुढेही रोमँटिकच राहील यात संशय नाही. कारण साखरेने फार संघर्ष निर्माण केले. त्यातला एक संघर्ष साखरकारखाने उत्तम चालू लागल्यावर, १९५० च्या आधी मला पाहवयास मिळाला. मला वाटते मी तेव्हा पंढरपुराहून मोटारीने येत होतो. कुठे तरी पन्नाशीच्या सुमाराचे दोन शेतकरी आमच्या गाडीत चढले. त्यातला एकाचा फेटा रेशमी होता, हातात दोन दोन आंगठ्या होत्या. कोटही रेशमी होता. दुसऱ्या शेतकऱ्याने साधे सुती मुंडासे बांधले होते. काहीसा फाटका अंगरखा व धोतर असा त्याचा पोषाख होता. रेशमी पटका घातलेला शेतकरी प्रत्येक गावी स्टँडवर मोटार उभी राहताच चहा मागवी, केळी किंवा इतर वस्तू घेई व त्याचे चार-आठआणे देताना दरवेळी खिशांतून नोटांचे बचकभर जाड पुडके काढी व ते उलगडून त्यातली एक रुपयाची नोट काढून चहावाल्यास किंवा फळवाल्यास देई. त्याचे हे नोटांचे पुडके काढणे सर्वांच्या ध्यानात आले होते. दुसरा गरीब शेतकरी आमच्याप्रमाणे त्याच्याकडे पहात होता; पण ते पहाणे तिटकाऱ्याचे होते. चवथ्या वेळेस जेव्हा पुडके बाहेर आले तेव्हा तो ओरडला, ‘साल्या! ठेव ते खिशात. कितीदा दाखवशील!’ तेव्हा पुडकेवाला म्हणाला, ‘लेका! काय, चोरून आणलाय– का ठेवीन खिशात?’ दोघांच्या बोलण्यावरून दोघांचा चांगला परिचय होता हे कळत होते. पहिला म्हणाला, ‘चोरून आणले नाहीस तर पिळून आणलेस.’ दुसऱ्यानं विचारलं, ‘कुणाला पिळले सांग तर खरं?’ पहिला म्हणाला, ‘आम्हाला पिळलं.’ मग आमच्याकडे वळून म्हणाला, ‘आमच्या जमिनी यांनी कवडीमोलानं खंडानं लिहून घेतल्या. आता आम्ही उपाशी मरतो आहोत आणि त्या जमिनींच्या जोरावर हे सोन्याच्या अंगठ्या घालत्यात, रेशमी पटके बांधत्यात नि नोटा उडवत्यात!’ दुसरा म्हणाला, ‘हे पहा! उगाच काही तरी सांगत जाऊ नको. तुला जमिनी कवडीमोलानं, मक्त्यानं द्यायला कुणी सांगितल्या? का दिल्यास तू? अरे, आम्ही जेव्हा तुम्हाला शंभर रुपये एकरी देऊ केले तेव्हा तुम्ही उडच; मारीत ‘माझी घ्या माझी घ्या.’ म्हणत आलात. पिकत काय होतं तुमच्या जमिनीत? दगड. वाटेल तेवढ्या वर्षांचा करार करायला तुम्ही तयार होता. तुम्हाला वाटत होतं आम्ही मूर्ख बावळट आहोत; पण आम्ही माळी आहोत. आम्हाला जमीन द्या. आम्ही फुलवून सोडतो. जमिनी मिळाल्या, आम्ही विहिरी खणल्या, कॅनालचे पाणी घेतले, ऊस लावला. आता एकरी पाच हजार मिळवू–दहा हजार मिळवू. एक साखर कारखाना काढला– दुसरा काढू. तुम्ही हवं तेवढं बोंबला!’ पहिला म्हणाला, ‘बोंबलू कशाला? आम्ही कोर्टात खेचणार आहोत तुम्हाला. त्यासाठीच पुण्याला चाललोय मी.’ दुसरा म्हणाला, ‘कोर्टात जाऊन फुकट मराल!’

त्या दोघातला संवाद आठवल्यावर तो संवाद खाजगी साखरकारखान्यांच्या काळात उत्पन्न झालेला संघर्ष दाखवीत होता हे आता कळते. पुढे सहकारी साखर कारखाने झाल्यावर या संघर्षाची तऱ्हा बदलली.

¤

व्याख्यानात वि. ग. कानिटकर यांनी भिडे नावाच्या त्यांच्या ऑफिसमधील कारकुनाची हकिगत सांगितली. स्वातंत्र्य मिळाले आणि कारकून देशभक्त झाले. ते म्हणाले, भिडे हा सानेगुरुजींचा कुणी नातलगही होता. फाळणी झाल्यावर पाकिस्तानात जाण्यासाठी नाव नोंदवणारांत भिडे यांनीही नाव दिले. बाकीचे नाव दिलेले अर्थात मुसलमान होते. भिडे यांचे म्हणणे पाकिस्तानी आपले भाऊ आहेत. ते अननुभवी आहेत. त्यांचे बस्तान नीट बसविण्यासाठी आपण गेले पाहिजे. भिडे त्याप्रमाणे खरोखरच गेला. तिथे नोकरीवर रुजू झाला; पण कुणी त्याची वळकटी ठेवून घेईना. त्याची हमी घेतलेला मुसलमान मित्र ऑफिसमोर हिंदूचा खून झाल्यावर घाबरला. भिडेस त्याने कराची सोडण्यास सांगितले. अंगावरच्या कपड्यांनिशी भिडे बंदरावर आला. पोटात अन्न नव्हते. एका सिंधी हिंदु माणसाने बोटीची पुष्कळ तिकिटे काढून ठेवली होती. एक भिडेला दिले. भिडे परत आला. ब्राह्मणसभेने उघडलेल्या निर्वासित छावणीत तो आला. तो वाळला होता, आवाज खोल गेला होता.त्याला ऑफिसने पुन्हा नोकरीवर घेतला, पण तेव्हा आणि नंतरही आपण पाकिस्तानला गलो ही चूक केली हे त्याने कधी कबूल केले नाही.

सांगण्याच्या खास शैलीमुळे कानिटकर श्रोत्यांत खसखस पिकवीत होते. एकीकडे भिडे यांची कीव येत होती तर दुसरीकडे हसू येत होतं.

साखरेबद्दल तिथे ‘काही बोलावयाचे नसल्याने’ मी कानिटकरांच्या व्याख्यानापूर्वी काही दिवस आधी रामभाऊ जोशी यांच्याशी बोललो व कानिटकर यांच्या व्याख्यानानंतर श्री. वैद्य यांच्याशी बोललो. या दोघांशी बोलल्यामुळे साखरउद्योगाच्या इतिहासाचा आढावा मला घेता येत आहे. कित्येकांना या उद्योगाची कल्पना नसल्यानं मला कळल्या तशा काही नव्या गोष्टी कळतील. मला वाटतं, आपल्या शहरातील लोकांच्या साखरउद्योगाबद्दल काही बऱ्या किंवा वाईटच समजुती आहेत. आता पंचवीस वर्षानंतर आपण पुन्हा त्या तपासल्या पाहिजेत या टेक्नॉलॉजिस्ट लोकांना पाहून मला हे विशेष वाटू लागलं आहे. साखर कारखाना म्हटल्यावर आपल्या मनात जे येते ते मला त्यांच्या बोलण्या–वागण्यात, विचारात कुठेही दिसले नाही. एका उपयोगी व चांगल्या उद्योगाची भरभराट होण्यास आपलं आयुष्य गेलं हीच त्यांची भावना दिसली.

¤

श्री. वैद्य म्हणाले, शुगर टेक्नॉलॉजीचे तीन भाग आहेत. शेती, एंजिनिअरिंग, शुगर मॅन्युफॅक्चरिंग. या तीनही शाखांचे लोक असोसिएशनमध्ये आहेत. रामभाऊ जोशी म्हणाले, या असोसिएशनचा मूळ उद्देश तांत्रिक ज्ञानाबद्दल पेपर लिहावयाचे. त्यातून शास्त्राची प्रगती घडून धंद्याचीही प्रगती घडावी. पहिल्या अधिवेशनाची सुरुवात रावळगाव फॅक्टरीतील चीफ केमिस्ट श्री. गोडबोले होते त्यांनी केली. सेहेचाळीसपासून नियमितपणा आला. आजपर्यंत छत्तीस–सदतीस अधिवेशने झाली. इमारत होईपर्यंत अधिवेशने वेगळ्या फॅक्टरीत भरत. मग

पुण्यास भरू लागली. फॅक्टऱ्यांकडून सभासदत्वाचे वर्षास हजार रुपये व वैयक्तिक सभासदाकडून दहा रुपये घेतो.

सहकारी साखर कारखान्यांचा उदय १९५० पासून धरायला हवा. त्यामागे धनंजयराव गाडगीळ होते. तेव्हा लोणी येथे (प्रवरानगर) सहकारी पतपेढी होती. तेथे कर्जवाटप होई. ऊस लावण्यास पैसे दिले जात व गुळात वसुली असे; पण गुळाचा भाव फार कमी होई. कारण व्यापारी तेजीमंदी करीत. आपल्या मालाचा कंट्रोल शेतकऱ्याच्या हातात नव्हता. विखेपाटील यांना याची आच लागली. शेतकरी नेहमी कर्जातच रहावा का ? धनंजयराव गाडगीळ व काकडे यांनी विखेपाटील यांना तयार केले ते म्हणाले, 'उसावर तुमच्या पेढीकडून तुम्ही कर्ज देताच, आता अशीच एक योजना तयार करून साखर कारखाना काढू. साखर वर्षभर टिकू शकते, साठा करता येतो. गूळ वाईट होतो म्हणून लगेच काढावा लागतो. व्यापारी त्याचा फायदा घेतात.' त्या वेळी जीवराज मेहता मंत्री होते. त्यांना विचार करून योजना सुचवली. हे सर्व शेतकरी आहेत. या शेतकऱ्यांनी कारखान्याला ऊस द्यावा व कारखान्याने साखर काढावी, शेतकऱ्याने कारखान्याचा एक शेअर घेतला तर एक एकर ऊस घातला पाहिजे, ही अट अशासाठी होती की, गुळाला भाव येतोय असं दिसलं की, शेतकरी गुळाला ऊस देईल हे विखेपाटलांना ठाऊक होते. जशी शेतकऱ्याला त्यांनी अट घातली तसे कारखान्यांवरही बंधन घातले.

'छप्पन्न-सत्तावन्न साली हा कारखाना सुरू होऊन यशस्वी झाला. तेव्हा महाराष्ट्रातील सगळीकडचा शेतकरी खडबडून जागा झाला. शेतकऱ्यांनी शेतकऱ्याचा कारखाना चालविला हे यश अपूर्व होते. आपला माल तो आपण विकणार हेही अपूर्व होते. अडाणी शेतकऱ्यांनी साखर कारखाना यशस्वी करावा हे तर त्याहून अपूर्व होते. सर्वत्र शेतकऱ्यातला आत्मविश्वास जागा झाला. खाजगी क्षेत्रात तंत्रज्ञ व जाणकर ते कारखाने चालवितात तसेच तंत्रज्ञ व जाणकार यांच्या सहकार्याने साखर कारखाने निघतील हा विश्वास पटून, जिथे तिथे भागभांडवल गोळा करण्यास सुरुवात झाली. तेव्हा एक कोटी वीस लाख रुपये कारखाना काढण्यास लागत. पैकी शेतकरी पंचवीस लाख गोळा करीत. सरकार पंचवीस लाख देई. इंडस्ट्रियल फायनान्स कार्पोरेशन साठ लाखांचे लोन देई व उरलेले बँक देई. तेव्हा एक जॉईंट रजिस्ट्रार नेमला गेला. श्री. कसबेकर या जागी नेमले गेले. ते फार सिन्सिअर होते. प्रत्येक मीटिंगला येत. त्यांचे वजनही फार होते. ते कुणाचे कुठे अडू देत नसत. त्या वेळी असे पंधरा साखरकारखाने उभे राहिले. कारखान्यांच्या परिसरातला सगळा रागरंग बदलून गेला.

□

'बदली म्हटली की कारकुनाच्या पोटात गोळा येतो. जिथे बदली व्हावयाची तिथे घर मिळत नाही. शिक्षणाची गैरसोय होते. बदली झाली की, तो बहुधा खाली मान घालून गैरसोयी सहन करितो.' कानिटकर कारकुनाच्या बदलीतील हसू-आसू सांगत होते. 'बहुतेक कारकून कुरकुरत बदली स्वीकारतात; पण एखादा देसाईसारखा निघतो. या देसायाची बदली केली मुंबईस. तो महाचक्रम होता. त्याला वाटलं की, तो साहेबाची जीपसुद्धा घेऊन जावयाचा. बदली होताच सर्वजण तो काय करणार हे पाहू लागले. तो जाणार नाही म्हणे; पण कसा? जाण्याची वेळ आली तेव्हा त्याने मुंबईच्या ऑफिसला तार केली. 'अकरा मुले व बायको यांसह येतो आहे. ऑफिसच्या वऱ्हांड्यात राहू.' ही तार गेली आणि दुसऱ्या दिवशी तारेने त्याची बदली कॅन्सल झाली.

वैद्य म्हणाले, 'भारतामध्ये गोड खाण्यात साखर व गूळ असे दोन पदार्थ वापरले जातात. आपण गुळाची पक्वान्ने करतो, भाजीत गूळ घालतो. लाडू, श्रीखंड, चहा अशा पुष्कळ ठिकाणी साखर वापरली जाते. दुर्दैव हे की, साखरेवर कंट्रोल आहे, गुळावर नाही. साखरकारखाने झाल्यावर गुळाला ऊस कमी पडू लागला. तेव्हा गुळाचे उत्पादन घटून गुळाचा भाव वाढू लागला. गुळाचे भाव वाढताच शेतकरी वचने मोडून गुळाकडे वळू लागले. सबंध साखरउद्योग धोक्यात आला. १९६६ मधे ही परिस्थिती ओढवली. ती भयानकच होती. पंचवीस लाख टनांची गरज असता एकंदर भारताचे उत्पादन १५ लाख टनच झाले. तेव्हा सरकारने अतिशय विचार करून पार्शल डी कंट्रोलचे धोरण घेतले, साठ टक्के साखर लेव्हीत व चाळीस टक्के फ्री विकायची अशी सवलत मिळाली. त्यानंतर उसाला साठ रुपये भाव होता तो १८० पर्यंत मिळू लागला. आपणास दोनशेपर्यंत भाव मिळणार असे शेतकरी धरून चालू लागला. शेतकऱ्याजवळ खूप पैसा आला व चैनबाजी वाढली. तेव्हा कारखान्यांनी टनामागे ५० रुपये डिपॉझिट ठेवून घ्यायला सुरुवात केली; पण दुसऱ्या वर्षी ती परिस्थिती बदलली. प्रॉडक्शन वाढले व दोनशेचा भाव शेतकऱ्यास सव्वाशे मिळू लागला!'

मी वैद्यांना विचारले की, सहकारी साखर कारखान्यांच्या लॉबी राजकारणाचे अड्डे झाले आहेत, कुणी सत्तेवर यावयाचं ते तिथं ठरतं असं म्हणतात. वैद्य म्हणाले,' राजकारणात उसाचा काही संबंध नाही. निदान सहकारी कारखान्याच्या पैशांतून कुणाला निवडणूकीसाठी पैसे मिळणं शक्य नाही. तेथे पैपैचा हिशेब असतो व जाब विचारावयास प्रत्येक शेअरहोल्डर डोळ्यांत तेल घालून असतो. राजकारण—निवडणुकी यासाठी पैसे कुणाला मिळाले असतील तर त्याचे सोर्सेस निराळे असतात. सांगली, बारामती, नगर, नाशिक वगैरे ठिकाणी जिथे जिथे ज्या माणसांच्या कर्तृत्वाने साखरकारखाने झाले, ती ती माणसं लोकांची अहोरात्र कामं करणारी होती. सांगलीचे वसंतदादा. त्यांचं राजकारणात काय झालं याचं सोडून द्या; पण मी त्यांना ते कुणी मोठे नसतापासून पाहिले आहे. काही वर्षे त्यांच्या निकट होतो. ही माणसं रात्री बारा वाजता कुणी हाक मारली तरी धावून येतील. मंत्री नसताना रोज चारशे—पाचशे माणूस त्यांना भेटावयास येई. अशी माणसं त्या वेळी सर्वत्र झाली. शेतकऱ्यांना ऊस लावावयास तयार करणे सोपे नव्हते. अगदी नवे पीक घ्यायला शेतकरी तयार नसतो. कारखाना काढला की ऊस नाही म्हणून एकही दिवस बुडवून चालत नाही. सांगली कारखान्यास ऊस नव्हता. वसंतदादांनी दहा लाख टन ऊस शेतकऱ्यांना भेटून, पटवून उभा केला. ठिकठिकाणी असे मिरॅकल करणारी वसंतदादांसारखी माणसं तेव्हा निघाली. मी तर म्हणेन की, पूर्वीच्या खाजगी साखरकारखान्यांचे मालक राजकारणावर जास्त

प्रभुत्व ठेवीत. फक्त तिकडे कुणी लक्ष दिलं नाही. खरं सांगायचं म्हणजे राष्ट्राच्या दृष्टीनं पाहिलं तर साखरकारखान्यांची लिमिट थोडी. त्यांच्याबद्दल गैरसमज पसरावे याचं वाईट वाटतं.'

मी साखरेच्या भावाबद्दल विचारलं तेंव्हा ते म्हणाले, साखरेचे प्रांतिकच्या हाती कांहीं नसते हे लोकांना कळत नाही. सर्व सेंट्रलच्या हातांत असते. साखरेचे भाव वाढण्यास आपण लोकच कारण होतो. कंट्रोलरेटच्यावर साखरेचा दाणा घ्यावयाचा नाही, असे आपण ठरविले तर भाव वाढवणार नाहीत. सत्तर टक्के साखर कंट्रोलरेटची असते, ती लेव्हीची असते. तीस टक्के साखरकारखानदारांना मोकळी असते. ही तीस टक्के साखर ओपन टेंडर काढून व्यापाऱ्यांना दिली जाते. भाव वाढतो तो या साखरेचा. ती कमीत कमी घ्यावयाची असे ठरवले तर भाव वाढणार नाहीत.

" महाराष्ट्रातील साखरकारखान्यांना, यु. पी. च्या बाबतीत सेंट्रलची जी पार्सिलिटी आहे त्याचा त्रास आहे. आज आपल्या फॅक्टरीज मॉडर्न आहेत, तर यु. पी. बिहारमधील आउटडेटेड आहेत. हे कारखाने डबघाईस आले म्हणुन फूडकार्पोरेशनकडून त्यांना दोन-पंचाहत्तर भाव मिळतो व आपल्या साखरेस दोन-पंधरा मिळतो. यु. पी चे कारखाने चालावे म्हणून आपण ही सबसिडीच देतो. हे सगळं राजकारण वरून चालतं. त्यासाठी आपल्या साखरवाल्यांनी खूप तडफड केली; पण काही चालू शकत नाही.'

◻

साखरेशिवाय काहीही बोला. येथे साखरेचे बोलायचे नाही ही इथे बोलण्यात आम्हाला अट का घातली ते आम्हाला कळले. आयुष्यभर साखरेचे प्रश्न, साखरेच्या लोकांचे प्रश्न ते ऐकत आले होते. त्यामुळेच आत्ता कानिटकरांचे व्याख्यान त्यांना लहानशी मेजवानी होती. त्यांच्या ऑफिसमधील एक जण नेहमी डायरी ठेवायचा. साहेबाने केव्हा बोलावले, साहेब काय म्हणाला, मग आपण काय म्हणालो. त्याची डायरी लिहिणे सर्व ऑफिसात झाले होते. सर्वांना तो डायरीत काय लिहितो याचे कुतहूल होते. साहेबांनाही. एकदा साहेब त्याला ' गाढव ' म्हणाले. तेही त्याने डायरींत टिपले. साहेबाने त्याला परत बोलावून विचारले ' काय टिपता ?' तो गप्प राहिला. साहेबानं पुन्हा रागावून विचारले. " बोला, काय टिपता ?" तो म्हणाला, ' साहेब ! गाढवं बोलत नाहीत !'

◻

खाजगी व सहकारी साखरकारखान्यांची श्री. वैद्य यांनी चांगली तुलना केली. ते म्हणाले, " खाजगी कारखान्यांत मॅनेजमेंट स्थिर असते. पंचवीस – तीस वर्षे कामे करून टक्केटोणपे खाऊन मॅनेजमेंट शहाणी झालेली असते. तिला जाण असते. सहकारीत स्थिर मॅनेजमेंट नसते. दर पाच वर्षांनी नवी माणसे येतात. नवी बॉडी येते. त्यांची धोरणे वेगळी. ही बॉडी आपली माणसे पुढे आणते. ऑफिस असेल त्यांची माणसे. इथे मॅनेजिंग डायरेक्टर भावले असते. चेअरमनची खरी सत्ता. मॅनेजिंग डायरेक्टरचा होल्ड नसल्यामुळे कामात गलथानपणा व शिस्त कमी. खाजगी कारखान्यांत लांबची माणसे असतात. सहकारीत लोकल माणसे ठेवतात. त्यांचे अर्धे लक्ष शेतीकडे व घराकडे व अर्धे कारखान्यांत असते. ऑपरेटिव्ह लेव्हलला ही माणसं असली तर शिस्त राहत नाही.

' खाजगी किंवा सहकारी कोठल्याही कारखान्यात गुण न पाहता, भाचे, पुतणे, भाऊ, पाहुणे यांची नेमणूक होऊ लागली की, कारखान्याची धूळधाण होते. सासवड माळी साखर कारखान्यावर तो प्रसंग आला होता; पण हरिभाऊ गिरमे यांनी चांगले लोक नेमून तो सावरला. '

मी श्री. वैद्यांना साखर कारखान्यातील आयुष्याबद्दल विचारले. ते म्हणाले, ' मुलांच्या शिक्षणाची गैरसोय होते व मुलांना दूर ठेवले की धास्ती व दुःखही असते. मुलींच्या वरसंशोधनाचाही त्रास होतो. काही फॅक्टरींची गावे तर अंदमानासारखी वाटतात; पण हळूहळू तिथे सामाजिक जीवन उभे होते. म्हणजे आपणच उभे केले की होते. माळीनगरला आम्ही तसे वातावरण उभे केले. वेळ लागला. कुणाला काय येताय, कशात रस आहे हे कळल्यावर माणसं एकत्र येऊ लागली. बॅडमिंटन सुरू केले. मॅनेजर खेळायला येऊ लागले. गायनवादनाचे लोक एकत्र आले. बागायतदारांची मुले येऊन भाग घेऊ लागली. हरिभाऊ गिरमे म्हणाले, ' तुम्हाला लागेल ते सहकार्य मिळेल. या पोरांना खेळतं ठेवा !' नंतर महिलांनीही महिलामंडळे काढली. '

माझ्या प्रश्नांपैकी बारीक साखर अधिक गोड की जाड साखर अधिक गोड हा खुलासा करून घेण्यास मी विसरलो. त्यांच्याशी बोलणे संपवून बाहेर पडल्यावर माझ्या लक्षात आले तेव्हा मी दुसरीकडून तो खुलासा करवून घेतला. मला सांगण्यात आले की, दोन्ही साखरा सारख्याच गोड असतात. जाडा साखऱ्या फुकट जात नाही. बारीक साखऱ्या सांडतो, उडतो व फुकट जातो.

◻

संध्याकाळ संपत आली. कानिटकरांचे व्याख्यानही संपत आले. त्यांनी समारोप चांगला केला व एका छान गोष्टीने तोंडे आणखी हसती केली. ते म्हणाले, ' कारकूनपेशातील वेगवेगळ्या व्यक्ती मी आपणापुढे मांडल्या. त्या मला समजल्या तशाच होत्या की वेगळ्या होत्या हे कोण सांगणार ? मी त्यांच्याविषयी जे सांगितले ते त्यांना कळले तर कदाचित पटणार नाही. ते खरेही असेल. कारण लेखकाला आपल्या मुलाकडेसुद्धा मुलगा म्हणून पहाता येत नाही. त्याला कळते ती व्यक्ती त्याच्यापुरती तशी असते. आता कारकुनी जीवनातला एक छोटासा किस्सा सांगून मी माझे व्याख्यान संपवतो. कारकुनी जीवनात सर्वांत कठीण गोष्ट असेल तर ऑफिसकडून प्रवासाचा भत्ता मिळायची. बिल पास करणारा त्यात लहानसहान खुसपटे काढतो. एकदा एकाने असेच प्रवासीभत्त्याचे बिल पाठवले. त्याचे पेमेंट अडले. कारण हा कारकून जिथून आला त्या गावाचे अंतर त्याने दोनशेपाच मैल दिले होते तर ऑफिसचे म्हणणे हे अंतर दोनशे मैल आहे. तो कारकून खेपा घालून कंटाळला. मधे काही दिवस गेले आणि एक भले मोठे पार्सल ऑफिसला आले. शिपायांनी खोके फोडले. सर्व ऑफिस तिथे जमा झाले. खोके फोडल्यावर त्यात एक मैलाचा दगड व त्याला बांधलेले पाकिट निघाले. त्या पाकिटात त्या कारकुनाचे पत्र होते-मी दोनशेपाच मैल अंतर लिहिले त्याचा आपणास संशय आला. पुरावा म्हणून हा मैलाचा दगड धाडला आहे. त्यावरून २०५ मैल अंतर आहे हे कळेल. कृपा करून हा दगड परत होता त्या जागी लावण्याची व्यवस्था करावी.'

व्याख्यान संपवून कानिटकर खाली बसत असता श्रोत्यांचे चेहरे हसून साखरेसारखे गोड झाले होते. ◻

# काँग्रेस
## बंगलोरमार्गाने दिल्ली
वा. दा. रानडे

इंदिरा काँग्रेसमधून बाहेर पडल्यावर कर्नाटकचे मुख्यमंत्री देवराज अरस यांनी पुढाकार घेऊन ४ जुलैस बोलावलेल्या काँग्रेस जनांच्या मेळाव्याने काय साधले? या प्रयत्नातून देशात तिसरा प्रभावी पर्यायी पक्ष निर्माण होण्याची खरोखर कितपत शक्यता आहे? नव्या-जुन्या सर्व काँग्रेसवाल्यांनी एकत्र येऊन पूर्वीसारखा जोरदार काँग्रेस पक्ष पुनः निर्माण करावा हे काही काँग्रेस नेत्यांनी उरी बाळगलेले स्वप्न यातून कितपत साकार होईल? राजकीय पक्षांच्या फेरमांडणीची काही निश्चित दिशा त्यातून सूचित होत आहे का? या प्रश्नांच्या अनुरोधाने बंगलोर मेळाव्याचा विचार करायला हवा.

पुढच्या निवडणुकांत म्हणजे १९८२ मध्ये सत्ता हाती घेण्याइतके काँग्रेसचे बळ वाढविणे हा या प्रयत्नांचा मुख्य उद्देश आहे. हा बंगलोरमार्ग आपणास दिल्लीला नेईल असे काँग्रेसनेत्यांना वाटते. काही जनतानेते भासवितात तसा हा फुसका बार नव्हे, तसेच फार मोठी पर्यायी शक्ती त्यातून निर्माण होणार आहे असे मानणेही चुकीचे होईल. या प्रयत्नाला काय प्रतिसाद मिळतो हे येत्या काही महिन्यांत स्पष्ट होईल व त्यानंतरच त्याच्या सामर्थ्यासंबंधी अधिक अचूक अंदाज बांधता येतील.

इंदिरा गटाला वगळून काँग्रेसची पुनर्बांधणी हे बंगलोर मेळाव्याचे महत्त्वाचे उद्दिष्ट होते, त्याचा पहिला टप्पा म्हणून पार्लमेंटमध्ये काँग्रेस व अरसगटाचे खासदार एक पक्ष म्हणून काम करणार आहेत. अरसगटाचे खासदार काँग्रेसला मिळाल्याने लोकसभेत तोच सर्वांत मोठा पक्ष होत आहे आणि यशवंतराव चव्हाणांना विरोधी पक्षाचे नेतेपद पुनः मिळत आहे. फूटपूर्व अखिल भारतीय काँग्रेस कमिटीची बैठक बोलावण्यात येणार आहे. पुनः पूर्वीची काँग्रेस निर्माण करावयाची तर त्या पक्षात दोन वेळा पडलेली फूट सांधायला हवी. तसेच त्यातून बाहेर पडलेले गट पुनः आत आणायला हवेत. १९७८ ची फूट सांधण्यावर प्रथम भर दिला जाणार आहे. ही फूट पूर्णपणे सांधणे शक्य नाही हे तर उघडच आहे. कारण इंदिरागटाला वगळावयाचे, त्याच्याशी ऐक्य तर नाहीच; पण सहकार्यही करावयाचे नाही हे ठाम ठरले आहे. इंदिरा काँग्रेसमधील जास्तीत जास्त लोक आपल्या बाजूला वळवून त्यांना एकटे पाडणे या दिशेने आता प्रयत्न व्हावयाचे आहेत. कर्नाटकात विधिमंडळ आणि प्रदेश काँग्रेस यातील बराच मोठा गट अरस यांना मिळाला आहे. इतर राज्यांत ही फुटीची लागण कितपत लागते हे येत्या काही महिन्यांत स्पष्ट होईल. कर्नाटकचा गड ढासळला याचे कारण तेथला गडकरीच फुटला. आंध्रमध्ये तसे घडेल असे दिसत नाही. माजी मुख्यमंत्री वेंगलराव यांचा गट अरस यांच्या बाजूला मिळाला आहे; पण त्याचा तेवढा प्रभाव नाही. केरळमध्ये एक गट अरस यांच्या बाजूचा आहे. महाराष्ट्रात तिरपुडे-गट फुटला. विदर्भ हा इंदिरा काँग्रेसचा बालेकिल्ला, त्यामुळे ढासळला आहे. पश्चिम बंगालमधील एक गट अरस यांच्या बाजूचा आहे. बाकी उत्तरेकडच्या इतर राज्यांत या फुटीला फारसा प्रतिसाद मिळेल असे दिसत नाही. निर्जीव व मृतप्राय झालेल्या काँग्रेसमध्ये अरसगट मिळाल्याने जीव आला आहे एवढे मात्र म्हणता येईल.

पण जनता पक्षाला आणि इंदिरा काँग्रेसला प्रभावी पर्यायी पक्ष यातून कितपत उभा राहील? इंदिरा काँग्रेसच्या संदर्भात याचा विचार करताना दोन प्रश्न उपस्थित होतात. इंदिरा गांधींच्या नेतृत्वाचे वलय किंवा प्रभाव लोपला आहे काय? स्वतःबद्दलचा पूर्वीचा आत्मविश्वास त्यांच्यामध्ये आता राहिलेला नाही हे तंजावरमध्ये त्यांनी घेतलेल्या माघारीवरून स्पष्ट झाले. सहकाऱ्यांचा सल्ला मानणे ही त्यांची प्रवृत्तीच नाही. एकदा मनाने घेतले ते करून टाकणार ही त्यांची वृत्ती. तंजावरमध्ये आपण निवडून येण्याची त्यांना स्वत.लाच खात्री वाटत नव्हती म्हणून त्या उभ्या राहिल्या नाहीत. खास न्यायालयाविरुद्ध देशभर मोठे आंदोलन उभारण्याचे त्यांनी ठरविले होते; पण त्यालाही फारसा प्रतिसाद मिळाला नाही. संजय चौकडीच्या प्रभावाखाली त्या गेल्या असून त्यातून त्यांचे निर्णय सारखे चुकत आहेत. दलित, हरिजन, आदिवासी, मुस्लिम व इतर अल्पसंख्य जमाती या वर्गांचा पाठिंबा त्यांना अजूनही आहे. इंदिरा गांधी आपल्याबद्दल दाखवीत असलेला कळवळा खरा नसून तो एक देखावा आहे हे या वर्गांना कळण्यासाठी थोडा काळ जावा लागेल. महाराष्ट्रातील जिल्हा परिषद निवडणुकांत त्यांच्या पक्षाने सर्वांत जास्त जागा मिळविल्या, तसेच पुणे महापालिकेच्या निवडणुकीत जनता पक्षाच्या बरोबरीने जागा इंदिरा काँग्रेसने मिळविल्या हे विसरून चालणार नाही. असे असले तरी इंदिरा नेतृत्वाबद्दल इंदिरा अनुयायांमध्येच भ्रमनिरास वाढत आहे, या वस्तुस्थितीकडेही दुर्लक्ष करून चालणार नाही; पण भ्रमनिरास झालेल्या गटांनी काँग्रेसमध्ये यावे असे काँग्रेसजवळ काय आहे? दलित, आदिवासी, अल्पसंख्यांक जमाती यांच्यामध्ये प्रत्यक्ष कार्य केल्याशिवाय त्यांचा पाठिंबा मिळणार नाही. काँग्रेसमध्ये असे कार्यकर्ते किती आहेत? निवडणुका जिंकून सत्तेवर येण्यासाठीच सगळ्यांची धडपड आहे. काँग्रेसचा १९७७ मध्ये पराभव का झाला? याचे खुले आत्मपरीक्षण दोन वर्षांनंतरही काँग्रेसनेत्यांनी केलेले नाही, नेहरू राजवटीपासूनच्या चुका सुधारल्या नाहीत. मग जनता त्यांच्यामागे कशी येणार? जनता पक्षाबद्दल जनतेत भ्रमनिरास वाढला हे खरे; पण म्हणून जनतेने पुन्हा काँग्रेसकडे वळावे असा विश्वास काँग्रेसने गेल्या दोन वर्षांतील आपल्या कार्याने निर्माण केलेला नाही आणि बंगलोर मेळाव्याने तो चमत्कार घडणार आहे असे मानण्याचे कारण नाही.

बंगलोर मेळाव्याच्या निर्णयाचे महाराष्ट्रातील काँग्रेसजनांवर काय परिणाम होतील? या निर्णयांनी शरद पवार गटाच्या समांतर काँग्रेसला अडचणीत टाकले असून वसंतरावदादा पाटील व वसंतराव नाईक यांना पुन्हा प्रतिष्ठा मिळवून दिली आहे. जनता पक्षाबरोबर सहकार्य करण्याच्या पवारगटाच्या भूमिकेला बंगलोरला पाठिंबा

पृष्ठ २० वर

पोलिसांनीही आपली जनतेशी असलेली वागणूक आमूलाग्र बदलली पाहिजे.

# पोलिसांचे आंदोलन व लोकशाही हक्क

डॉ. अनंत फडके

अनेक राज्यांमध्ये वणव्यासारखे पेटत गेलेले पोलिसांचे आंदोलन निदान सध्यापुरते तरी विझलेले दिसते; पण या आंदोलनाने आपल्या देशातील लोकशाही व पर्यायाने समाजाचा एकूण ढाचा याबद्दल जे महत्त्वाचे प्रश्न उभे केले आहेत ते जागरूक नागरिकांना अस्वस्थ करत राहतील.

पोलिसांच्या या आंदोलनाबाबत सरकारची अशी भूमिका आहे की, पोलिसांच्या कामाचे तास निश्चित ठरवणे, पगारवाढ मिळणे, साप्ताहिक सुटी व हक्काची रजा मिळणे, रहाण्यासाठी घरे बांधून मिळणे, इ. मागण्या रास्त आहेत,फार काळ दुर्लक्षिल्या गेल्या आहेत; पण युनियन बांधण्याचा हक्क मिळण्याची त्यांची मागणी मात्र मान्य करता येणार नाही. कारण तसे केल्यास कायदा आणि सुव्यवस्थाच धोक्यात येईल. तसेच आंदोलनात्मक मार्गाने पोलिसांनी आपल्या मागण्या मांडल्या आहेत याबद्दलही सरकारी गोटातून निषेध व्यक्त होत आहे. पोलिसांच्या मागण्या कितीही रास्त असल्या तरी त्यांचा युनियन बांधण्याचा, इतर कामगारांप्रमाणे आंदोलन करण्याचा हक्क मान्य करण्यात येऊ नये असे बहुतांश विचारवंतांचेही मत आहे. हा हक्क सैन्याबाबत लागू करण्याची नुसती कल्पनाही कित्येकांना सहन होत नाही.

असे का? सुमारे ९ लाख पोलिस व १० लाख सैन्य यांची मिळून जवळजवळ १९ लाख संख्या होते. समाजातील एका मोठ्या थराला संघटना बांधण्याचा, सामूहिक आंदोलन करण्याचा हक्क नाकारणाऱ्या समाजाला लोकशाही समाज म्हणता येईल का?

जनता सार्वभौम असते हे लोकशाहीचे मूलभूत तत्त्व आहे. म्हणजेच जीवनाच्या सर्व क्षेत्रांत **स्वतःच्या** हिताच्या दृष्टीने निर्भयपणे **निर्णय** घेण्याचा हक्क जनतेला असला पाहिजे हा लोकशाहीचा आशय आहे. हा आशय प्रत्यक्ष जीवनात उतरविण्यासाठी विचार, लेखन, आंदोलन, संघटनास्वातंत्र्य ह्यांची आवश्यकता असते. प्रस्थापित धोरणाविरुद्ध, सत्तेविरुद्ध आपली मते मांडायचा, तसेच स्वतःच्या हितासाठी संघटितरीत्या झगडण्याचा अधिकार नसला तर जनतेचे सार्वभौमत्व ही एक नुसती पोकळ अर्थहीन घोषणा बनते. जनता सार्वभौम असते हे तत्त्व फ्रेंच क्रांतीपासून आतापर्यंतच्या सर्व क्रांत्यांमध्ये अनेक वेळा मांडले गेले आहे व त्यासाठी झगडून, मोठे मोल देऊन जनतेने ते मान्य करवून घेतले आहे. मग हे सर्व मान्य तत्त्व पोलिस, सैन्य याबाबत का मान्य केले जात नाही?

पोलिसांचे मूलभूत लोकशाही हक्क नाकारताना मुख्य युक्तिवाद केला जातो तो हा, की कायदा व सुव्यवस्थेचे राज्य राखण्यासाठी असे करणे आवश्यक आहे. 'कायदा व सुव्यवस्था' यांचा सरकार काहीही अर्थ लावो पण सर्वसामान्य जनतेच्या दृष्टीने कायदा व सुव्यवस्थेची काय गरज असते? तर गुन्हेगारीपासून स्वतःचे जीवन सुरक्षित रहावे. आजचे पोलिसदल याबाबत कितपत कार्यक्षम व उपयोगी आहे ते प्रथम पाहिले पाहिजे.

## सरकार प्रामाणिक आहे काय?

आज पोलिस-दलावर जो प्रचंड खर्च होतो त्यामानाने सर्वसामान्य जनतेचे गुन्हेगारी, गुंडगिरीपासून संरक्षण करण्यात पोलिसदल फारसे यशस्वी झाले आहे असे म्हणता येणार नाही. ही अकार्यक्षमता का? कारण एक तर पोलिसदलावरील एकूण खर्चापैकी सुमारे तिसरा हिस्सा ज्यांच्यावर खर्च होतो अशा राज्य केंद्रीय राखीव पोलिस, बॉर्डर सिक्युरिटी फोर्स यांचा गुन्हेगारी आटोक्यात आणण्यात सहभाग नसतो. त्यामुळे जनतेच्या दृष्टीने त्यांच्यावरील खर्च हा संपत्तीचा अपव्यय आहे. उलट जनतेच्या चळवळी मोडून काढण्यासाठीच मुख्यतः ह्या दलांचा उपयोग केला जातो. मंत्री, राज्यपाल, राष्ट्रपती यांच्या संरक्षणासाठी गुंतून पडलेल्या पोलिसांची संख्या काही थोडी नसते. मंत्री जर खऱ्या अर्थाने जनतेचे पुढारी असतील तर त्यांच्या संरक्षणासाठी एवढ्या मोठ्या ताफ्याची गरज काय?

'कायदा व सुव्यवस्था धोक्यात येईल' असे सरकार म्हणत असते तेव्हा त्याचा खरा अर्थ काय असतो? तर जनतेला 'शिस्तीने', मुकाट्याने वागायला शिकवण्याचे एक हुकमी हत्यार बेभरंवशाचे होईल अशी भीती तर सरकार वेगळ्या शब्दात व्यक्त करत नसते ना? गुन्हेगारी वाढू नये असा जर सरकारचा मुख्य रोख असता तर राखीव पोलिसदलांवरील खर्च एवढा इतक्या वेगाने वाढला नसता. उपलब्ध सरकारी आकडेवारीवरून असे दिसते की, राखीव पोलिस-दलांवरील खर्च १९५०-५१ ते १९७८-७९ ह्या काळात ३ कोटी रु. वरून सुमारे २६० कोटी रु. पर्यंत म्हणजे ८५ पटींनी वाढला! सामान्य पोलिसांवरील खर्च मात्र ह्याच काळात ५३ कोटी रु. वरून सुमारे ५५५ कोटी रु. पर्यंत वाढला. तसेच जनतेला त्वरित न्याय मिळावा असे सरकारचा 'कायदा व सुव्यवस्था' या कल्पनेत अंतर्भूत असते तर आज अक्षरशः लाखो केसेस कोर्टात अनेक वर्षे पडून आहेत याबद्दल सरकारने काही खरोखर परिणामकारक उपाय योजले असते.

कायदा व सुव्यवस्थेबाबत सामान्य जनतेच्या दृष्टीने खरा प्रश्न उभा राहतो तो हा की गुन्हेगारीला आळा घालणारे सामान्य पोलिसदल संपावर गेले तर काय होईल?

ह्या प्रश्नात जाण्याआधी एक मुद्दा लक्षात घेतला पाहिजे, की पोलिसांचा आंदोलन, संप करण्याचा हक्क मान्य केला तर लगेच पोलिस सतत आंदोलने, संप करत सुटतील असे मानायचे कारण नाही. एकंदरीतच आंदोलने, हे कोणीही उगाच करत नसतात. संपात पगार बुडतो, नोकरी जाण्याची भीती असते, तसेच प्रसंगी मारपिटीलाही तोंड द्यावे लागते. त्यामुळे तसाच निकडीचा प्रश्न असल्याशिवाय व इतर मार्गांनी गाऱ्हाण्यांची दाद लागत नाही असे वाटल्याशिवाय सहसा संपाचे हत्यार उपसले जात नाही पोलिसांच्या बाबतीत बोलायचे झाले तर नेदरलँड, प. जर्मनी, नॉर्वे इ. देशांमध्ये पोलिसांना संघटना बांधायचा हक्क आहे! पण या देशांमधील पोलिसांनी काही आंदोलनांचे सत्र चालू केलेले नाही.

पोलिसदलाची एकूण अकार्यक्षमता लक्षात घेऊनही हे मान्य करावे लागेल की, जर सामान्य पोलिसदल संपावर गेले तर शहरांमध्ये चोऱ्यामाऱ्या, गुंडगिरी इ. मध्ये लगेच वाढ होईल. मात्र खेड्यांतील बहुसंख्य सामान्य जनता इतकी दरिद्री असते की, गुन्हेगार सहसा त्यांच्या वाटचाला जातच नाहीत! त्यामुळे खेड्यांतील सामान्य जनतेला संपामुळे विशेष फरक जाणवणार नाही. म्हणजे नागरी जीवन सुरळीत राखायचे असेल तर या पोलिसांना संपावर जाऊ न देणे, त्यांच्या लोकशाही हक्कांवर गदा आणणे हे आवश्यक आहे असे वरवर पहाता तरी दिसते. (ही 'आवश्यकता' आपल्या एकूण समाजाच्या ढांच्यावर प्रकाश टाकणारी आहे.) अशी परिस्थिती का निर्माण झाली आहे, हे जरा अंतर्मुख होऊन तपासून घ्यायला नको का? असे केल्याशिवाय हा अंतर्विरोध कसा सोडवायचा हे आपण ठरवू शकणार नाही.

आज समाजात एवढी गुन्हेगारी बोकाळली आहे, कारण एक तर प्रामाणिकपणे कष्ट करून पोट भरणे दिवसेंदिवस अधिकाधिक मुश्किल होत चालले आहे. गेल्या दहा वर्षांत एकूण बेकारी चौपट तर सुशिक्षितांची (११ वी व त्यापुढे शिक्षण झालेले) बेकारी पाचपट झाली आहे. गरीब आणि श्रीमंत यांच्यातील तफावत वाढत चालली आहे. एवढेच नव्हे तर गरीब जनतेची उपासमार वाढत चालली आहे. त्यामुळे अनेक वैफल्यग्रस्त बेकार गुन्हेगारीकडे वळत आहेत. तसेच गेल्या काही वर्षांत सामाजिक मूल्यांचा वेगाने ऱ्हास झाला आहे. काळाबाजार, लाचलुचपत, वशिलेबाजी, दादागिरी हे चालणारच, अशी भावना समाजात रुजू लागली आहे. गुन्हेगारी, सिनेमे, भडक कादंबऱ्या, बड्या लोकांची बडी लफडी रंगवून सांगणारी काही नियतकालिके यामार्फत गुन्हेगारीला लोकमानसात एक प्रकारचे स्थान प्राप्त झाले आहे. अशा तऱ्हेने एकूण सामाजिक ऱ्हासातून गुन्हेगारी उद्भवते; पण ती आटोक्यात आणण्याची सर्व जबाबदारी मात्र पोलिसांवर टाकून त्यासाठी त्यांच्या मूलभूत लोकशाही हक्कांवर गदा आणण्यात येते!

## स्वतंत्र पोलिसी यंत्रणा कशासाठी?

दुसरा एक मुद्दा–पोलीस किंवा सैन्यदल अशी संपूर्णपणे वेगळी, खास यंत्रणा असणे हे सामान्य जनतेच्या फायद्याचे आहे का? त्याऐवजी जनतेची स्वयंसंरक्षक दले उभारली जाऊन त्यांना ही जबाबदारी मोठ्या प्रमाणावर पार पाडणे शक्य नाही का? वेगळी, स्वतंत्र संरक्षणयंत्रणा उभी राहिल्याने एक तर जनता स्वत: शक्तिहीन बनते–पोलिसांशिवाय आपण सुरक्षित राहूच शकणार नाही अशी भावना निर्माण होते दुसरे म्हणजे पोलीस व सैन्यदल ही सर्वसामान्य जनता, तिचे प्रश्न, सुखदुःखे, आकांक्षा यापासून तुटलेली व म्हणून तिच्याशी समरस न होणारी अशी एक यंत्रवत् संघटना बनते. अशी यंत्रणा एखाद्या कळसूत्री बाहुलीसारखी वरिष्ठांच्या हुकूमानुसार जनतेच्या सरळ विरोधात सहज उभी राहते. आणीबाणीत आपल्याला त्याचा चांगलाच अनुभव आला आहे.

अशी जनतेपासून तुटलेली स्वतंत्र सत्ता असणे अटळ आहे का? व्हिएटनामी स्वातंत्र्ययोद्धे नुसतेच अमेरिकन आक्रमकांविरुद्ध लढत नव्हते, तर शेतकरी म्हणूनही शेतात इतरांबरोबर राबत होते. सर्व जनताच शेतकरी व सैनिक अशा दोन्ही भूमिका निभावत होती. खडे, व्यावसायिक सैन्य काही प्रमाणात असणे आज अटळ आहे. हे लक्षात घेऊनही असा प्रश्न उभा राहतो की, भारतातील सैन्य, पोलिसदल यांना उत्पादककामात अजिबात सहभागी करून घेतले जात नाही. असे केल्याने या दलांची कार्यक्षमता कमी होईल अशातला भाग नाही. कारखान्यांमध्ये, शेतांमध्ये काम करूनही व्हिएटनामी 'सैन्याने' अत्याधुनिक अमेरिकन आक्रमकांना धूळ चारली. ही दले उत्पादककामात सहभागी झाल्यामुळे एक तर त्यांच्यावर केलेला खर्च भरून येईल, दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे सर्वसामान्य जनतेपुढे असणारे प्रश्न, तिच्या आकांक्षा यांच्याशी ते समरस होतील. पोलिसदलांशी अशी दिलजमाई होणे हे सर्वसामान्य जनतेच्या हिताचे नाही का? सरकारला नेमके हेच नको आहे. जनतेपासून तुटलेली, अनुत्पादक, तिच्याशी अरेरावीने वागणारी अशीच यंत्रवत् यंत्रणा राज्यकर्त्या वर्गाला आवश्यक आहे, असे दिसते.

गुन्हेगारी, असुरक्षित नागरी जीवन व त्यावरील स्वतंत्र पोलिसयंत्रणेच्या स्वरूपात असलेला उपाय हे अटळ नाही. एका विशिष्ट सामाजिक परिस्थितीतून हे चित्र उभे राहिले आहे याचा विचार न करता नुसते 'कायदा व सुव्यवस्था' हे पालुपद घेऊन बसणे हे डोळ्याला झापडे लावून चाकोरीबद्धपणे विचार करण्याचे लक्षण आहे.

## राजकीय हस्तक्षेप

'पोलिसयंत्रणेत राजकीय हस्तक्षेप नको' असे बहुतेकांचे (निदान कागदावर तरी) म्हणणे आहे; पण खरा प्रश्न राजकीय हस्तक्षेप असावा की नसावा असा नसून तो कोणत्या स्वरूपात, कशा प्रकारे व कोणासाठी असावा असा आहे. पोलिसदलावर जनतेचा दबाव नसावा असे कसे म्हणता येईल? जिच्यावर जनतेचे नियंत्रण नाही अशी स्वायत्त सत्ता असणे ही खऱ्या लोकशाही समाजाला पोषक अशी गोष्ट आहे का? आज जनतेचे पोलिसदलांवर कसलेही नियंत्रण नाही, त्यामुळे पोलिस कसेही वागले तरी त्यांना सर्वसामान्य जनता जाब विचारू शकत नाही. निवडून गेलेले नगरसेवक, आमदार, खासदार, मंत्री यांच्यामार्फतही सर्वसामान्य जनतेचे पोलिसांवर नियंत्रण नाही. कारण ह्या लोकप्रतिनिधींवरच ते एकदा निवडून गेले की, जनतेचा तावा रहात नाही. त्यांना मुदतपूर्व परत बोलावण्याचा जनतेला अधिकार नाही. त्यांना एक स्वायत्त सत्ता प्राप्त होते व ते

जनतेच्या नावाने परंतु प्रत्यक्षात स्वतःच्या किंवा मूठभर बड्या हितसंबंधितांच्या फायद्यासाठी कारभार करतात, पोलिसदलासकट सर्व क्षेत्रात मूठभरांच्या स्वार्थासाठी हस्तक्षेप करतात. असला हस्तक्षेप अर्थातच बंद झाला पाहिजे; पण एखाद्या भागातील जनतेच्या प्रश्नाबद्दल पोलिसदल बेफिकीरीने वागत असेल तर त्या भागातील जनतेला बरोबर घेऊन पोलिसस्टेशनवर जाऊन त्या भागातील कार्यकर्त्यांनी पोलिसांवर दबाव आणला तर ते जनतेचे सार्वभौमत्व वाढवणारेच ठरणार नाही का? **रोजच्या कारभारावर जनतेचे नियंत्रण असणे हे लोकशाहीचे खरे लक्षण आहे.**

### पोलिसांची जबाबदारी

पोलिसांच्या या आंदोलनाला सर्व लोकशाहीवाद्यांनी पाठिंबा दिला पाहिजे. त्यांच्या न्याय्य मागण्यांची अनेक वर्षे दाद न लागल्यामुळे त्यांनी शेवटी आंदोलनाचा मार्ग स्वीकारला. शांततामयमार्गाने आंदोलन करणाऱ्या पोलिसांना, त्यांच्या काही नेत्यांना सरकारने तुरुंगात टाकले आहे याबद्दल सरकारचा निषेध करून सर्व बंदिवानांची विनशर्त सुटका करा अशी मागणी केली पाहिजे. तसेच पोलिसांना इतर नागरिकांप्रमाणेच सर्व लोकशाही हक्क मिळाले पाहिजेत अशीही मागणी केली पाहिजे.

मात्र पोलिसांनीही हे लक्षात घेणे आवश्यक आहे की, सर्वसामान्य जनतेशी त्यांची असलेली वागणूक आमूलाग्र बदलली पाहिजे. आज बहुतांश पोलिस सर्वसामान्य जनतेशी तुच्छतेने वागतात. गुन्ह्याचा शोध लावण्याच्या निमित्ताने कित्येकदा निरपराध गरीब माणसाला पोलिसचौकीत नेऊन बेदम मारण्यात येते. कैद्यांचा छळ केला जातो. तसेच राजकीय कैद्यांवर पोलिसांनी अनन्वित अत्याचार केल्याची उदाहरणे फक्त आणीबाणीत घडली आहेत असे नाही. राखीव पोलिसदलांनी तर सातत्याने माणुसकीला काळिमा फासणारी कृत्ये केली आहेत. जर पोलिसांना आपल्यावरील अन्याय दूर करायचा असेल, स्वतःच्या लोकशाही हक्कांसाठी झगडायचे असेल, तर त्यांनी इतरांवर अन्याय, अत्याचार करता कामा नये; तरच त्यांना जनतेचा पाठिंबा मिळू शकेल हे त्यांनी लक्षात घेतले पाहिजे. सर्वसामान्य जनतेच्या पाठिंब्याशिवाय त्यांना स्वतःच्या न्याय्य मागण्यांचा लढा फारसा पुढे नेता येणार नाही, याचीही त्यांनी मनाशी खूणगाठ बांधली पाहिजे.

'वाट्टेल ते करा पण अमुक एक दिवसांत गुन्हेगार आमच्यापुढे उभा करा' किंवा राजकीय कैद्यांबाबत 'त्यांच्याकडून गुप्त माहिती मिळवलीच पाहिजे' अशा प्रकारच्या वरिष्ठांच्या आज्ञांच्या दबावामुळे पोलिस अत्याचारी पद्धतीने काम करायला प्रवृत्त होतात हे खरे आहे; पण हे लक्षात घेऊनही सर्वसामान्य जनतेशी तुच्छतेने, कैद्यांशी क्रूरतेने वागण्याची बऱ्याच पोलिसांची जी पद्धत आहे ती पोलिसांनी प्रयत्नपूर्वक बदलली पाहिजे.

पंजाबमधील पोलिसांनी याबाबत अभिनंदनपर पाऊल टाकले आहे. अधिकाऱ्यांच्या तोंडी, बेकायदेशीर आज्ञा आम्ही पाळणार नाही असे त्यांनी म्हटले आहे. आणीबाणीत अशाच प्रकारच्या आज्ञा पोलिसांनी अंमलात आणल्यामुळे अनेक कार्यकर्त्यांना छळ सहन करावा लागला व आजही वरिष्ठ अधिकारी पोलिसांना अनेक बेकायदेशीर कृत्ये करायला सांगत असतात. असे हुकूम पाळायचे पोलिसांनी नाकारले तर ते लोकशाहीला हितकारक ठरेल.

गुन्हेगारी आटोक्यात आणण्याबाबतही थोडे असेच आहे. आज अनेक बडे सत्ताधारी राजकारणी आपले हितसंबंध राखण्यासाठी गुंडांचाही उपयोग करून घेतात असे दिसते. अशा राजकीय दबावामुळे पोलिसांना काही गुंडांच्या टोळ्यांविरुद्ध कारवाई करता येत नाही. त्यामुळे कित्येकदा सर्वसामान्य माणसाच्या तक्रारींची दखलच घेतली जात नाही. पोलिसांनी हे असले राजकीय हितसंबंध चव्हाट्यावर आणले तर जनता त्यांना साथ देईल.

संपकाळात एक सामाजिक कर्तव्य म्हणून संपावरील पोलिसांना स्वयंसेवक या नात्याने गुन्हेगारीविरुद्ध संरक्षण म्हणून उभे राहता येईल. जनतेची स्वसंरक्षक दले व स्वयंसेवक पोलिस यांना मिळून संपकाळात आटोक्यात ठेवता येईल. जनतेतील दोन थरांमधील अंतर्विरोध कसे सोडवायचे ते त्यांच्या चळवळीने ठरवायला हवे. तो हक्क सरकारला बहाल करून पोलिसांच्या लोकशाही हक्कांवर आक्रमण होऊ देणे हे सर्वसामान्यांच्या लोकशाही चळवळीच्या हिताचे नाही.

पोलिसी कामे करताना पोलिसांनी जनतेच्या नागरी हक्कांवर अतिक्रमण केले तर जनतेला न्याय मिळविणे कठीण जाते. कारण चौकशीयंत्रणा ही पोलिसांच्याच ताब्यात असते. परिणामी पोलीस कायद्याच्या चौकटीतून सुटून जाऊ शकतात. हे टळण्यासाठी अशा तऱ्हेच्या तक्रारींची चौकशी करण्याचे अधिकार जनतेच्या प्रातिनिधिक मंडळांना मिळाले पाहिजेत. पोलिसांनी या मागणीला विरोध करू नये. त्यांना सर्वसाधारण लोकशाही हक्क मिळवायचे असतील तर खास पोलिसी हक्कांवर पाणी सोडायला त्यांनी तयार झाले पाहिजे. 'पोलिस' आणि 'नागरिक' अशी काटेकोर विभागणी विलयाला जाणे हे सामान्य पोलिसांच्याही हिताचे आहे. आज आपला समाज आता अशा अवस्थेला पोचला आहे की, सर्वच प्रश्नांबाबत मूलभूत विचार केल्याशिवाय कोणताच प्रश्न चांगल्या रीतीने सुटू शकणार नाही. अशा या स्थित्यंतराच्या काळात पोलीस आणि नागरिक यांच्यातील संबंधाबाबत असा मूलभूत विचार करणे आवश्यक आहे असे वाटते. ☐


# टॉलस्टॉय – एक माणूस

## लेखिका : सौ. सुमति देवस्थळे

आवृत्ती दुसरी । मूल्य पंचावन्न रुपये । राजहंस प्रकाशन, पुणे ३०.

बिंदुकथा

# सामोरा

बिंदुसार

घाईघाईने बुशशर्टची बटणे लावीत, चपलांत पाय खुपसून तो बाहेर पडणार तेवढ्यात आतून बायकोचा आवाज येतो.

'अहो, बाहेर चाललात ना, बाळला डॉक्टरकडे न्यायचं लक्षात आहे की नाही ?'

तो घुटमळतो. काही बोलणार इतक्यात बायको दाराशी येते. तो विचारतो,

'अग, तू नेत्येस ना त्याला रोज–मग मी कशाला न्यायला पाहिजे ? आत्ता मीटिंग आहे जरा !' बायकोचा स्वर किंचित तीव्र होतो. 'मीटिंग नसते कधी तुमची ? पण पोराच्या जिवाकडे नको का पाहायला ?'

तो अस्वस्थ होतो. आपल्यासमोर कसला तरी अडथळा येतोय या जाणिवेने उसळतो.

'एवढं काय झालंय त्याला ? दिलेली औषधं घ्यायची नाहीत आणि–'

'हे पहा–मी सीरियसली सांगत्येय. आपल्या डॉक्टरांनी स्पष्ट सांगितलंय की, बाळला मोठ्यापैकी डॉक्टरला दाखवायला हवं म्हणून–वजन उतरतंय सारखं त्याचं–डोळे मालवल्यासारखे दिसतात !'

क्षणभर त्याला काय बोलावं ते समजत नाही–गुळमुळीतपणे तो म्हणतो, 'असं कर–दुपारी ऑफिसात पाठव त्याला मग बघू काय ते !'

धाडधाड जिना उतरत तो रस्त्यावर येतो. युनियनचे दोन-तीन कार्यकर्ते त्याची वाट बघत उभे आहेत. त्याचा चेहरा हसरा होतो. मांडीवर थाप मारून खांदे घुसळीत तो एकाच्या पाठीवर थाप टाकतो.

'काय महाराज, अरे किती दिवसांनी भेट–काय आहे काय ? चला चहा मारू !'

कोपऱ्यावरच्या हॉटेलात सगळे जातात. चहा-सिगरेटींची फैर झडते. करंगळीजवळ सिगरेट धरून तो जोरात झुरका घेतो आणि विचारतो–

'आमच्या परवाच्या पत्रकाची काय रिॲक्शन ?'

''पब्लिक' जाम खूष आहे–मॅनेजमेंटचे चमचे खूप खवळलेयत मनातून–पण करतात काय ?' जाड चष्मेवाला एक जण माहिती पुरवतो.

सिगारेटचे थोटूक भिरकावीत हलक्या आवाजात तो बोलतो, 'ही तर सुरुवात आहे अजून यार ! एकेकाचं वस्त्रहरण करू सवडीनं–थांबा म्हणावं जरा ! मुंबईची रिॲक्शन पण छान आहे.'

आणखी एक दोघे येऊन सामील होतात. चर्चा रंगू लागते. कोणत्या ऑफिसरला कसं सरळ करायचं, कोणाच्या बदलीसाठी प्रेशर आणायचं, तो मनोमन संतुष्ट आहे. हे वातावरण त्याला मनापासून आवडतं. युनियन्स, सभा, चर्चा, चळवळ, इश्युज, बोलणी, डावपेच. एक न संपणारी झिंग.

कोणाच्या तरी जोकवर हसण्याचा गदारोळ उठतो. एक नवशिका कार्यकर्ता त्याला विचारतो,

'शित्रेसाहेबाने माफी मागितली म्हणे–हे खरं आहे का हो ?'

तो तीन-चार मजली हसतो आणि मांडीवर थाप मारून म्हणतो, 'माफी ? अरे थोडक्यात सोडला त्याला–म्हणावं नशीब समज !' बोलता बोलता त्याचे डोळे चमकू लागतात.

'मित्रांनो, या संस्थेत आता कोणावरही अन्याय होणार नाही. कोणाचाही अपमान होणार नाही. जिथं असं काही घडेल तिथं पहिला घाव मी घालीन ! माझे सहकारी घालतील. आपली एकी मात्र सॉलिड पाहिजे !'

युनियनच्या कामासंबंधी बरीच चर्चा चालते. मध्येच एक जण म्हणतो, 'चला ऑफिसची वेळ झाली !'

'गप रे ! इथं तरी काय ऑफिसचंच काम चाललंय ना ? आणि ऑफिसर तरी कोण साले वेळेवर येतायत ?' तो डाफरतो; पण काही वेळानं बैठक मोडते. सगळे पांगतात.

ऑफिसात गेल्या गेल्या तो सुपरिंटेंडेंटच्या चेंबरमध्ये जातो. त्याला पाहून साहेब जरा सटपटतो. सुरुवातीलाच हा आगजाळ प्राणी कसा काय आला आपल्याकडे; पण खोटे हसत तो साहेब त्याला बसायला सांगतो. 'या या नेतेमंडळी !'

तो अधीरपणे विचारतो, 'त्या दोन पार्टटाइमर्सना ऑर्डर्स मिळाल्या नाहीत अजून ? आणि परवा दिलेल्या डिमांड्जबाबत पुढं काय झालं ?'

साहेब खुर्चीतल्या खुर्चीत चुळबूळ करतो. त्याची नजर टाळून बोलतो, 'ही दोन्ही मॅटर्स एम्. डी. कडे ठेवलायत–ओकेरच.' 'ते तुम्ही बघा–पण या गोष्टी झाल्या नाहीत तर आम्हाला मेंबर्सना समजावणं कठीण जाईल यापुढं !' तो तटकन् उठतो. चहा घेऊन जाण्याच्या साहेबाच्या विनंतीकडे दुर्लक्ष करून तो वाऱ्यासारखा बाहेर पडतो.

मग त्याचे दिवसभरचे चक्र सुरू होते. बाहेरगावाहून आलेल्या कर्मचाऱ्यांना भेटणे, फोन्स, चिठ्याचपाट्या, कोणाच्या नोटिशीला उत्तर ! प्रत्येक ठिकाणी त्याचा शब्द पाळला जातोय. होकारार्थी उत्तरं मिळतायत. अटकाव असा कोठे नाहीच. रोज हेच. असेच झंझावाती आयुष्य ! आज संध्याकाळी सबर्बन डेपोच्या नव्या कामगारांची बैठक बोलावलीय–तिच्याबद्दल तो सहकाऱ्यांना सूचना देतोय, मध्येच खेळाडूंचे एक शिष्टमंडळ येते. त्यांना संस्थेतर्फे राज्यस्पर्धात भाग घ्यायचाय. एम. डी. जरा खळखळ करतायत. हे कळताच तो एम्. डी. कडे जायला निघतो. कॉरिडॉरमध्ये तो तावातावाने बोलतोय 'हा अन्याय आहे. आमच्या खेळाडूंची टॅलंट मारली जातीय !'

समोरून बाळ येतो. पंधरा-सोळा वर्षांचा मुलगा–किडकिडीत–निस्तेज डोळ्यांचा–. जिने चढून आल्याने त्याला धाप लागलीय. वडिलांना पाहून तो थबकतो. त्याचेही लक्ष जाते.

बरोबरच्या सहकाऱ्याला तो सांगतो, 'अरे, अरे याला घेऊन जरा डॉ. लाटकरांच्याकडे जा बरं. मी एमडींना भेटून येतोच! '

सहकारी व बाळ जातात. तो एमडींच्या चेंबरमध्ये शिरतो. आरडाओरडा करून, आक्रस्ताळेपणा करून, टेबलावर हात आपटून तो आपला पॉइंट जिंकतोच. तो चेंबरबाहेर पडल्यावर एमडी चष्मा काढून चेहऱ्यावरचा घाम पुसतात. धडाधडा जिने

उतरून तो रस्त्यावर येतो. तेवढ्यात कोठून तरी स्कूटरवरून येणाऱ्या एका कर्मचाऱ्याला थांबवीत म्हणतो, 'अरे, मला जरा डॉ. लाटकरांच्या कन्सल्टिंगरूममध्ये जायचंय—सोड पाहू !'

दोघे स्कूटरवरून निघतात. एवढा मोठा पुढारी आपल्यामागे स्कूटरवर बसलेला म्हणून तो कर्मचारी सुखावतो. वाटते तो आताच आपण एम डीला कसा वाजवला हे साग्रसंगीत सांगतो. "साले आपण कोणापुढे नाही हटणार ! कोणापुढेही नाही—करत नाही म्हणजे काय ?"

त्याला डॉ. लाटकरांच्या इमारतीपाशी सोडून सहकारी निघून जातो. कन्सल्टिंग रूममध्ये प्रचंड गर्दी. पाय ठेवायला जागा नाही. एका कोपऱ्यात बाळ आणि बरोबरचा सहकारी दिसतात.

अधीरेपणाने तो त्यांच्याजवळ जातो.

"काय झाले ?"

सहकारी ओशाळल्याप्रमाणे म्हणतो, "गर्दी फार आहे; पण ओळखीने, लौकर नंबर येईल अशी व्यवस्था केली आहे; बसा ना !"

तो जागच्याजागी चुळबुळतो. दिवसभराच्या धावपळीचा वेग या क्षणी पूर्णपणे बंद पडला आहे हे त्याला अंधुक जाणवते. तो सिगारेट पेटवून अस्वस्थपणे खिडकीबाहेर पहातो. डोक्यात युनियनच्या नव्या निवडणुकीचे विचार—डावपेच—संभाव्य प्रतिस्पर्ध्यांच्या नावांची उजळणी. दहा मिनिटे होतात, वीस मिनिटं होतात. त्याच्याभोवती सिगारेटची थोटकं पडलेली. ही स्तब्धता, निष्क्रियता त्याला असह्य होते. तो सारखा डॉक्टरांच्या चेंबरच्या दाराकडे बघतोय.

पाऊण एक तासाने त्याचा नंबर येतो. बाळाला घेऊन तो आत शिरतो.

आवश्यक ती माहिती विचारीत डॉक्टर बाळाला तपासू लागतात. सावकाश मेथॉडिकली ! फॅमिली डॉक्टरची चिठ्ठीहि ते वाचतात. मध्येच तो विचारतो.

"काय झालं याला डॉक्टर ?" हातानेच त्याला गप्प करीत डॉक्टर बाळाला आतल्या खोलीत घेऊन जातात. बराच वेळ होतो. तो नुसता उभा. समोरच्या कॅलेंडरकडे पहात. त्यावर चित्र आहे एका जख्ख म्हाताऱ्याचं. सुरकुतीन् सुरकुती छायाचित्रात दिसत्येय.

डॉक्टर बाहेर येतात. फिरत्या खुर्चीत बसत बोलतात.

"या मुलाला बाहेर जाऊ द्या !" बाळ जातो.

टेबलावरच्या टीपकागदावर डॉक्टर हलकेच स्टेथास्कोप आपटीत रहातात. काहीच बोलत नाहीत.

तो प्रश्नार्थक मुद्रेने डॉक्टरांकडे पहातो. डॉक्टर संथपणे समोरचे पॅड पुढे ओढतात आणि प्रिस्क्रिप्शन लिहू लागतात.


खोलीतील शांतता त्याला असह्य होते. तो हलक्या आवाजात विचारतो, "काय झालंय याला डॉक्टर, बरा होईल ना बाळ ?"

डॉक्टर सौम्य मुद्रेने त्याच्या हातात प्रिस्क्रिप्शनचा कागद देतात आणि शब्दांची जुळवाजुळव करीत म्हणतात, "ही औषधं द्या काही दिवस. पूर्ण कोर्स आहे हा ! तो झाल्यावर पुढे बघू !"

"बाळ बरा होईल ना साहेब ?" त्याच्या प्रश्नांत आता किंचित धास्ती आहे. त्याचे त्यालाच आश्चर्य वाटते. काही तरी निर्णय केल्याप्रमाणे मानेची हालचाल करीत डॉक्टर म्हणतात.

"माझ्याकडे येण्यास तुम्हाला बराच उशीर झाला आहे. एनी वे, जे काही तीन-चार महिने मला मिळतील त्यात मी शिकस्त करीन—नाऊ प्लीज—"

त्याचे सर्वांग बधीर होते— पण कानांत मात्र कसला तरी कोलाहल सुरू होतो. निर्जीवपणे तो बाहेर येतो. समोर बाळ उभा असतो ! □

लाल किल्ल्यातील अभियोगाची कहाणी १९४८-४९

लेखक : पु. ल. इनामदार मूल्य : २० रुपये । राजहंस प्रकाशन, पुणे ३०

कुरुक्षेत्र केरळ । लेखांक पाचवा
विनय हर्डीकर । सतीश कामत

# नंबुद्रीपाद यांचा उदय आणि नंतरचा प्रवास

केरळमधील सर्व पक्षांच्या लोकांशी या संघर्षाविषयी चर्चा केल्यावर काही गोष्टी सर्वांनाच मान्य आहेत असं आढळून आलं. संघाचं काम वाढतं आहे. हिंदू बहुजन समाजात त्यांचा जोर पहिल्यापासूनच आहे. इतरत्र ज्याप्रमाणे संघ उच्च जातीय सुशिक्षितांपुरताच मर्यादित आहे तसा तो केरळात नाही आणि ख्रिश्चन व मुस्लिम यांच्या मोठ्या संख्येमुळे हिंदूंच्या संघटना फोफावण्यास खूप वाव आहे हे सर्वांनाच मान्य होत असे. विशेषतः काँग्रेसच्या खास शैलीच्या राजकारणात अल्पसंख्यांकांना जसा नेहमीच फायदा मिळाला तसाच तो केरळातही मिळालेला आहे. शिवाय मार्क्सवादी पक्षानं मुस्लिम लीगशी तडजोड केल्यानंतर सर्वसामान्य हिंदू मार्क्सवाद्यांवर नाराज आहेत हे आणखी काही एकमताचे मुद्दे. तरीही केरळातली संघाची वाढ ही एक महत्त्वाची राजकीय शक्ती होण्याइतपत झालेली नाही आणि अद्यापही मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष हाच केरळातला सर्वांत मोठा पक्ष आहे. हे अगदी संघवालेसुद्धा मान्य करतात. त्यामुळे मार्क्सवाद्यांनी आपला पक्ष कसा निर्माण केला आणि कसा वाढवला हे पाहणं आवश्यक आहे. जागतिक, अखिल भारतीय आणि स्थानिक कम्युनिस्ट चळवळीशी या पक्षानं कोणत्या प्रकारचं इनाम राखलं आणि एकूणच साम्यवादी चळवळीला केरळातील मार्क्सवाद्यांचं Contribution कोणतं, याही मुद्द्यांचा विचार करायला पाहिजे.

केरळातल्या कम्युनिस्ट पक्षाची स्थापना ही अखिल भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या स्थापनेनंतर बऱ्याच वर्षांनी झाली. सुमारे पंधरा वर्षांचा काळ मध्ये गेलेला आहे. किंबहुना ज्या वेळेला लाहोर आणि मीरत खटल्यातले, स्वतःला समाजवादी–साम्यवादी म्हणवणारे क्रांतिकारक खटले, कारावास, फाशी, भूमिगत कार्य इत्यादी तणावामुळे जवळपासात निष्क्रिय झाले, निष्प्रभ झाले, अज्ञातवासात गेले त्याच वेळी केरळमध्ये मात्र इ. एम्. एस. नंबुद्रीपाद, अच्युत मेनन्, गोपालन वगैरे मंडळींनी काँग्रेस चळवळीच्या बाहेर जाऊन केरळमध्ये स्वतंत्र कम्युनिस्ट पक्ष स्थापन करण्याचा निर्णय घेतला. नंबुद्रीपाद यांनी पण १९३७ मध्ये 'कम्युनिस्ट झालो' अशी स्पष्ट कबुली स्वतःच्या 'How I Became a Communist' या आत्मचरित्रात दिली आहे. इतिहासात काही गमतीचे योगायोग दिसून येतात. १९३७ मध्येच 'मोपल्यांचे बंड' लिहिणारे, 'हिंदुत्व' लिहिणारे स्वातंत्र्यवीर सावरकर हे देखील स्थानबद्धतेतून मुक्त झाले आणि हिंदुमहासभेच्या कार्याला जोरदार चालना मिळाली. आज केरळात कम्युनिस्टांना ज्या रा. स्व. संघाचं फार मोठं आव्हान निर्माण झालंय त्या संघाशीही सावरकरांचा अनेकदा संबंध आला तो १९३७ च्या पुढेच. शिवाय भारतातल्या पहिल्या निवडणुका, पहिली स्वदेशी सरकारं अधिकारावर आली तीसुद्धा १९३७ मध्येच. त्या दृष्टीनं ४७ प्रमाणेच ३७ सालाचं महत्त्वही अनन्यसाधारण वाटतं. ५७ साली केरळात भारतातलं पहिलं कम्युनिस्ट सरकार अधिकारावर आलं. त्याची पाळंमुळं पार ३७ सालापर्यंत जातात आणि आज जी कम्युनिस्टांची स्थिती आपण पाहतो तिची कारणं ३७ सालापर्यंत मागं जाऊनच शोधावी लागतात.

नंबुद्रीपाद यांनी आपलं आत्मचरित्र मुळात मल्याळम् भाषेतनं लिहिलं व त्याचा इंग्रजी अनुवाद १९७६ मध्ये प्रसिद्ध झाला 'उन्निनंबुद्रि' या कम्युनिस्ट मासिकात आणि 'जनयुगम्' या साप्ताहिकात या आत्मचरित्रातील काही भाग प्रथम प्रकाशित झाले व नंतर नंबुद्रीपाद यांनी काही नवीन प्रकरणांची भर घालून हे पुस्तक पूर्ण केले. दक्षिण मलबारमध्ये १९०९ साली त्यांचा जन्म झाला आणि आपल्या या आत्मकथेत त्यांनी १९३८ पर्यंतच्या घटना नोंदवलेल्या आहेत. एका अत्यंत कर्मठ ब्राह्मणकुटुंबात नंबुद्रीपाद जन्माला आले. ६०–७० वर्षांपूर्वी केरळमध्ये जातिव्यवस्था इतकी कठोर होती की आपल्याकडल्या सत्यशोधक चळवळीसारख्या चळवळीचे लहानसे पडसादसुद्धा तिथल्या ब्राह्मणसमाजात उमटलेले नव्हते. विधवाविवाह, बालविवाह, स्त्रियांचं शिक्षण, सांपत्तिक विषमता आणि प्रत्येक जात इतर सर्व जातींना अस्पृश्य मानणारी अशा सामाजिक, धार्मिक रूढींच्या बंधनात हा समाज जखडलेला होता. श्रीनारायणगुरु होऊन गेल्यानंतरही ही परिस्थिती होती. स्वातंत्र्यवीर सावरकरांनी 'मोपल्यांचे बंड' लिहिताना एका ब्राह्मण तरुणीला एका थिया तरुणीबद्दल प्रेम वाटतं असं दाखवलंय. जर केरळातल्या मंडळींनी त्या वेळेला हे वाचलं असतं तर ते सावरकरांच्यावर संतापले असते, इतकी याबाबतील रूढीची पकड घट्ट होती. स्वतः नंबुद्रीपाद यांनी 'मी देव आणि भुतं–खेतं यांच्या गराड्यात जन्माला आलो' असे जळजळीत उद्गार काढलेत. देवावर श्रद्धा आणि भुताखेतांवर अंधश्रद्धा. देवावर श्रद्धा असल्यामुळं ब्राह्मणकुटुंबात प्रचंड कर्मकांडाचा बडिवार आणि भुताखेतांच्यावर श्रद्धा ठेवणारा अज्ञ बहुजन समाज त्या प्रकारच्या जारण–मारण इत्यादी क्रियाकर्मांत गुरफटलेला ही त्या वेळची वस्तुस्थिती होती. जात विचारू नका;

जात सांगू नका' हा नारायणगुरूंचा संदेश लोकांना माहीत होता; पण सर्व लोकांच्या विशेषतः वरिष्ठ जातींच्या अंगवळणी तो पडलेला नव्हता. त्यामुळे नंबुद्रीपाद यांच्या मनात 'हिंदू समाज', मुख्यतः ब्राह्मणसमाजाबद्दल, खूपच संताप आणि तिटकारा प्रथमपासून आढळतो.

## मोपल्यांचे बंड

मात्र मलबार प्रांतात जन्माला येऊनही मुसलमानसमाजाचं फारसं कठोर परीक्षण नंबुद्रीपाद करू शकलेले नाहीत. ब्राह्मणकुटुंबात जन्मल्यामुळे त्यांचा मुस्लिमांशी प्रत्यक्ष संपर्क फार उशिरा म्हणजे वयाच्या २२–२३ व्या वर्षानंतर आला, हे खरंच आहे; पण एकवीस साली जेव्हा मोपल्यांचं बंड झालं आणि हिंदूंच्यावर अनन्वित अत्याचार झाले त्या वेळी आणि त्यानंतर नंबुद्रीपाद काही न कळत्या वयातले होते असं वाटत नाही; परंतु मोपल्यांच्या बंडाची एकूण हकीगत त्यांनी मुळीच दिलेली नाही. दोनशे पानांच्या त्यांच्या आत्मचरित्रात या प्रकरणावर केवळ दोन-तीन लहान परिच्छेद आहेत. 'माझ्या लहानपणी असं काही तरी होऊन गेलं आणि त्या वेळी आम्ही मलबारपासून दूर होतो.' अशा प्रकारचं निवेदन ते करतात. ज्या घटनेचे प्रतिसाद सबंध भारतात नंतर अनेक वर्षं उमटत होते, त्या घटनेबद्दल नंबुद्रीपाद यांना काहीही स्मरण नसावं हे शक्यच वाटत नाही आणि मलबार भागात आजतागायत मुसलमानांशी जमवून घेण्याचं जे मार्क्सवाद्यांचं धोरण आहे ते पाहिलं तर आत्मचरित्र लिहिताना नंबुद्रीपाद यांनी मुसलमानांना न दुखविण्याची विशेष काळजी घेतली होती, हे दिसून येतं. याआधीच्या एका लेखात मोपल्यांच्या बंडामध्ये ज्यांनी भरपूर अत्याचार केले त्यांना ताम्रपट मिळाल्याचा उल्लेख आहे. मल्लापुरम् जिल्हा दिल्याचा उल्लेख आलेला आहे. ही सर्व नंबुद्रीपादांचीच कर्तबगारी आहे. १९६८ साली हा जिल्हा देण्याची तयारी त्यांनी पूर्वीच केलेली दिसते. मुसलमानांनी मात्र मल्लापुरम् जिल्हा पदरात पडताच केवळ तीन महिन्यांत नंबुद्रीपादांचंच मंत्रिमंडळ पाडलं ही वस्तुस्थिती!

स्वतःची आत्मकथा सांगताना इ. एम. एस. फार सावध आहेत. ते कुठेही आत्मगौरवाची भाषा वापरत नाहीत. 'माझी जीवनकथा म्हणजे केरळचीच कथा' अशी अत्रेटाइप भाषा किंवा 'मी पहिल्यापासूनच हुशार, धोरणी, मुत्सद्दी, सुस्वभावी, नीतिमूल्यांची कदर करणारा, सेवाभावी आणि पुष्कळ पुष्कळ असल्यामुळे मी यशस्वी झालो' अशी धारियाटाइप भाषाही ते वापरत नाहीत. या सावधपणाला तटस्थता, अलिप्तता अशीही नावं देता येतील; पण मुळात तो सावधपणाच आहे हे सिद्ध करणारी वरच्याप्रमाणेच अनेक उदाहरणं या पुस्तकात दाखवता येतील. काँग्रेसच्या चळवळीत नंबुद्रीपाद यांनी दहा वर्षांहून अधिक काळ काम केलं, तुरुंगवासही भोगला; परंतु काँग्रेसची धोरणं आणि गांधीजींचे कार्यक्रम त्यांना कधीच फारसे पटले होते किंवा महत्त्वाचे वाटले होते असं दिसत नाही. सत्याग्रह, हरिजनांचा उद्धार, चरखा, खादी या सगळ्या कार्यक्रमांच्याविषयी नंबुद्रीपाद थोड्या–फार तुच्छतेनंच बोलताना दिसतात आणि नाइलाज म्हणून या धोरणांना पाठिंबा देताना दिसतात. गांधीजींच्याबद्दल व्यक्तिशः आदर किंवा प्रेम त्यांना विशेष नव्हतं, हेही दिसून येतं; परंतु त्या काळात परिस्थितीच अशी होती की, देशाच्या स्वातंत्र्याला अग्रक्रम असल्यामुळे आणि त्यासाठी झटणारी काँग्रेस हीच mass movement असल्यामुळं त्यांनाही काँग्रेसमध्ये जाण्यावाचून गत्यंतर नव्हतं. मात्र मुस्लिमांशी सतत जमवून घ्यायचं एवढी एक गोष्ट ते गांधीजींकडून शिकलेले दिसतात आणि गांधींच्या नंतरही त्यांनी हा कित्ता वेळोवेळी गिरवलेला दिसतो.

फ्रेंच राज्यक्रांती व इंग्लंडमधील प्रॉटेस्टंट विचारक्रांतीचा प्रभाव आपल्यावर विशेष पडला हे त्यांनी नमूद केलं आहे. रशियन राज्यक्रांतीविषयी त्या काळात फारसं वाचन किंवा माहिती त्यांना असणं शक्यच नाही. कारण खुद्द युरोपमध्ये रशियन राज्यक्रांतीचा गौरव २५ सालानंतर सुरू झाला आणि ३२–३३ ते ३७–३८ पर्यंत रशियन राज्यक्रांती हीच मानवतेची एकमेव आशा आहे; अशा कैफात युरोप आणि इंग्लंडमधले लोक होते. स्पॅनिश यादवी युद्धात रशियानं जो दणका दिला तो पाहिल्यावर ते शहाणे झाले. अशी परिस्थिती असताना इ. एम. एस. च्या वाचनात रशियन क्रांतीविषयी विशेष काही आलेलं नव्हतं हे साहजिक आहे, मात्र ट्रॉट्स्कीच्या काही निबंधांचं, पत्रकांचं वाचन त्यांनी केलेलं होतं आणि त्याचं मल्याळम्मध्ये भाषांतरही केलेलं होतं. ३३ साली तुरुंगात गेल्यानंतर त्यांचा लाहोर, मीरत खटल्यांशी संबंध असलेल्या बंगाली क्रांतिकारकांशी संबंध आला तो कन्नोरच्या तुरुंगात. कन्नोर हा मलबारमधला प्रमुख जिल्हा. सुमारे पन्नास वर्षांपूर्वीदेखील ब्रिटिश सरकार एकाच विचाराची, एका भाषेची राजकारणी माणसं तुरुंगात एकत्र राहू नयेत याची किती काळजी घेत असे हे पाहण्यासारखं आहे. आणीबाणीत इंदिराबाईंनी हा प्रयोग करून पाहिला; पण तो त्यांच्या अंगाशी आला. त्या काळातही भाषेची बंधनं तोडून इंग्रजीच्या जोरावर, समाजवादी म्हणवणाऱ्या क्रांतिकारकांशी केरळमधला एक तरुण कार्यकर्ता संवाद साधू शकलाच! उत्तरोत्तर त्यांना असं जाणवत गेलं की काँग्रेसच्या अंतर्गत जो काँग्रेस सोशॅलिस्ट पार्टी नावाचा गट आहे, त्या गटाकडे आपण वळलं पाहिजे. जयप्रकाश नारायण, युसुफ मेहेरअल्ली, केळप्पन, अच्युतराव पटवर्धन, मिनू मसानी, एसेम जोशी, हे डाव्या विचारसरणीचे पुरस्कर्तेही त्या वेळी काँग्रेसमध्ये राहूनच भारतीय राजकारणाला समाजवादी वळण देण्याच्या विचारात होतेच. त्यांच्याशी नंबुद्रीपाद अधिक समरस झाले. तरीही या मंडळींइतकं आपलं वाचन नव्हतं, चिंतन नव्हतं, चर्चांमध्ये आपली भूमिका श्रोत्याचीच असे आणि इतर नेत्यांशी आपला संवाद हा मुख्यतः अनौपचारिक गप्पांतूनच होत असे, वगैरे गोष्टी त्यांनी प्रामाणिकपणे सांगितल्या आहेत. अखिल भारतीय राजकारणाशी एकदम जवळून संबंध आल्यानंतर हा पंचविशीतला केरळी तरुण थोडासा भांबावून जावा हे साहजिक होतं. परंतु या सर्वांकडे ते फार बारकाईने पाहात होते. विशेषतः जे. पीं.च्यावर त्यांचं फार बारीक लक्ष होतं. 'Why Socialism' लिहिणारे जे. पी.नंतर सर्वोदयाच्या आहारी गेल्याबद्दल त्यांनी पुन्हा पुन्हा टोमणे मारले आहेत. त्या वेळेला स्वतःला समाजवादी म्हणवणाऱ्या सर्व नेत्यांनी पुढे पुढे आपल्याच तत्त्वांशी प्रतारणा केली– असं ते सारखं सुचवतात

नंबुद्रीपाद यांनी कम्युनिस्ट विचारसरणीचा बारीक अभ्यास

चाळीस सालापर्यंत तरी केलेला होता, असं दिसत नाही. हा माणूस थिअरीतला गड्डा नाही, पोथीतला किडा तर मुळीच नाही. त्यांच्या डोळ्यांसमोर सामाजिक क्रांतीची दोन रूपं होती. एक म्हणजे ब्राह्मणशाहीचा पाडाव आणि दुसरं म्हणजे केरळमधल्या जमीनदारीचा पाडाव. मार्क्सला अभिप्रेत होतं त्या प्रकारचं क्रांतिपूर्व औद्योगीकरण व त्यातून येणारी पिळवणूक, छळ, विषमता, स्वतः-वरच उलटून पोखरली जाणारी भांडवलशाही वगैरे काही केरळात नव्हतं आणि आजही नाही; परंतु जमीनदारांच्या टाचेखाली भरडले जाणारे छोटे शेतकरी होते, शेतमजूर होते, दोन वेळच्या जेवणाची भ्रांत असलेले विणकर होते, छोटे कारागीर होते, दररोज पोट जाळण्यासाठी समुद्रात जाऊन स्वतःचा जीव धोक्यात घालणारे कोळी होते आणि विडीकामगार होते. त्यामुळे या मंडळींच्या युनियन्स स्थापून चळवळी उभ्या केल्या पाहिजेत हे त्यांनी ओळखलं. किचकट ग्रांथिक मारामाऱ्यात ते फारसे शिरलेले नाहीत. हेही लक्षात ठेवलं पाहिजे की, आंतरजातीय विवाह त्यांनी घडवून आणले. विधवा विवाहही घडवून आणले, त्यांची तरफदारी करणारं लेखन केलं; पण त्यासाठी चळवळी केल्या नाहीत. सामाजिक सुधारणा फक्त हिंदू–ब्राह्मणवर्गापुरत्याच केंद्रित केल्या. मुस्लिम–ख्रिश्चन यांच्या वृत्ती-मध्ये आमूलाग्र बदल करावेत, असंही त्यांना कधी वाटलं नाही किंवा वाटलं असलं तरी तो धोका त्यांनी पत्करला नाही. हरिजन-उद्धार वगैरे तर त्यांना थोतांडच वाटत होतं. 'ब्राह्मणशाहीचा पाडाव म्हणजे हिंदूंची सामाजिक क्रांती झालीच आणि जमीनदारीचा पाडाव म्हणजे आर्थिक क्रांती झालीच' असा हिशोब त्यांनी मांडलेला दिसतो. Against Brahminism आणि Some lines of revolutionary movements ही त्यांच्या आत्मचरित्रातली प्रकरणं या दृष्टीनं वाचून पाहण्यासारखी आहेत. त्यांच्या सामाजिक क्रांतीच्या कल्पनेत secular तत्त्वांचा अंतर्भाव नव्हता हे लक्षात ठेवलं पाहिजे.

इथं आपल्याला केरळच्या काही सामाजिक वैशिष्ट्यांचा विचार केला पाहिजे. एकूणात हिंदू बहुसंख्य असले, तरी उत्तर केरळात मुसलमान तर दक्षिण केरळात ख्रिश्चन यांचं प्राबल्य आहे. मलबार-मधले मुसलमान तर प्रथमपासूनच धर्मवेडासाठी प्रसिद्ध आहेत. केरळमध्ये २% ब्राह्मण, १४% नायर, २४% एळवा (थिया), २१% ख्रिश्चन, १९% मुसलमान आणि २०% हरिजन, आदिवासी व अन्य अशी विभागणी आहे. नायर ही जमात श्रीमंत असल्यामुळे त्यांना स्वतःच्या पायावर उभं राहता येतं. राहता राहिला हिंदू-मधला एळवा समाज. हे लोक चौदाव्या शतकापर्यंत नायरांच्या बरोबरीचेच मानले जात होते. अत्यंत बुद्धिमान, कष्टाळू परंतु गरीब अशी ही जमात आहे. एवढंच नव्हे तर बाटलेल्या ख्रिश्चनांमध्ये ७०% आणि मुसलमानांमध्ये ४०% एळवाच आहेत. या जमातीला एकत्र करून, संघटित करून तिला नेतृत्व दिलं पाहिजे, त्यांचे मेळावे, ट्रेड युनियन्स स्थापन केल्या पाहिजेत, आर्थिक परिस्थिती सुधारली पाहिजे म्हणज आपोआपच हिंदूंमधला ब्राह्मण आणि नायर यांच्या मक्तेदारीला शह बसेल, हा सामाजिक परिवर्तनाचा व्यूह इ. एम्. एस्. ना दिसला, हे निश्चितच दूरदृष्टीचं लक्षण आहे. मात्र केरळ-मध्ये ज्यांनी संघाचं काम सुरू केलं त्यांनाही पहिल्या काही वर्षांनंतर एळवा समाजालाच हाताशी धरलं पाहिजे, हे कळून आलं आणि त्यातूनच सध्याचा पेचप्रसंग उद्भवलेला आहे. 'एळवा समाज कुणाकडे?' हा केरळच्या राजकारणातला सर्वांत महत्त्वाचा प्रश्न आहे. तो ज्यांच्याकडे तेच राज्यकर्ते. एळवांचा जर पाठिंबा नसेल तर ब्राह्मण आणि नायर यांचं नेतृत्व केवळ वांझोटंच ठरेल. म्हणूनच केरळमध्ये ज्यांना वाढायचं आहे त्यांनी 'एळवा, एळवा आणि एळवा' या मंत्राचा जप केला पाहिजे, हे नंबुद्रीपादांनी ओळखलं. त्यांनीच रचलेला हा व्यूह त्यांच्या चुकांमुळेच कसा विस्कटला, हे आता पाहायचं आहे. इ. एम्. एस्. नंबुद्रीपाद हेच अजून केरळातील सर्वांत अधिक अनुयायी असलेले नेते आहेत म्हणून त्यांच्या जडण-घडणीचा हा एवढा दीर्घ मागोवा घेतला.

## श्रीनारायणगुरूंचे कार्य

आता आपल्याला ज्या एळवा समाजाकडे केरळातले सर्व पक्ष आणि संघटना फार आशेनं पाहतात त्या समाजाच्या या शतकातल्या राजकीय व सामाजिक चळवळींचा धावता आढावा घ्यायचा आहे. बहुसंख्य असलेल्या या जातीबद्दल अगदी ह्यु-एन्-त्संगपासूनच्या प्रवाशांनी फार चांगले उद्‌गार काढलेले आहेत. ही सगळी जमात अत्यंत बुद्धिमान, कष्टाळू आणि अनेक उच्च प्रकारचे विक्रम केलेली आहे. शौर्य, इमान आणि प्रेमळपणा याबद्दल प्रसिद्ध आहे. मात्र केरळमधल्या एळवांची दारिद्र्य ही एकच समस्या नव्हती. त्यांना समाजात समानतेची वागणूक नव्हती आणि स्वतःचं नेतृत्व नव्हतं. जातिव्यवस्थेच्या उतरंडीमध्ये त्यांचा क्रम तिसरा होता. नायर आणि नंबुद्री यांनी तर त्यांना अस्पृश्यांतच ढकललेलं होतं. एळवा जमातीच्या ह्या गुणवैशिष्ट्यांचं सावरकरांचं वर्णन अतिरंजित असलं तरी बिनबुडाचं नाही. एका अभ्यासकानं तर केरळातले नंबुद्री आणि एळवा यांच्या दिसण्यात, वागण्यात काहीही फरक नसतो असं स्पष्टपणे म्हटलं आहे. त्यातच एळवा समाजाच्या इतिहासाचं दुसरं एक वैशिष्ट्य आहे. नंबुद्री, नायर, मुसलमान आणि ख्रिश्चन यांच्याकडून सतत पिळला गेलेला, उपेक्षिलेला हा समाज असल्यामुळे त्यांच्यावर अनन्वित अत्याचार होऊन अनेक मुस्लिम झाले, तर दारिद्र्याला कंटाळून भौतिक उत्कर्ष, शिक्षण, सामाजिक समता यांच्या आशेनं हजारो एळवा ख्रिश्चनही स्वखुशीनं झाले. त्रावणकोरच्या राजाला अगदी अलीकडे म्हणजे १९३२–३३ च्या आसपास 'आमच्या समस्या न सोडवल्यास आम्ही फार मोठ्या प्रमाणावर धर्मांतर करून ख्रिश्चन होऊ!' अशी धमकी एळवांनी दिलेली होती. हे लोक अनेक शतकं एका नेत्याच्या शोधात होते आणि तो नेता त्यांना श्रीनारायणगुरू यांच्यामध्ये मिळाला.

श्रीनारायणगुरू हे एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धातले एक महान संत होते. १८५४ ते १९२८ हा त्यांच्या जीवनकाल! साधुत्वाबरोबरच सामाजिक समस्या सोडवण्याची जबरदस्त प्रेरणा त्यांच्याजवळ होती, मुख्य म्हणजे निरनिराळ्या जातींनी चिरफाळ-लेला हिंदुसमाज आणि धर्मवेडामुळे व स्पर्धेमुळे छिन्नविच्छिन्न झालेला एकूण केरळी समाज एकत्र कसा आणावा याचं इंगित त्यांना सापडलेलं दिसतं. आपल्याकडची वारकरी चळवळ, रामदासांचं वेगळ्या पद्धतीचं काम, सत्यशोधक चळवळ आणि विसाव्या शतकात गाडगेबाबांनी केलेलं मिशनरी पद्धतीचं काम या साऱ्यांची वैशिष्ट्यं

श्रीनारायणगुरूंच्या उपदेशात सापडतात. नारायणगुरूंनी आपल्या अनुयायांना दिलेले काही आदेश समजून घेण्यासारखे आहेत.

(१) सर्वांच्यासाठी एक जात, एक धर्म आणि एक देव असावा.

(२) जात विचारू नका, जात सांगू नका, जातीचा विचार करू नका, जातीविषयी बोलू नका. (३) ज्या धर्मातून व्यक्तीचा परमोच्च विकास होतो तो धर्म कोणताही असला तरी चालेल. (४) दारू हे विष आहे ते पिऊ नका, कुणाला पाजू नका आणि शेवटचा प्रमुख आदेश म्हणजे (५) जे तुम्ही स्वतःच्या सुखासाठी कराल त्यामधून दुसऱ्यांनाही सुख झालं पाहिजे. हिंदू, मुसलमान आणि ख्रिश्चन या तिन्ही धर्मांची अनुक्रमे अध्यात्मिकता, समानता आणि सेवावृत्ती ही तिन्ही महत्त्वाची वैशिष्ट्यं नारायणगुरूंनी ओळखल्याचा हा पुरावा आहे. त्यामुळं त्यांचे अनुयायी झपाट्यानं वाढत गेले. त्यांच्या शिष्यांपैकी डॉ. पालपु हे उत्तम डॉक्टर होतेच; पण घडाडीचे संघटकही होते. कुमारन् आसन् हे एक सामाजिक समतेचे आणि वैश्विक प्रेमभावाचे कट्टर पुरस्कर्ते होते आणि टी. के. माधवन हे केरळमधले फार प्रसिद्ध समाजसुधारक होते. कुमारन् आसन् यांची 'चांडाळभिक्षुकी' आणि 'दुरवस्था' ही काव्यं फार प्रसिद्ध आहेत. दोन्हीमध्ये केरळच्या सामाजिक समस्यांचं प्रतिबिंब उमटलेलं आहे. त्यांची सुनीतं, छोट्या कविता आणि गीतं यामधून केरळातील दलित समाजाला फार मोठा दिलासा मिळाला आणि स्वतःच्या हक्कांसाठी झगडण्याची स्फूर्ती मिळाली, धैर्य मिळालं.

## एळवांची संघटित शक्ती

१९०३ मध्ये नारायणगुरू आणि त्यांच्या शिष्यांनी मिळून 'श्रीनारायणधर्मपरिपालनयोगम्' नावाच्या धार्मिक, सांस्कृतिक संघटनेची स्थापना केली. फार मोठ्या संख्येनं एळवा समाज त्यात सामील झालाच; परंतु २०% असलेल्या दलित समाजाचाही पाठिंबा त्यांना मिळू लागला. ही नारायणगुरूंची करामत. स्वतःवर इतके अत्याचार झाले तरी एळवा लोक कधीही सूडबुद्धीनं वागलेले नाहीत आणि त्यांनी दलितांच्यावर फारसे अत्याचार केलेले नाहीत. त्यामुळे बहुसंख्य दलितसमाज नेहमीच त्यांच्यामागे असतो आणि मुळातच तीस टक्क्यांहून अधिक असलेले एळवा वाढून ४०% च्या पुढे गेले या जोरावर केरळच्या राजकारणात महत्त्वाचं स्थान त्यांनी मिळवलेलं आहे. चोवीस सालच्या प्रसिद्ध वायक्कम सत्याग्रह याच मंडळींनी यशस्वी करून दाखवला व मंदिरप्रवेशाच्या हक्कासाठी आवाज उठवला. बुद्धिमान नंबुद्री आणि श्रीमंत नायर यांच्याविरुद्ध आपल्याला दलितांसह उभं राहिलं पाहिजे ही जाणीव एळवा समाजाला मार्क्सवाद्यांचं नेतृत्व मिळण्यापूर्वीच झालेली आहे. १९३२ मध्ये त्यांनी 'अखिल त्रावणकोर एळवा राजकीय संघटना' स्थापन केली आणि दक्षिण केरळातल्या ख्रिश्चनांशी जमवून घेऊन 'निवर्तनप्रस्थान' ही बहिष्कारासारखी चळवळ सुरू केली. म्हणजेच ख्रिश्चनांच्या सहाय्याने नायर आणि मुस्लिम या दोन्ही समाजांना त्यांनी अलग पाडलं. अर्थात एळवा आणि ख्रिश्चन यांचंही फार काळ जमलं नाही. नायर आणि नंबुद्री यांनी १९५० ते ५६ या काळात ख्रिश्चनांच्या मदतीनं केरळीय राजकारणावरची एळवांची पकड ढिली करण्यासाठी सर्व काही केलं. मुसलमानांशी एळवांचं जमणं कधीच शक्य नव्हतं आणि नाही. त्यामुळे पट्टम्थाणू पिल्ले या नायर मुख्यमंत्र्याला त्यांनी १९४८ साली पाडलं आणि स्वतःचा मुख्यमंत्री आणण्याचा प्रयत्न केला. अशा प्रकारचे सत्तासंघर्ष चालूच राहून आणि नायर आणि ख्रिश्चन एका बाजूला आणि एळवा दुसऱ्या बाजूला ही स्थिती मध्य आणि दक्षिण केरळच्या राजकारणात अधिकाधिक विदारक होत गेली. १९५२ च्या निवडणुकात आर. शंकर या एळवा नेत्याचा नायर, ख्रिश्चन यांनी पाडाव केल्यानंतर एळवा काँग्रेसवरचा विश्वास उडाला काँग्रेसच्या माध्यमातून आपले समान हक्क प्रस्थापित होतील ही आशा धुळीला मिळाली. ख्रिश्चन आणि नायर यांच्याबद्दल कमालीचा तिटकारा आणि संशय निर्माण झाला **आणि इथेच म्हणजे ५२ ते ५६ या चार वर्षांत एळवांचा ओढा कम्युनिस्ट पक्षाकडे वळला.** नारायणगुरूंनी दिलेली शिकवण आणि त्यांचे पट्टशिष्य यांमध्ये सामाजिक चळवळीची सूत्रं होती, परंतु राजकीय सत्ता कशी हस्तगत करता येईल याबद्दल फारसा विचार नव्हता. त्यामुळं एळवांचं राजकीय नेतृत्व उदयाला आलं तरी यशस्वी होऊ शकलं नाही. दरम्यानच्या काळात १९४० साली केरळमध्ये स्वतंत्र कम्युनिस्ट पार्टीची स्थापना झाली. नंबुद्रीपाद, गोपालन, अच्युत मेनन्, पी. गोविंद पिल्ले यांसारखे प्रौढ आणि तरुण नेते निष्ठापूर्वक काम करत होते. त्यांच्याकडेही समर्पित कार्यकर्त्यांचा फार मोठा संच होता. म्हणूनच राजकीय सत्ता हस्तगत करण्याचा आशेचा किरण एळवांना कम्युनिस्ट पक्षात दिसला व ५६ साली स्वतंत्र केरळ अस्तित्वात आल्यानंतर ५७ च्या निवडणुकीत एळवांनी आपलं सर्व वजन कम्युनिस्टांच्या पारड्यात टाकलं. १२६ सदस्यांच्या विधानसभेत कम्युनिस्ट पक्षाला ६० जागा मिळाल्या व ३५% मतं मिळाली. तर काँग्रेसला ३८% मतं मिळूनही फक्त ४३ जागा मिळाल्या. केरळच्या प्रजासमाजवादी पक्षानं ११% मतं आणि ९ जागा मिळवल्या, कम्युनिस्टांना पाठिंबा दिला आणि नंबुद्रीपाद हे पहिले मुख्यमंत्री झाले. त्या वेळी काँग्रेसनं १२४ जागा लढवल्या आणि मिळवल्या फक्त ४३, कम्युनिस्टांनी १०० जागा लढवून ६० मिळवल्या. या निवडणुकांत मुस्लिम लीग हा केवळ मलबारचा स्थानिक पक्षच होता. त्यांना फक्त ८ जागा मिळाल्या होत्या आणि ख्रिश्चनांनी पूर्ण पाठिंबा काँग्रेसला दिला होता. तेव्हापासून आजतागायत केरळातले ख्रिश्चन हे नेहमीच कम्युनिस्टांचे कट्टर विरोधक राहिलेले आहेत. त्यांचा स्वतंत्र 'केरळ काँग्रेस' हा पक्ष स्थापन झाल्यावरही त्यांनी तडजोड केलीच असली तर काँग्रेस, मुस्लिम लीगशी केली आहे, पण कम्युनिस्टांशी नाही. इथे दोन-तीन गोष्टी नोंदवून ठेवल्या पाहिजेत. एळवा जरी कम्युनिस्ट पक्षाकडे गेले तरी नारायणगुरूंना ते विसरलेले नव्हते. त्यांनी डोळ्यांसमोर ठेवलेला आदर्श समाज साकार करण्यासाठी राजकीय सत्ता हवी असेल तर आपल्याला कम्युनिस्ट पक्षाकडेच गेलं पाहिजे अशा कोंडीत ते सापडले होते. मार्क्स, लेनिन, स्टॅलिन आणि माओ यांच्या विचार आणि वाङ्मयाचा अभ्यास एळवा समाजात झालेला नव्हता. एळवांचा झगडा हा वर्गकलह नसून वर्णकलह होता. तरी देखील मार्क्सचा मानवतावाद, लेनिनला, कामगारवर्गाबद्दल असलेलं प्रेम आणि निष्ठा, कम्युनिस्ट चळवळीमधला समता विचार यांची माहिती आणि समर्पित कार्यकर्त्यांचा संच यांचा मोह त्यांना जास्त पडला. जॉर्ज ऑरवेलनं 'ॲनिमल फार्म' मध्ये असं म्हटलंय की क्रांती होताच क्रांतिस्तंभावर पहिली घोषणा "All

animals are equal" अशी होती आणि त्यामुळे सर्व प्राणी फार खूश झाले. काही दिवसांनी क्रांतिस्तंभावर एक नवीच घोषणा लागली होती. "All animals are equal but some animals are more equal than others" ते वाचून भोळसट प्राणी त्यातल्या बुद्धिचापल्यानं थक्क झाले. बरेचसे भांबावले आणि विचार करू शकणारे प्राणी मात्र हादरले. कम्युनिस्ट पक्षाकडून एळवांना हाच अनुभव पुढे मिळालेला आहे. नंबुद्रीपादनी त्यांच्या आर्थिक समस्या ओळखल्या; पण सामाजिक समता आणि सन्मान यांची भूक मात्र ओळखली नाही. म्हणजेच क्रांतीचा व्यूह ते मांडू शकले, पण इतर गुंतागुंत त्यांच्या ध्यानात आली नाही. त्यांना सोयीचं होतं तोपर्यंत तेही 'नारायणगुरूकी जय' म्हणतच होते. मात्र ६० साली राजकीय परिस्थितीनं असं चमत्कारिक वळण घेतलं की नंबुद्रीपादांना Muslims are more equal than Ezhvas असं न म्हणताही तसं करण्याशिवाय गत्यंतर उरलं नाही.

इ. एम्. एस. नंबुद्रीपाद सत्ता हातात घेताना फार सावध होते. पूर्वीच्या काँग्रेस सरकारच्या भ्रष्टाचारामुळे आणि मुख्यतः एळवांच्या पाठिंब्यामुळे विजय मिळाला याची त्यांना जाणीव होती. मात्र त्यांची सुरुवातीची वक्तव्यं फार वेगळी होती. 'कम्युनिस्ट कार्यकर्त्यांनी यशामुळे हुरळून जाऊ नये; आपल्या अनेक मतदारांना आपला पुरेसा विश्वास वाटत नाही, तर थोडीशी भीतीच वाटते.' असं ते म्हणाले, 'आम्हाला न पटणाऱ्या राज्यघटनेमध्ये आम्हाला सत्ता राबवावी लागेल, तरीदेखील घटनेच्या मर्यादेत राहूनच आम्ही ती घटना बदलू' असा आत्मविश्वास त्यांनी व्यक्त केला. कम्युनिस्ट पक्षाचे मुंबईचे नेते कॉम्रेड डांगे यांनीही "केरळातले सरकार भारतीय राज्यघटनेच्या मर्यादेतच काम करणार असले तरी आम्ही कम्युनिस्ट आमच्या ध्येयापासून विचलित झालेली नाही" असा निर्वाळा दिला तर कॉम्रेड रणदिवे यांचं म्हणणं असं होतं की "केरळातल्या सरकारचे अपयश ही राजकीय दंग्याची नांदीच ठरेल!" आणि तसंच झालं. इकडे कम्युनिस्ट नेते व कार्यकर्ते आता रशिया, चीन यांच्या धर्तीवर लहान-लहान पार्टी-सेल्स मधून चालणाऱ्या लोकांच्या सरकारची स्वप्ने पाहत होते आणि काँग्रेसनं व नायर समाजानं नंबुद्रीपादच्या खुर्चीलाच खालून आग लावून दिली. आवडी येथील अधिवेशनात काँग्रेसने समाजवादी तत्त्वांचा स्वीकार केल्यानंतर केरळमध्ये मात्र कम्युनिस्टांनी समाजवाद आणावा हे नेहरूंसकट कुणालाही रुचलेलं नसावं. इंदिराबाई तर तेव्हा काँग्रेसच्या अध्यक्षाच होत्या. एळवांच्या हातात सत्ता गेल्यामुळे नायर आणि ख्रिश्चन समाज अत्यंत नाराज होता. नंबुद्रिपाद अधिकारावर आल्यापासून काही दिवसातच 'विमोचन समरसमिती' स्थापन झाली. मन्मथपद्मनाभन् हा वृद्ध नायरनेता, फादर वडाक्कन हा ख्रिश्चननेता यांनी कम्युनिस्टांनी 'मुक्त' केलेला समाज पुन्हा 'मुक्त' करायचं ठरवलं. ऐंशी हजार लोकांना अटक झाली. दहा हजारांना शिक्षा झाली. १५ लोक गोळीबारात मरण पावले आणि २८ महिन्यांची नंबुद्रीपाद यांची राजवट संपली!

यानंतर केरळमध्ये मंत्रिमंडळं कशी आली आणि कशी गेली याची माहिती पहिल्या लेखातच दिलेली आहे. इथे पुनरुक्ती न करता त्याचं विवरण करायचं आहे. ६० सालच्या निवडणुकीत काँग्रेस, समाजवादी, मुस्लिम-लीग हे तिन्ही पक्ष एकत्र आले आणि त्यांनी जवळजवळ तीनचतुर्थांश बहुमत मिळवलं. ५३$\frac{१}{२}$% मतं मिळवून ९४ जागा मिळवल्या, तर ३९% मतं मिळवून कम्युनिस्टांना फक्त २९ जागा मिळाल्या. हे आकडे ५७च्या आकड्यांशी पडताळून पाहण्यासारखे आहेत. केवळ एळवा आणि दलित यांच्या मतांवर आपण टिकणार नाही, आपल्याला कोणत्या तरी एका अल्पसंख्यांक गटाची मदत घ्यावीच लागेल, हे कम्युनिस्टांनी ओळखलं. ख्रिश्चनांची मदत त्यांना मिळणं शक्यच नव्हतं, तेव्हा मुस्लिम लीगकडे जाण्याखेरीज दुसरा पर्याय उरला नाही. अशा तऱ्हेनं मुस्लिम लीग हा मलबारपुरताच मर्यादित असलेला पक्ष मात्र फार महत्त्वाच्या स्थानावर पोहोचला. कारण मुस्लिम लीगला 'bargaining power' प्राप्त झाली. जे काही थोडे जमीनविषयक नवे कायदे नव्या सरकारने केले होते त्यांच्या अंमलबजावणीचं, पाठपुराव्याचं कुणालाही फारसं महत्त्व न वाटता सत्तेच्या राजकारणाचे हिशेब सुरू झाले.

## सत्तेचे हिशोब

कम्युनिस्टांना सत्तेपासून दूर करणारा गटदेखील पुढे काही फार काळ एकत्र राहिला नाही. पट्टम्थाणूपिल्ले ६० साली मुख्यमंत्री झाले खरे; पण थोड्याच काळात त्यांनी या तापल्या तव्यावर बसायचं नाकारून पंजाबचं राज्यपालपद स्वीकारलं— म्हणजे ते राजकीय पेन्शनीत गेले. आर. शंकर या एळवानेत्यानं मुख्यमंत्रीपद मिळताच, काँग्रेसचंच मंत्रिमंडळ असूनही नायर आणि ख्रिश्चन मंडळींनी ते पुन्हा पाडलं. ६४ साली परत एकदा राष्ट्रपतींची राजवट आली. ही वेळ येईपर्यंत कम्युनिस्ट पक्षातही काही गमतीदार घटना घडल्या होत्या. सुरुवातीच्या काळात निवडणुकीसाठी उमेदवार निवडताना त्यागी, ध्येयनिष्ठ आणि लोकप्रिय नेतेच निवडले जात असत; पण एक वेळ क्रांती कशी करायची हे कळलं तरी निवडणुका जिंकण्याचं तंत्र वेगळंच असतं. त्यामुळे योग्य उमेदवाराऐवजी 'जो निवडून येईल तोच उमेदवार' ही नाचक्की कम्युनिस्ट पक्षालाही पत्करावी लागली. कार्यकर्ते निराश होऊ लागले. कम्युनिस्टांना खूप अनुयायी असल्यामुळे संधिसाधूंचा सुळसुळाट झाला आणि मध्यमवर्गीय, सुशिक्षित पदवीधर हे कम्युनिस्ट पार्टीचं मुख्य आशास्थान बनून राहिलं. बहुजनसमाजावरची पकड हळूहळू ढिली होत चालली. त्यातच उजवे कम्युनिस्ट सतत काँग्रेसशी जमवून घेताना दिसू लागले. काँग्रेसशी जमवून घेताना ख्रिश्चनांशीही जमवून घेऊ लागले. (हे आजतागायत चालू आहे.) त्यामुळे डावा गट अस्वस्थ झाला. १९६४ मध्ये अखिल भारतीय कम्युनिस्ट पक्षात जेव्हा फूट पडली तेव्हा केरळातला कम्युनिस्ट पक्ष आधीच फुटलेला होता आणि ह्या फुटीला कोणतंही तात्त्विक कारण नव्हतं. फूट पडताना अच्युत मेनन, गोविंदन् नायर, टी. व्ही. थॉमस हे उच्चवर्णीय नेते उच्चवर्णीय नायरसमाज बरोबर घेऊन उजव्या पक्षात गेले आणि एळवा व दलित बहुजन समाज नंबुद्रीपाद व गोपालन् यांच्या बाजूनं उभे राहिले. उजव्या कम्युनिस्टांचा अंदाज असा होता की, पक्षाच्या एकूण ताकदीपैकी २०% लोकच डावीकडे जातील, प्रत्यक्षात ७५% लोक गेले होते. ६५ च्या निवडणुकांत डाव्या कम्युनिस्टांनी उजव्या कम्युनिस्टांचा धुव्वा केला. संयुक्त समाजवादी पक्ष, मुस्लिमलीग यांच्याशी

जमवून घेतलं आणि एकूण ६२ जागा मिळवल्या, तर काँग्रेस, उजवे कम्युनिस्ट व केरळ काँग्रेस यांना ७२ जागा मिळाल्या. त्यामध्ये उजवे कम्युनिस्ट फक्त ३ होते तर ६२ जणांच्या डाव्यांच्या आघाडीत डावे कम्युनिस्ट ४० होते. या परस्पर ताकदीमध्ये आजही फारसा मोठा बदल झालेला नाही. मधल्या काळात घडलेली महत्त्वाची गोष्ट म्हणजे मुस्लिम लीगमध्येही फाटाफूट झाली. उजवे कम्युनिस्ट आणि काँग्रेस यांच्या बाजूला समस्त केरळ मुस्लिम लीग हा एक गट गेला तर डावे आणि समाजवादी पक्ष यांच्याकडे दुसरा गट आला. डाव्या कम्युनिस्टांना **मुसलमानांना चुचकारून घेणं ज्या क्षणी भाग पडलं त्या क्षणी केरळातला कम्युनिझम संपला असं म्हणायला हरकत नाही. उरली ती फक्त सत्तास्पर्धा !** पुन्हा एकदा मलबार भागात मुस्लिम आणि दुसरा एक पक्ष व दक्षिण केरळात ख्रिश्चन आणि काँग्रेस अशी जुनीच विभागणी अस्तित्वात आली. नंतरच्या निवडणुकांत या परिस्थितीत त्या त्या वेळच्या राजकीय संदर्भामुळे थोडाफार फरक पडला. ६७ साली नंबुद्रीपाद यांच्या ७ पक्षांच्या आघाडीला प्रचंड बहुमत मिळालं. १३३ पैकी ११३ जागा मिळाल्या तरीदेखील ६९ मध्ये ही सर्कस संभाळण्याचा नंबुद्रीपादांना कंटाळा येऊन त्यांनी स्वतःच राजिनामा दिला. तत्पूर्वी त्यांच्या १२ मंत्र्यांनी राजीनामे सादर केले होते. केरळच्या राजकीय चित्राचे हे झालेले तुकडे अजूनही सांधले गेलेले नाहीत. ६९ सालच्या काँग्रेसफुटीमुळे आणि एका पक्षाची यात भर पडली. मध्यंतरीच्या काळात नक्षलवाद्यांचे काही ठिकाणी अयशस्वी उठाव झाले. पुढे तेही एकटे पडून नामशेष झाले. शेवटी मात्र मार्च ७१ पासून मार्च ७७ पर्यंत एक सरकार टिकलं. त्यात त्या वेळची इंदिरा काँग्रेस, उजवा कम्युनिस्ट, मुस्लिम लीग वगैरेंचा समावेश होता. मात्र ७० मध्ये केरळ काँग्रेस हा पक्ष इंडिकेट काँग्रेसच्या विरुद्ध उभा राहिला एवढाच फरक नोंदवण्यासारखा आहे.

केरळमध्ये सुशिक्षित मतदार मोठ्या प्रमाणावर असल्यामुळे मतदार भरपूर होते. त्यामुळे निवडणुकांना अवास्तव महत्त्व आले. शिवाय २० वर्षांत १४ मंत्रिमंडळे आल्यामुळे दर दोन निवडणुकांमध्ये फारसा काळ जातच नाही. मागच्या निवडणुकीतला पराभव का झाला, हे कळेपर्यंत पुढच्या निवडणुका येतात. मंत्रिमंडळ टिकवणं म्हणजे अक्षरशः तारेवरची कसरत असते. या भानगडीत डाव्या कम्युनिस्टांच्या सगळ्या पार्टी–सेल्स हे केवळ राजकारणाचे अड्डे बनले. संधिसाधू लोक तिथेही शिरले. कम्युनिस्ट शिकवणीमुळे एळवा समाजाच्या धार्मिक संस्थाही मोडकळीला आल्या. शैक्षणिक संस्थांची अवस्था दयनीय झाली. एके काळी शिक्षण ही ख्रिश्चनांची मक्तेदारी होती. नंतर नायर सेवासमितीने नायरांच्यासाठी शिक्षणसंस्था सुरू केल्या. एळवा समाज गरीब असूनही त्यांनी आपल्या शिक्षणसंस्था सुरू केल्या. मग इसाळा येऊन मुसलमानांनीही शिक्षणाकडे लक्ष पुरवायला सुरुवात केली. सत्तास्पर्धेमध्ये नायर आणि ख्रिश्चन संस्थांना कधीच धक्का लागला नाही. मुसलमान संस्थांचा तर फायदाच झाला. एका शाळेत चार विद्यार्थ्यांना जरी उर्दू, किंवा अरेबिक शिकायचं असेल तर तिथे पूर्ण वेळ शिक्षक नेमण्याचा कायदा त्यांनी करून घेतला. केरळमध्ये १५००० शाळा आहेत म्हणजे १५००० ना सहज नोकरी मिळालीच. या शिक्षणसंस्थांची सुरुवातच जातीय–



धार्मिक प्रेरणेमधन झाल्यामुळे एवढे सुशिक्षित असूनही केरळात सेक्युलॅरिझम सोडाच पण जातीजातींची जाणीवही फारशी पुसट झालेली नाही. मग एळवा, हरिजन, कोळी, शेतमजूर, विडीकामगार, विणकर या मंडळींचं काय झालं? ह्यांची स्थिती दोन्ही तीर सुटल्यासारखी झाली. धर्मसंस्था मोडल्यामुळे नारायणगुरूंचा धागा क्षीण झाला, तर कम्युनिस्ट क्रांती झाल्यानंतर त्यांना जो सन्मान आणि समता मिळेल असं वाटत होतं, त्याही तीराला ते पोहोचू शकले नाहीत. ४०% समाज स्वातंत्र्याच्या आणि समाजवादाच्या लाभापासून वंचितच राहिला.

मार्क्सच्या मते कामगार क्रांती करू शकतात. माओच्या मते छोटे शेतकरी आणि शेतमजूर क्रांती करतात. कॅस्ट्रोच्या मते कुणीही गनिमी-काव्यानं लढून क्रांती करू शकतो. तुमच्या मते कोण क्रांती करू शकतो असा प्रश्न नंबुद्रीपादना विचारायला हवा होता; पण ते हल्ली बराच वेळ दिल्लीतच असतात. त्रिवेंद्रममध्ये त्यांची गाठ पडलीच नाही. सरकारी नोकर, प्राध्यापक, सुशिक्षित बुद्धिजीवी यांच्या प्रतिक्रिया किती जळजळीत आहेत हे चौथ्या लेखात दिलेलंच आहे. एळवा आणि दलितच केरळात परिवर्तन करू शकतील. किंबहुना त्यांच्या आर्थिक व सामाजिक उन्नतीमध्येच केरळचे परिवर्तन सामावलेलं आहे. भारतीय माणसाला स्वतःचा धर्म आणि त्यामधली आपली जात हाच आपल्या व्यक्तिमत्त्वाचा मूलाधार वाटतो. एळवा समाजाकडून कम्युनिस्टांनी हे दोन्ही काढून घेतलं आणि फारसं काही दिलं नाही. 'लोकनेत्याला आपल्या अनुयायांची खरी भूक कळू नये' अशा प्रकारची शोकांतिका नंबुद्रीपादांची झालेली आहे. मुसलमानांशी जमवून घेतल्याशिवाय राज्य करताच येत नाही हा भारतीय राजकारणातला वैशिष्ट्यपूर्ण दुर्दैवी योगायोग त्यांच्याही वाट्याला आलेला आहे. दुर्दैवी अशासाठी की, त्यामुळे राजकीय कोंडी तर फुटतच नाही पण मुसलमान समाजाच्या विकासाची वाटही मोकळी होत नाही. मागासलेपणाच्या दुष्टचक्रातून तो समाज बाहेरच पडत नाही. पुढे पुढे तर पुन्हा एकदा देवळं उभी करावीत आणि पार्टी-सेल्सऐवजी देवळांच्या कमिट्या हस्तगत कराव्यात इतपत उपरती डाव्या कम्युनिस्टांना झाली. ठाणे जिल्ह्याच्या आदिवासी भागातही 'ख्रिश्चन कम्युनिस्टांऐवजी हिंदू कम्युनिस्टाला मत द्या!' असा प्रचार करण्याची पाळी मार्क्सवाद्यांवर आलीच होती. काही मार्क्सवादी विचारवंतांचं यावर असं भाष्य आहे की 'खऱ्या समाजवादी चळवळीची भूक ज्या वेळेला समाजाच्या तळाच्या स्तरातून वर येईल त्या वेळी भरकटलेले समाजवादी, साम्यवादी नेते आपोआपच मार्गाला लागतील.' भारतात हे घडणं किती कठीण आहे याची कल्पनाच करवत नाही.

काँग्रेसच्या हातून आपलं भलं होत नाही म्हणून एळवा आणि दलित कम्युनिस्टांकडे गेले. काहीजण तर श्री. नारायणगुरूंच्या मोबदल्यात गेले; पण त्यांच्या हिंदूपणावर जोर देणारी, नारायणगुरूंना मानणारी संघटना केरळात आली तेव्हा ते तिच्याकडे सहजासहजी आकृष्ट झाले नाहीत. मात्र ६८ साली जनसंघाच्या शक्तीचं प्रदर्शन होताच या तिसऱ्या अखिल भारतीय पक्षाकडे ते मोठ्या आशेनं वळले आहेत. आजही केरळ विधानसभेत जनसंघाचं कुणीही नाही. म्हणून मुख्यतः संघ हेच त्यांचं आकर्षण आहे. हे संघाचं काम केरळात कसं सुरू झालं, वाढलं आणि आकाराला आलं; एळवा व बहुजन समाजाला त्यांनी काय दिलं, त्यांच्या आकांक्षा कशा समजून घेतल्या किंवा घेतल्या नाहीत याचा विचार पुढील लेखात.

(क्रमशः)

---

## काँग्रेस, बंगलोरमार्गाने दिल्ली : पृष्ठ ८ वरून

मिळालेला नाही. जनता पक्षाशी संपर्क सोडल्याशिवाय पवारगटाला काँग्रेसमध्ये घेतले जाणार नाही. जनताबरोबर राहायचे की जनताची संगत सोडावयाची या संबंधात पवारगट काय भूमिका घेतो यावर त्याचे भवितव्य ठरणार आहे. पवारांची भूमिका मान्य केली तर जनताविरोधाची धार बोथट होते. इंदिरा काँग्रेसशी यशस्वी स्पर्धा करायची तर काँग्रेसलाही प्रखर जनताविरोधाची भूमिका घ्यायलाच हवी. तेव्हा पवारांची भूमिका बहुसंख्य काँग्रेसजनांना मान्य होण्याची शक्यता नाही. जनता पक्षातील आजची भांडणे व संघर्ष लक्षात घेता त्या पक्षाची साथ सोडणेच फायद्याचे असे दडपण पवारगटावरही येण्याचा संभव असून आपल्या भूमिकेचा फेरविचार त्या गटातही सुरू होईल.

सर्व नवे-जुने काँग्रेसजन एकत्र आल्याशिवाय प्रभावी काँग्रेस पक्ष उभा राहू शकणार नाही. जनता पक्षातील काँग्रेसजन पुन्हा काँग्रेसमध्ये येण्याची कितपत शक्यता आहे? मोरारजीभाईंची संघटना काँग्रेस, जगजीवनबाबूंची लोकशाहीवादी काँग्रेस, चरणसिंगांचा भालोद गट, चंद्रशेखर, धारिया यांचा गट हे सारे एका काळचे काँग्रेसवालेच. सध्या तरी जनता पक्षाची एकजूट टिकविण्याचा त्यांचा प्रयत्न राहील. जनता पक्षात भालोदला डावलण्यात येत आहे अशी चरणसिंगांची तक्रार आहे त्यांचा गट बाहेर पडण्याची शक्यता आहे; पण तेही घाईने निर्णय घेणार नाहीत. संयुक्त काँग्रेस, इंदिरा काँग्रेस यांच्या बळांची चाचपणी करून ते याबाबत निर्णय घेतील. बंगलोरच्या मेळाव्याने राजकीय शक्तींच्या फेरमांडणीचे एक पाऊल काँग्रेसच्या बाजूने टाकले गेले आहे, एवढेच सध्या म्हणता येईल. □

पुस्तके

# वैचारिक गोंधळाचे प्रतिबिंब

## दलित साहित्य : सिद्धान्त आणि स्वरूप

गेल्या दहा–बारा वर्षांत दलितसाहित्याची चळवळ जोमाने वाढली व पसरली. त्यामुळे दलितसाहित्यावर समीक्षा लिहिली जाणे स्वाभाविक आहे. भालचंद्र फडके, रा. ग. जाधव इत्यादींनी या चळवळीवर समीक्षा लिहिली आहे. प्रा. यशवंत मनोहर यांचे 'दलितसाहित्य : सिद्धान्त आणि स्वरूप' हे पुस्तक मात्र अधिक महत्त्वाकांक्षी वाटते. महत्त्वाकांक्षी या अर्थाने की, ते एकदम सिद्धान्त वगैरे मांडू पाहते आहे. या पुस्तकाचे दुसरे वैशिष्टय म्हणजे ते एका दलित कवीने लिहिले आहे. कलावंताची समीक्षा अधिक सखोल असण्याची नेहमीच शक्यता असते. इंग्लिश मधे इलियटचे समीक्षकांतील स्थान या सखोलतेमुळे निर्माण झाले आहे. साहजिकच पुस्तकाबद्दलच्या अपेक्षा उंचावणे स्वाभाविक होते.

मी पण हे पुस्तक सखोलता किंवा समीक्षेत नवीन काही बाजू चाचपण्याचा प्रयत्न करताना कुठेही दिसत नाही आणि संपूर्ण पुस्तक वाचून झाल्यानंतर हाती काही लागले आहे असेही वाटत नाही. असे होण्याचे महत्त्वाचे कारण हे की प्रा. मनोहरांना शेवटपर्यंत आपण जे लिहीत आहोत ते कोणासाठी व का लिहीत आहोत हेच स्पष्ट झालेले नाही असे म्हणावे लागेल. त्यांना आपले पुस्तक समीक्षक व अभ्यासकांनी वाचावे अशी इच्छा असावी. त्याच वेळेस महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी वाचून त्यांना ते कळावे अशीही इच्छा असावी. त्यामुळे नक्की पातळी न ठरवल्याने पूर्ण लिखाण विशविशीत, सिद्धान्ताला आवश्यक असलेला रेखीवपणा या शिवाय, असे झाले आहे. असे असते तरीही सहन करता आले असते. सिद्धान्तासाठी हा शैलीचा विशविशीतपणा सहन केला असता; पण आत सिद्धान्तच नसल्यामुळे हे पुस्तक वाचणे म्हणजे खोबरे आत नसताना शेंड्या उपटत बसण्याइतके निरर्थक झाले आहे.

'दलितसाहित्याची मूलगामी भूमिका व सौंदर्यशास्त्र मांडणारा हा मराठीमधला पहिलाच ग्रंथ आहे. 'दलितसाहित्यासंबंधीच्या समग्रच प्रश्नांची चर्चा मनोहरांनी मोठ्या मर्मग्राही शैलीने केलेली आहे.' हे वामन निंबाळकर प्रकाशकीयातच सांगतात. त्यामुळे पुस्तक लहान असले तरी प्राध्यापकमहाशयांनी खरंच काही तरी लिहून ठेवलेलं दिसतंय असं मनात येतं. अनुक्रमणिकेत, दलितसाहित्य : सिद्धान्त आणि स्वरूप, शोषितांच्या उत्थानाचे चरित्र, दलित साहित्याची प्रेरणा, कलावाद आणि कलावादी इ. निबंध आहेत. विषयांची विविधता पहाता ते पूर्वी प्रसिद्ध झाले असावेत असे वाटते. ही एकाच पुस्तकातील प्रकरणे नाहीत हे निश्चित. मी येथे दलित साहित्य : सिद्धांत आणि स्वरूप या निबंधाबद्दल व इतर सैद्धान्तिक निबंधांविषयी लिहिणार आहे. प्रयत्न त्यातून काही डोळ्चांसमोर उभे राहते का हे पाहण्याचा आहे.

दलित कोण येथून सुरुवात करणे आजही दलितसाहित्याविषयी लिहिणाऱ्याला भाग पाडते. मनोहरांनी दलितांच्या निरनिराळ्या सहा व्याख्या देऊन काही सर्वमान्य असे निष्कर्ष काढले आहेत. कुठल्याही व्याख्येच्या अव्याप्ततेची किंवा अतिव्याप्ततेची चर्चा नाही. एकाखाली एक सहा व्याख्या देऊन काढलेले निष्कर्ष असे :– (१) दलित हा शोषित आहे. (२) उच्चवर्णीयांनी त्याचे शोषण केले आहे. (३) आत्मा, ईश्वरकर्मविपाक ही त्यांची शोषणाची साधने आहेत. (४) स्वातंत्र्य, संधी, समता यांच्या अभावी माणुसकीच्या मूलभूत हक्कांना पारखा झालेला कुठलाही मानव दलित होय.

निष्कर्ष १ व २ यांचा मिळून एक निष्कर्ष होणेच तर्कसुसंगत आहे. कारण शोषित आहे हा एक आणि शोषण केले आहे हा दुसरा वेगळा निष्कर्ष कसा काय होऊ शकतो? सर्वच व्याख्या अत्यंत पसरट आहेत. एक–दोन व्याख्यांचा अपवाद वगळल्यास त्यासंबंधी मनोहरांना काहीही म्हणावयाचे नाही. खुद्द मनोहरांचीच व्याख्या अस्पष्ट आहे. 'शोषितांची जात शोषित. शोषणाच्या सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक इ. सर्वच प्रकारांनी काळोखलेले शोषितांचे सर्वच नातेवाईक घटक हे 'दलित' होत, ह्या व्याख्येवरून काय बोध होतो? बोध होतो तो एवढाच की अजूनही शत्रू–मित्र अशा रेषा आखता येत नाहीत आणि या अडचणीपोटीच मनोहरांनी कुठल्याही व्याख्येचे विश्लेषण व मर्यादादर्शन केले नाही. इतकेच नाही तर 'हे चित्र कालचे आहे' असे लगेच ते म्हणतात; पण आजचे चित्र काय आहे हे न सांगता एकदम उद्याच्या संकल्पांचे रंग शोधायचा प्रयत्न करतात. सैद्धान्तिक लिखाणाला लागणारी स्पष्ट भूमिका घेण्याची तयारी विशेषत: आजच्या परिस्थितीच्या संदर्भात विरोधक कोण, कोण कुठपर्यंत सहभागी होतील याचे भान व ज्ञान नसल्याने त्यांचे स्वागत वा त्यांच्यावर टीका असा काहीही प्रयत्न मनोहरांनी केलेला नाही.

जो गोंधळ 'दलित'– व्याख्येबद्दल तोच 'दलित–जाणिवे'बद्दल. सहा व्याख्या व त्यांचे साधारण निष्कर्ष देऊन लेखक थांबला आहे. आपल्या मताहून एखाद्याची वेगळी व्याख्या असली तरी आपला त्या मुद्द्याला विरोध लेखकाने मांडलेला नाही. उदाहरणार्थ गो. पु. देशपांड्यांच्या व्याख्येत नागरसंवेदना व नागर संवेदनेपलीकडे असलेली दलितसंवेदना असा फरक केला आहे; पण हा फरक नागर व ग्रामीण असा होतो. ग्रामीण व ग्रामीणाच्या पलीकडील असा होत नाही. तसा होतो असे मानले तरी मग तो फरक ग्रामीण व आदिवासी असा आपला समाजात होतो. गावकुसाबाहेर असले, तरी दलित या ग्रामीणाचाच भाग आहे. त्यांची संवेदनशीलता पलीकडे नसून इथलीच आहे आणि इथेच न्याय मिळवू इच्छिते. ती पलीकडे असती तर संघर्ष होण्याचे कारणच नव्हते;

पण असे कुठलेही मतभेद लेखकाने मांडलेले नाहीत. बहुधा लेखकाचा समन्वयित निर्णय-पद्धतीवर विश्वास अत्यंत प्रगाढ असावा.(!)

याच्याही पुढे जाऊन मनोहरांनी दलित-साहित्याच्या बारा व्याख्या देऊन असे म्हटले आहे की, 'हा महत्त्वाचा समग्र विचार जर आपण लक्षात घेतला तर दलित-साहित्य हे आता मराठी साहित्यातील स्वतंत्र कलादर्शन झालेले आहे ह्याची जशी खात्री पटेल तसे ते सांस्कृतिक आणि सामाजिक परिवर्तनाचे क्रांतिकारक व युगप्रवर्तक असे जीवनाचे सुसभ्य तत्त्वज्ञान झाले आहे, ह्याचेही प्रत्यंतर येईल.' हे म्हणणे म्हणजे कॅरेक्टर सर्टिफिकेट-वरून एखादी व्यक्ती महान होती असे ठरवण्यासारखेच आहे. साहित्याला अशी सर्टिफिकिटे बहाल करणे हे समीक्षकाचे, वाचकाचे काम नाही. त्यांनी ते वाचले पाहिजे, अनुभवले पाहिजे ही मूलभूत व पुरातन भूमिकाच मनोहरांनी नाकारली आहे आणि त्यांची स्वतःची जर हीच पद्धत असेल (आणि ती असावी अशी शंका येण्यास जागा आहे) तर समीक्षक म्हणून मनोहर स्वतःची विश्वासार्हता गमावून बसतात.

## नेमकेपणाचा अभाव

व्याख्या अव्याप्त, अतिव्याप्त, एकांगी असू शकतात, त्यांच्या या मर्यादा लक्षात आणून देऊन नवीन व्याख्येचा प्रयत्न करणे किंवा आहे त्यापैकी पूर्ण व्याख्येचे पूर्णत्व उदाहरणासहित स्पष्ट करणे, यातून मनोहरांच्या शैलीत लिहावयाचे झाल्यास, सिद्धान्त सिद्ध होत असतो; पण असा प्रयत्न कुठेही केलेला आढळत नाही.

या लिखाणातला दोष म्हणजे कुठेही उदाहरणे नाहीत. स्तुती करताना नाहीत तशीच टीका करतानाही नाहीत. स्तुती करताना किमान लेखकांची नावे तरी आहेत; पण टीका करताना तेही नाही. त्यामुळे टीका कोणावर चालली आहे ते कळणे कठीण. कदाचित आयुष्याच्या या स्टेजला मनोहरांना कुणाला दुखवावयाचे नसेल; पण समीक्षतील टीकेमुळे माणसे दुखावतील ही भीती व ती तशी दुखावणे दोन्ही बालिशच; पण ते या पुस्तकात आढळते हे खरे. 'सोफिस्टिकेटेड साहित्य म्हणजे शिष्ट साहित्य. शिष्ट साहित्य म्हणजे प्रस्थापित व्यवस्था प्रमाण मानणारे साहित्य आणि प्रस्थापित साहित्य म्हणजे दलितांना दलित ठेवू इच्छिणाऱ्या जीवननिष्ठांचे साहित्य (पृ. १७), यावरून कुणाविरुद्ध तलवारबाजी चालली आहे याचा बोध होतो का ?

जो प्रकार साहित्याच्या बाबतीत तोच येथील चळवळींच्या संदर्भात. जेथे विश्लेषण करण्याची आवश्यकता भासेल तेथे मनोहर काही तरी करून मुद्दाच टाळतात आणि पुन्हा काहीच न झाल्यासारखे दाखवत लिहीत राहतात. उदा. 'मार्क्ससंबंधी सदरील मजकूर लिहिण्याचे प्रयोजन असे की, दलितसाहित्यासंबंधीच्या विचारात मार्क्स ही जागा मोठी वादाची, मोठी कलहाची आणि दलित-साहित्यात दक्षिण आणि उत्तर असे दोन गोलार्ध निर्माण होण्याचे महाविनाशकारी संकट येईल की काय अशी सखेद चिंता जाणकारांना वाटावी इतकी मर्माची आहे. असे असण्याचे खरे तर काहीच कारण नव्हते. खरे तर असे आहे की, ज्यांच्या वैचारिक आणि ललितलेखनाशिवाय दलितसाहित्याला कणा किंवा अधिष्ठानच प्राप्त झाले नसते असे बाबुराव बागुल, म. ना. वानखेडे, वामन निंबाळकर, नामदेव ढसाळ, दया पवार, अर्जुन डांगे, कसबे, इ. लेखक मार्क्स-बद्दल अत्यंत डोळस आदर बाळगतात.' (पृ. १८). बगल द्यावी तर अशी. मार्क्सची जागा दलितसाहित्यात मर्माची आहे. कारण काहींना मार्क्स हा मित्र मार्गदर्शक वाटतो, इतरांना नाही. ज्यांना तो मित्र मार्गदर्शक वाटतो ते थोर आहेत. म्हणून मार्क्स दलित-चळवळीला मारक नाही असे पुन्हा एक सर्टिफिकेट बहाल करण्यात आले आहे. पुढे मार्क्स मानवतावादीच होता असेही म्हटले आहे. ही भाषा आणि सर्वोदयवाल्यांची मार्क्स हा मानवतेचा महान ऋषी आहे अशी भोंगळ भावनोद्दीपक भाषा यात काय फरक आहे ? आणि जे सर्वोदयवाल्यांच्या भाषणात खपते ते एखाद्या सैद्धान्तिक विवेचनात कसे खपून जाईल ? पण असले भान मनोहरांना कुठेही राहिल्याचे चिन्ह दिसत नाही. म्हणूनच 'तेव्हा जाणकार दलितसाहित्यिक मार्क्सचा आदर बाळतात म्हणून दलितसाहित्याच्या वाचकांनी खचण्याचे कारण नाही. कारण दलितसाहित्यिक मार्क्सचा आदर बाळगतात म्हणून येथील मार्क्सवाद्यांनी हुरळून जाण्याची कुठलीही सोय नाही. (पृ. २२) अशी विनोदी वाक्ये येतात. खरे मार्क्सवादी खऱ्या आंबेडकरवादाचे शत्रू नसतात हे मनोहरांनी खऱ्याचे खोटे शत्रू, खोट्या आंबेडकरवादाचे खरे मार्क्सवादी शत्रू वगैरे अशी चमत्कृति-पूर्ण मांडणी करून कल्लोळ माजवला आहे. एकूणच पुस्तकभर हा किमान अर्थ प्रस्तापित करण्यासाठी कमाल कठीण शब्द व वाक्य-रचना वापरली आहे. अशा चमत्कृती साधतानाच अर्थाचे घोळ केले आहेत. लोकशाही समाजवाद मानणारे आंबेडकर मार्क्सविरोधी होते म्हणूनच त्यांनी मार्क्सची अफूची गोळी स्वीकारली, कामगारांची हुकूमशाही नाकारली; पण असे स्पष्ट लिहिल्याने कदाचित मनोहरांच्या मते मार्क्सवादी दुखावणार असतील. तेव्हा खरे तर असे आहे की दलित-साहित्यावर महाविनाशकारी संकट यायचेच असेल तर मार्क्सच्या आग्रहामुळे किंवा आंबेडकरांच्या आग्रहामुळे येणार नाही तर अशा अर्थशून्य परस्परविरोधी विधाने करून त्यांना सिद्धान्त वगैरे जड नाव देणाऱ्यांमुळे येणार आहे. वैचारिक भेदांमुळे साहित्याचे किंवा विचाराचे नुकसान होत नाही; पण वाटेल तसा विचार फिरवण्याच्या सवयीमुळे प्रत्येक विचाराची शुद्धता, त्याचो कारणे, परिणाम यांचा ताळमेळ लागत नाही व वैचारिक गोंधळ माजून विचाराचे, चळवळीचे नुकसान होते.

काही वेळेस तर मनोहरांना आपण एखाद्या विचाराचे नेमके काय करावे, त्याची उपयोगिता कशी सिद्ध करावे हेच कळत नाही. मग ते तो विचार लक्षात ठेवलेला बरा असे म्हणतात. आनंद यादवांचा प्रादेशिक व ग्रामीण साहित्यातील फरक लक्षात ठेवलेला बरा असे म्हणत असताना त्याचा दलितसाहित्याचा विचार करताना काय उपयोग करायचा ते मात्र मनोहर सांगत नाहीत. वाचकांनी किती ठिकाणी मनोहरांच्या मते काय असेल याचा अंदाज घेत बसायचे ?

एका ठिकाणी मनोहर थोडी सैद्धान्तिक चर्चा करताना आढळतात आणि ऐसपैस भाषा वापरण्यामुळे परत चुकतात. दलितसाहित्याच्या प्रयोजनाची चर्चा करताना निर्मिति-प्रक्रियेमागील प्रयोजन व निर्मितिप्रक्रियेचे प्रयोजन असा भेद त्यांनी केला आहे. येथपर्यंत ठीक आहे; पण ते तेव्हा दोन्ही एकाच प्रयोजनाचे दोन पदर नसून दोन

भिन्न पातळ्या आहेत; पहिली पातळी प्रक्रियेमागील प्रयोजनाची पातळी– तीच राहून निर्मिती प्रक्रियेचे प्रयोजन बदलल्यास वेगळी कलाकृती निर्माण होऊ शकते हे त्यांनी लक्षात घेतले नाही. आकृतीबंध तोच ठेवून आशय बदलायचा किंवा आशय तोच ठेवून आकृतिबंध बदलायचा ही भाषा कळायला सोपी असली तरी निर्मितिप्रक्रिया पूर्णपणे न समजल्याचे द्योतक आहे. आशय म्हणजे लोणचे नव्हे की, जे कुठल्याही बरणीत भरून ठेवावे. प्रत्येक आशय स्वतःचा आकृतिबंध शोधत, सिद्ध करीत येतो. आपण नेहमीच कलेचा आशय कलाविधान व आकृतिबंध यांचा विचार करताना गोंधळ करत असतो. आशय व विधानात फरक आहे. त्या दोन वेगळ्या गोष्टी आहेत.

ह्या आहे ' दलितसाहित्यः सिद्धान्त आणि स्वरूप ' या निबंधाचा परामर्श. यात चर्चिलेल्या मुद्द्यांना धरूनच, ' दलितसाहित्याची प्रेरणा ', ' दलितसाहित्याची पार्श्वभूमी ' हे निबंध लिहिलेले आहे. पुस्तकात जरी पुनरुक्ती झाली असली तरी लेखात होऊ नये म्हणून इतर निबंधांकडे वळतो.

## इतर महत्त्वाचे निबंध

' दलितसाहित्यः सामाजिक बांधिलकीचा प्रश्न ' या निबंधात साहित्याला सामाजिक कर्तव्ये असावीत काय ? त्यांचे न्याय्य स्वरूप कोणते असावे ? आजच्या साहित्यात कोणत्या सामाजिक कर्तव्यांचा म्हणजे जीवनमूल्यांचा आविष्कार होतो ? असे तीन प्रश्न मांडले आहेत. त्यामुळे सुरूवात प्रभाव पाडते; पण नंतरचे विश्लेषण ठोकळेबाज पद्धतीने येते. प्राचीन मराठी साहित्यात अभिरुचीची अनेकता व अनेकस्तरीयता आढळत नाही असा लेखकाचा निष्कर्ष चूक आहे. सर्व समाज जरी ईश्वरवादी असला तरी अनेकश्वरवादी एकेश्वरवादी (शैव, वैष्णव) अशा व इतर वादांमुळे जगाकडे पाहण्याचा दृष्टिकोण वेगळा होता. याच काळात मुस्लिमांचे पीर वगैरे जन्मास आले. याच काळात संत वाङ्मय निर्माण झाले. तेव्हाच रामदासांचा दासबोध निर्माण झाला. या सर्व जाणिवा भिन्न आहेत. त्या कलावंताला जाणवत असतात व रसिकाला जाणवायला हव्यात. या सूक्ष्म भेदांना महत्त्व नसते, तर इलियट अँग्लो कॅथालिक न होता कॅथालिक झाला असता म्हणून हे सूक्ष्म भेद मनात जपण्याची आवश्यकता. अन्यथा योग्य ते चित्र डोळ्यांसमोर उभे राहत नाही.

ह्याच निबंधात पुढे खरा कलावंत जाती धर्म, वर्ण, पक्ष अशा विषारी विळख्यात सापडत नाही असे म्हटले आहे. हे एकदा मान्य झाले म्हणजे फॅसिस्ट कला, कम्युनिस्ट कला आणि याच पद्धतीने दलित कला उरत नाही. सर्व महान कलाकृती अशा कुठल्याही लेबलपुरत्या नसतात. दुय्यम दर्जाच्या कलाकृतींसाठी ही लेबले योग्य होत; पण दुय्यम दर्जाच्या कलाकृतींचा विचार समाजशास्त्रज्ञाने करणे योग्य. सौंदर्यशास्त्र व समीक्षेचा तो विषय नाही. ही भूमिका मनोहर वेगळ्याच पद्धतीने मांडतात. आधी फॅसिस्ट कला वगैरे पुष्कळ लिहून घेतल्यावर अशा प्रकारची भूमिका ते मांडतात. त्यांची भूमिका नक्की कोणती हे कळणेच यामुळे कठीण होते.

यानंतरचा महत्त्वाचा निबंध आहे ' कलावाद आणि कलावादी.' या निबंधात केवळ शब्दच्छल करून कलावादासंबंधी नवीन भूमिका मांडण्याचा आभास निर्माण केला आहे. आर्ट आर्टिस्ट (आर्टिझम्) अशी एक मनाशी रचना करून त्याचे मराठीकरण करण्याचा हा प्रयत्न आहे. त्यामुळे नवीन असे काहीच साध्य होत नाही. कलेसंबंधी बोलणारा, विचार करणारा तो कलावादी अशा आधीच्या कलावादी या भोंगळ शब्दापेक्षाही भोंगळ अर्थ त्या शब्दाला देण्याचा प्रयत्न मनोहरांनी केला आहे. मग आजवर ज्याला कलावाद संबोधले त्याला मनोहर जीवनविन्मुख कलावाद म्हणतात. कलावाद या शब्दात हेच अभिप्रेत नसते का ?

जीवननिष्ठ कलावाद :– पुरोगामी, गतिशीलत्व समर्थक, लौकिकतावादी, कारण इहवर्धक, विस्थापितांचा शोषितांचा साथी, इहसौंदर्य, सुसंगती, सुरूपतावादी, बुद्धिवादी, अंधश्रद्धांचे धुके वितळवणारा, स्वातंत्र्यवादी, न्याय्य मूल्यांचे काळीज बाळगणारा. इ. ( पृ. ८० ) ही सर्व वर्णने औद्योगीकरण झालेल्या सुजाण व्यक्तीला लागू पडू शकतात. त्यात मग एक दोन गोष्टी वगळल्या जातीलच उदा. विस्थापितांचा शोषितांचा साथी ही बाब सोडल्यास भांडवलदार या प्रकारचेच असतात. प्रगत भांडवलशाहीतील भांडवलदार फोर्ड, रॉकफेलर, टाटा हे जीवननिष्ठच मानावे लागतील. हेच जर नव्या पद्धतीने मांडणी करून सिद्ध होत असेल तर केवळ नव्या मांडणीच्या हव्यासपोटी ही मांडणी केल्याचे जाणवते.

आता इतर कमी महत्त्वाचे ( या अर्थाने की त्यांच्या चर्चेतून निष्पन्न काही होणार नाही ) लेख वगळून ' दलितसाहित्याचे सौंदर्यशास्त्र ' या बावीस कलमी भूमिकेकडे वळतो.

यापैकी पहिल्या कलमातच मनोहरांनी दलितांचे कलाविश्व मर्यादित करून टाकले आहे. ' दलितसाहित्य म्हणजे दलित कलाविश्व ' असे नाही. नाटक जसे साहित्य आहे तसेच ते परफॉर्मिंग आर्ट आहे, गाण्याचे प्रकार आहेत, जलसे आहेत. हे दलितांचे कलाविश्व आहे. साहित्य एक प्रकार आहे. ही बावीस कलमं खरं तर कमी करून आठ–दहा कलमांत सर्व भूमिका मांडता आली असती; पणमग बावीस या संख्येचे वजन व वेगळेपणामुळे समजण्याची सहजता गेली असती. इथे पुन्हाएकदा हे पुस्तक महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी लिहिले आहे की काय अशी अस्पष्ट शंका येते. हीच जाणीव ' कलावाद व कलावादी ' या निबंधाच्या शेवटी काढून दिलेल्या सात निष्कर्षांमुळे वाटते.

या पुस्तकाचा मूळ दोष ते मनोहर यांनी लिहिलेले आहे हा आहे. मनोहर हे एक चांगले कवी आहेत. त्यांचा शब्दसंग्रह व शब्द जुळविण्याची हातोटी कौतुकास्पद आहे. पण नेमक्या याच गोष्टी सैद्धांतिक लिखाणाला मारक ठरतात. शब्दवैभव दाखवल्यामुळे सिद्धान्त सिद्धान्त होत नाही. त्याला आवश्यक ते कठोर तर्कशास्त्र, रेखीव व कातीव असे विवेचन कुठल्याही संदिग्धतेला थारा न देणारी भाषा यामुळे सिद्धान्त स्पष्टपणे मांडता येतात; पण मनोहरांची भाषा अशी ' कला ही कलावंताच्या पोटी जन्माला येत असते आणि कलावंत समाजाच्या पोटी जन्माला येत असतो. प्रपंचवृक्षावर फुलणारी पुष्पलीला म्हणजे कला, अशा भाषणांमध्ये वापरायच्या भाषेमुळे ' दोस्त व मित्र ' अशा निरर्थक द्विरुक्ती होताना आढळतात.

दुसरा महत्त्वाचा दोष म्हणजे मनोहर सर्व सुधारणा 'कर्मविपाक संपविणे' येथेच थांबवतात. प्रश्न आज जे नवीन मिश्रण औद्योगीकरणामुळे उभे झालेय त्याविरुद्ध लढा देण्याचा आहे. त्याविषयी मनोहर मूक आहेत. कदाचित त्याविषयी लिहिल्यास लोक मार्क्सवादी असे लेबल लावतील अशी शंका त्यांना वाटत असावी; पण या मर्यादेमुळे पुस्तक अपुरे वाटते.

पुस्तकनिर्मिती घाईतच उरकली असावी. शुद्धलेखनाने ताळतंत्र सोडले आहे. लक्ष्मणशास्त्री जोशी कर्कतीर्थ आहेत असे या पुस्तकामुळेच कळले. दलितविचारवंताच्या डोक्यातील वैचारिक गोंधळाचे हे पुस्तक एक उदाहरण आहे.

– वसंत कागलकर

**दलित साहित्य**
सिद्धान्त आणि स्वरूप
यशवंत मनोहर
प्रबोधन प्रकाशन, नागपूर
पृष्ठे – १२६, किं. रु. १२

दूरचित्रवाणी

# आभास

## एक आटोपशीर नाटिका

गुरुवार दि. २८ जून या दिवशीची दूरचित्रवाणीवरील एक नाटिका—'आभास' एक शोकसभेचे दृश्य. अजय कर्वे या हुतात्म्याच्या निधनानिमित्त शोकसभा; असे दृश्य होते. आता लवकरच, मध्यमवर्गीय लोक उपचारापुरता मृत्यूचा शोक कसा व्यक्त करतात, एखाद्याच्या मृत्यूचे कसे भांडवल करतात, मध्यमवर्गीय लोक ढोंगी, मतलबी असतात वगैरे बघायला लागणार असे वाटत होते; पण घडले वेगळेच. एका सुजाण कलाकृतीच्या दर्शनाने वीस-पंचवीस मिनिटे अगदी खिळवून ठेवले.

ही होती एका निष्क्रिय परंतु समंजस, काही तत्त्वे पाळणाऱ्या मुलाची कथा. अजय कर्वे हा मुलगा जेमतेम सत्तेचाळीस टक्के गुण मिळवून S. S. C. परीक्षा उत्तीर्ण होतो. वडील चिडतात; पण ओळखी लावून सायन्स, कॉमर्सला प्रवेश मिळविण्याची धडपड करण्याची तयारी दाखवितात. ते न पटून तो आर्टस्लाच जातो. तेथेही अभ्यास करीत नाही. कॉलेजमध्ये काही नाटके करतो. यातही शिस्त, टापटीप नाही. कोणती तरी थीम निवडून उत्साहाने काही तरी करतो. मुलांमध्ये लोकप्रिय होतो; पण मिळवीत काहीच नाही. बरोबरीचे मित्र उत्तीर्ण होतात. हा दोनदा अनुत्तीर्ण होतो. नोकरीला लागतो. अधिकाऱ्याचे पैसे खाणे त्याच्या तोंडावर बोलून दाखवतो. नोकरी सुटते. वडील, प्रेयसी पुनःपुन्हा सांगतात; 'काही तरी चिकाटीने कर!' भोवतालची सगळी परिस्थिती सांगते 'काही तरी कर!' मित्रांच्या लेखी आपली किंमत 'टाइम पास करायला छान' एवढीच आहे हेही त्याला कळते. त्याला वाटते या सगळ्यांपेक्षा मोठे व्हावे! त्यासाठी एखाद्या संस्थानिकाचा खून करावा. तो केला की आपण फाशी जाऊ, शोकसभा होईल. आपल्या नावाचा जयजयकार होत, मिरवणूक निघेल, असे स्वप्न तो पाहू लागतो. मग त्याच्या लक्षात येते. त्यासाठी पिस्तुल वगैरे जमवाजमव हवी. शिस्तीत काम करायला हवे! त्यापेक्षा या सर्वांवर एक नाटकच लिहू या! नाही तर नकोच! एखाद्या चांगल्या नाटककाराला ही थीम सांगून टाकावी हेच बरे!

या प्रकारचा विषय आजकाल बऱ्याच नाटकांतून विशेषतः छबिलदासच्या रंगमंचावर होणाऱ्या नाटकांतून आढळतो. परंतु बहुतेक वेळी तो चलनी नाणे म्हणून वापरलेला असतो. त्यात एक प्रकारची सांकेतिकता असते. त्या सांकेतिकतेने या नाटकाला ग्रासले नव्हते. एखाद्याने विषय जाणून घेऊन प्रश्नाचे उत्तर लिहिणे वेगळे आणि गाइडचे शब्द तसेच आपल्या उत्तरात उठविणे वेगळे. श्री. लोकेश शेवडे यांनी आतून जाणवून ही नाटिका लिहिली होती. त्यामुळे सांकेतिकेतून येणारी निर्जीवता येथे नव्हती.

अजय कर्वे या मुलाचे कर्तृत्वहीन व्यक्तिमत्त्व दाखविताना त्याच्या भोवतालच्या समाजाचे चित्र दाखविले होते. त्यात स्वतःच्या मुलाची कुवत ओळखून असणारे, काही तरी निश्चित असे कर म्हणून पोटतिडिकेने सांगणारे वडील होते. महाविद्यालयाची मुले, त्यांच्या गप्पा, हॉटेल, नाटके, परीक्षा असे महाविद्यालयाचे जग होते. या निरनिराळ्या चित्रांत एकसंधत्व होत. (हे एकसंधत्व हल्ली दुर्मिळ होत चालले आहे. म्हणून आवर्जून उल्लेख.) त्या सगळ्यातून 'अजय'च्या व्यक्तिमत्त्वावर प्रकाश पडत होता. निरनिराळ्या व्यक्तींच्या संदर्भात अजयचे वागणे वेगळे होते. 'नीट चिकाटीने काही तरी कर' ही एकच गोष्ट वडील आणि प्रेयसी त्याला सांगत होते; पण दोघांच्या बाबतीत अजयचे वागणे मात्र वेगळे होते. वडिलांपुढे तो मवाळ होता, तसा प्रेयसीपुढे मवाळ नव्हता. पण म्हणून प्रेयसीपुढे मुजोर किंवा शिरजोरही वाटला नाही. या बदलामध्ये कृत्रिमत्ता नव्हती. स्वाभाविकता होती.

लेखकाला जे काही सांगायचे होते ते कोणत्याही प्रकारचा फाफटपसारा न मांडता आटोपशीरपणे दाखविले होते. लेखकाजवळ सांगायला एवढेसे काही तरी असते ते उगाच घोळवून घोळवून विस्तार करून सांगायचे, असे दूरचित्रवाणीवरील बऱ्याच नाटिकांमध्ये घडते. तर कधीकधी विशेषतः दूरचित्रवाणीवरील मुलाखतीत, मुलाखत देणाऱ्याघेणाऱ्यांजवळ सांगण्यासारखे खूप काही असते; पण वेळच अपुरा पडतो. तसे या नाटिकेत झाले नाही. नाटिकेच्या विषयाचा आवाका आणि वेळ यांचे काळ, काम व वेगाचे गणित बरोबर जमून गेले होते. त्यामुळे असेल किंवा अन्य कोणत्या कारणाने असेल दू. चि. वा. (T. V.) हे या नाटिकेसाठी अगदी योग्य माध्यम वाटले.

अगदी काटेकोरपणे पाहता एक-दोन गोष्टी खटकल्या. 'आई' या पात्राला विशेष कामगिरीच नव्हती. आईची 'वेडी माया' दाखवायची आहे हे कळत होते; परंतु ती प्रतीती देणे जमले नव्हते. ती भूमिका वगळली असती तरी चालले असते. दुसरी खटकलेली गोष्ट म्हणजे 'काही तरी कर' असे शब्द घुमवीत असणारा मुलांचा 'मॉबसीन.' नाटिकेच्या प्रकृतीशी ते विसंगत होते. अजयभोवतालचे सामाजिक दवाव येथे 'छबिलदासी' सांकेतिक पद्धतीने व्यक्त झाले. दूचिवावरीलच काही वर्षांपूर्वीच्या रत्नाकर मतकरींच्या 'आरण्यक' या नाटकातील एक दृश्य आठवले. धृतराष्ट्राभोवती फेर धरून काही व्यक्ती एका गंभीर सुरात म्हणत होत्या 'सोडून जा!' 'सोडून जा!' त्यांच्या हातांच्या मुद्रा (poses) तेव्हा कमानीसारख्या दाखविल्या होत्या. त्यामुळे राजवाड्याच्या कानाकोपऱ्यातून कमानीकमानीतून हे शब्द धृतराष्ट्राला ऐकू येत आहेत अशी प्रचीती येत होती आणि ती आविष्कारशैली आशयाशी अतिशय सुसंगत वाटत होती. तसा प्रस्तुत नाटिकेतील 'मॉबसीन' काही विशेष आशय प्रभावीपणे व्यक्त करतो आहे असे वाटत नव्हते. आधीच्या दृश्यात वडील आणि प्रेयसी यांचे आवाज दाखवून त्याच्या मनावरील ताण व्यक्त झाले होते. त्यातच मित्रांचेही मिसळले असते की, काम भागले असते.

अजयच्या मनातले 'आभास' दिसत होते म्हणून नाटिकेचे 'आभास' हे शीर्षकही योग्य वाटले.

निर्मितीप्रमुख विनायक चासकर, निर्मितीसाहाय्यक मीना गोखले, लेखक श्री. लोकेश शेवडे आणि इतर सर्व कलाकार यांनी यापुढेही अशीच दर्जेदार कलानिर्मिती करावी ही इच्छा. लेखक श्री. लोकेश शेवडे अगदीच पोरगेले पंचवीसच्या आतीलच आहेत हे कळल्यावर विशेष कौतुक वाटले. दूरचित्रवाणीने ही नाटिका सवडीनुसार पुन्हा एकदा दाखवावी.

—विनया खडपेकर

# चित्रपटाबाहेर....

## काळाबाजारवाले ' ड्राइव्ह इन ! '

चित्रपटगृहांच्या आवारात हल्ली चित्रपटांच्या तिकिटविक्रीइतकेच त्या तिकिटांचा काळाबाजार करणारेही प्रतिष्ठितपणे वावरत असतात. ते त्या वातावरणाचा एक भागच बनून गेलेले असतात. नुकताच मुंबईतील एका चित्रपटगृहाच्या मॅनेजरचा, काळाबाजार करणाऱ्यांना तिकिटं द्यायचं नाकारलं म्हणून खूनही करण्यात आला. त्यामुळे आता ज्या ठिकाणी काळाबाजारवाल्यांच्या बडचा गॅंग्स् आहेत अशा चित्रपटांना चांगले मॅनेजर मिळणं कठीण होऊन बसलं आहे.

मुंबईतले हे काळाबाजारवाले आता बांद्रचाच्या ड्राइव्ह–इन थिएटरमध्येही घुसले आहेत ! खरं म्हणजे या थिएटरमध्ये प्रवेश करायलाच ४ रु. पडतात, कार-पार्किंगबद्दल २ रु. द्यावे लागतात आणि नंतर कारमध्ये बसूनच प्रत्यक्ष चित्रपटाची तिकिटं खरेदी करावी लागतात; पण काळाबाजारवाल्यांनी हे सर्व अडथळे पार केले आहेत.

यापैकी बहुतेकांच्या स्वतःच्या पॉश कार्स आहेत. ' ड्राइव्ह–इन 'मध्ये ते या गाडया घेऊन मोक्याच्या ठिकाणी ते उभे राहतात. एखादा कुटुंबवत्सल माणूस जेव्हा थिएटरमध्ये शिरतो तेव्हा त्याला ' हाउस फुल्ल ' दिसतं. (म्हणजे गाडचा लावायला कुठेच जागा नसते.) मग एखाद्या गाडीमधून १५ रु. ला एक, याप्रमाणे तिकिटं ' ऑफर ' केली जातात. एवढया लांबवर येऊन परत जाण्यापेक्षा हा सौदा त्याला बरा वाटतो. कारण नाही म्हटलं तरी तो कारमधून आलेला माणूस. तो तिकिटं ' विकत ' घेतो. शेजारची गाडी बाजूला निघते, हा आपली गाडी सुस्कारा टाकत आत घुसवतो आणि पार्किंगबद्दल शेजारच्या गाडीवाल्याच्या हातावर पाच रुपयांची एक नोटही टेकवतो. कमाईचा हिशेब करत शेजारचा गाडीवाला अदृश्य होतो. ' कुटुंबा 'बरोबर सिनेमा पहात तो गमावलेले पैसे विसरू पहातो.

## ' शोले '–पाचव्या वर्षात पदार्पण

बऱ्याच वेळा चित्रपटांचा दर्जा ठरवताना तो किती काळ चालला यालाही पुष्कळच महत्त्व दिलं जातं. कारण त्यावरून त्याची आणि पब्लिकचीही ' टेस्ट ' कळते. शिवाय कलेचा कितीही डंका पिटला तरी बॉक्स ऑफिसरवरही एक डोळा ठेवावा लागतोच. कारण त्यावरच पुढला चित्रपट उभा राहणार असतो.

आता सलीम–जावेदच्या पटकथा असलेले बहुतेक चित्रपट किमान एक वर्ष तरी चालतातच; पण त्यांच्या ' शोले 'ने मात्र अगदी कहर केलाय ! मुंबईतील ' मिनर्व्हा ' टॉकीजमध्ये या फिल्मचं पाचवं वर्ष चालू आहे. यापूर्वी कोणतीही फिल्म, एकाच थिएटरमध्ये इतका काळ चाललेली नाही. नाही म्हणायला ' बॉंबे टॉकीज 'ची ' किस्मत ' कलकत्त्याच्या रिगल थिएटरमध्ये १९२ आठवडे चालली होती.

## तामिळी अमजाद

प्रतिस्पर्धी प्रत्येकालाच निर्माण होत असतात. अगदी धर्मराजसुद्धा त्यातून सुटला नाही. फिल्म इंडस्ट्रीत तर स्पर्धेशिवाय कोणी जगूच शकत नाही. फक्त ही स्पर्धा कधी अप्रत्यक्षपणे चालू असते, तर कधी उघड उघड. ' शोले ' फेम अमजादलाही आता या स्पर्धेला तोंड द्यावं लागणार आहे.

कारण आता भारतातील फिल्म इंडस्ट्रीमध्ये आणखी एका अमजादचा उदय झाला आहे. हा अमजाद तामिळी चित्रपटांमधून काम करत असतो. तो दिसायला ' गब्बरसिंग 'सारखाच आहे. त्याच्यासारखेच कपडे घालतो, त्याच्यासारखाच चालतो, बोलतो आणि हसतोदेखील सध्या त्याच्या हातात व्हिलनच्या भूमिका असलेले अर्धा डझनहून अधिक चित्रपट आहेत. पुढे–मागे अमजादच्या एखाद्या रोलसाठी त्याचा उपयोग हिंदी फिल्मवाल्यांनाही करता येईल.

## असाही एक निर्माता !

कोट्यवधि रुपये कमावणारे आणि गमावणारे हिंदी चित्रपटनिर्माते आपल्या हाताखाली काम करणाऱ्या कर्मचारीवर्गाचा फारच क्वचित विचार करत असतात. त स्वतःसाठी दिवसाला हजार रुपये उडवतात, पण त्यांच्या स्टुडिओतल्या अकुशल कामगाराला दोन वेळचे जेवणसुद्धा मिळताना मुश्कील असते.

गुलशन राय आणि यश चोप्रा या हिंदी फिल्म इंडस्ट्रीतल्या दोघा बुजुर्गांनी मात्र नुकतंच एक स्वागतार्ह आणि अनुकरणीयही–कृत्य केलं. या दोघांनी ' नूरी ' नावाची एक लो–बजेट फिल्म काढली. सुदैवाने ती चालली चांगली.

आता या फिल्मपासून झालेला नफा लेखक–दिग्दर्शकापासून शेवटच्या कर्मचाऱ्यापर्यंत वाटून घेतला जाणार आहे. या फिल्मचे दिग्दर्शनही मनमोहन कृष्णन या यापूर्वी कधी मेगॅफोनही हातात न धरलेल्या माणसावर सोपवण्यात जालं होतं.

फिल्म इंडस्ट्रीतल्या इतरांनीही रात्रीच्या पार्टीतले पेग उतरल्यावर या मुद्द्याचा विचार करायला काय हरकत आहे ? फार तर त्यांना दोन पेग चढवावे लागतील ! □

इंग्रजी चित्रपट । सदानंद बोरसे

# Saturday Night Fever

## डोंगर पोखरून...

कोणत्याही कॉलेजच्या जवळ असलेल्या हॉटेलच्या अड्डयावर तो भेटू शकेल. हां, त्या उजवीकडच्या कोपऱ्यातल्या टेबलावर तोंडातून धूर काढत बसलेले चौघे आहेत ना, त्यात तो आहे किंवा दारात ते कोंडाळं उभं आहे ना लाइनी मारत, त्यातही तो आहे. थोडासा स्वतःमध्ये रमलेला; तरी बाकी-

ल्यांचे आपल्याकडे लक्ष आहे ना याबद्दल जागरूक असलेला. स्वत:ला पाहिजे तसे फुलपाखरी आयुष्य जगू इच्छिणारा, त्यामुळेच आईबापांच्या बारीकसारीक अटकाव्यांमुळे वैतागणारा, घरापासून दुरावलला आणि म्हणूनच मित्रांमध्ये अधिकाधिक रमलेला.

असा हा बहुतेक ठिकाणी भेटणारा तरुण म्हणजे 'Saturday Night Fever' चा नायक. तोही रमलेला आहे नृत्यात. झिंग आणणाऱ्या संगीताच्या ठेक्यावर उसळणारे, घुसळणारे, लवलवणारे टोनीचे शरीर त्या हॉलच्या मध्यभागी असलेल्या झगमगत्या स्टेजवर कित्येकांनी कौतुकभरल्या नजरेने पाहिले आहे. टोनीबरोबर काही क्षणांसाठी नृत्य करण्यात कृतार्थता मानणाऱ्या कित्येक तरुणी त्याच्या येण्याजाण्यावर नजर ठेवून असतात. एक दिवस मात्र टोनी स्वत:च अडकतो– एखाद्या मयूरीप्रमाणे डौलदार पावले टाकणाऱ्या स्टीफनचा पाटनर होण्यासाठी धडपडू लागतो. नेहमीप्रमाणे येथेही प्रेमाचा त्रिकोण आहेच. अखेर थोडेसे भांडण, थोडेसे वैफल्य असे नेहमीचे मैलाचे दगड मागे पडून टोनी व स्टीफनीच्या मनोमीलनाच्या धक्क्याला येऊन गाडी थांबते.

तरुण मन, त्याचे विश्लेषण इत्यादी विषय आता आपल्याला फारसे नवीन राहिलेले नाहीत, कदाचित नकोसे वाटतील इतका त्यांचा अतिरेकच झाला असेल. त्यामुळे या चित्रपटातील टोनी, त्याचे मित्र इत्यादींच्या व्यक्तिरेखा, सगळ्यांच्या वागण्यातील एक वरवरचा उथळ बेफामपणा, एखाद्या प्रसंगातून या सगळ्याबद्दल येणारा उबग, तरीही डोळ्यांपुढे दुसरे काही उद्दिष्ट नाही म्हटल्यावर वेळ घालविणे आणि मन (मारून) रमविणे यासाठी पुन्हा त्याच गोष्टींमध्ये रमणे इत्यादी गोष्टी फारशा मनाला भिडणार नव्हत्याच. शिवाय चित्रपटातही या गोष्टी तिसऱ्या पायरीवरच ठेवल्या आहेत. सहज जाताजाता डोळ्यांखालून फिरवलेल्या जिनसा एवढे आणि इतपत महत्त्व चित्रपटात या विश्लेषण वगैरे प्रकाराला आहे. अपवाद फक्त टोनीच्या एका मित्राचा. त्याच्याजवळ देखणे रूप नाही, रुबाबदार व्यक्तिमत्त्व नाही, सगळ्यांचे लक्ष वेधून घेईल अशी एखादी आकर्षक कला नाही, सगळ्यांपासून बाजूला एकटे राहून स्वत:त रमण्याचे धैर्य नाही. आहे ती फक्त आपल्यात असणाऱ्या या 'काही नाही' ची बोच, प्रचंड खंत. त्याचे अस्तित्व ही बाकीच्यांच्या दृष्टीनेही अतिशय नगण्य बाब आणि म्हणूनच आपण दुसऱ्यांच्या ध्यानात यावे यासाठी चाललेली त्याची केविलवाणी धडपड. (स्वत:चे खुजेपण लपवण्यासाठी अवांजवी उंच टाचांचे बूट घालण्याचा त्याचा बावळटपणा हाही या धडपडीतूनच आलेला) भेटेल त्या माणसाला त्याचे आपल्या बोलण्याकडे लक्ष आहे, नाही, त्याला आपली अडगळ होते आहे, नाही–याचा काहीही विचार न करता तो आपल्या नसलेल्या lady killer पणाच्या गोष्टी ऐकवणार कधीच न भेटलेल्या girl-friend च्या कहाण्या रचून सांगणार आणि स्वत: त्या खऱ्याच मानून त्यात रमणार. या सगळ्या नगण्यतेचा, आपण कुणीही नसल्याच्या न्यूनगंडाचा स्फोट त्याच्या शेवटच्या उन्मादात होतो. शेकडो फूट उंचावरच्या पुलाच्या वीतभर कठड्यावर बेहोष नृत्य करीत तो शेवटी मरण कवटाळतो. शेवटपर्यंत स्वत:ला काही तरी व्यक्तित्व देण्याच्या धडपडीत आपल्या अस्तित्वाचाही बळी देणारा हा टोनीचा मित्र अक्षरश: मनात घुसून राहतो.

चित्रपटाच्या दुसऱ्या पायरीवर आहे टोनी व स्टीफनीची ठरीव शिळ्या चाकोरीतील प्रेमकथा. प्रेमभावनेची स्थलकालव्यक्ति निरपेक्षता या प्रेमकथेने पुन्हा एकदा पटवून दिली. मला तर टोनी व स्टीफनीच्या जागी सतत कुणी एक धर्मेंद्र आणि कुणी एक हेमामालिनीच दिसत होते.

राहता राहिली चित्रपटाची बहुचर्चित पहिली पायरी. म्हणजे चित्रपटातील नृत्य आणि संगीत– बेफाम, बेफाट, भन्नाट, बेभान इत्यादी आणि इत्यादी. अगदी प्रेक्षकाला स्वत:ला विसरायला लावणारे, नाचायला लावणारे, चित्रपटाच्या जाहिरातीच्या शब्दांत सांगायचे तर 'Where do you go when the record is over ?' हे असे सगळे सगळे ऐकलेले असल्यामुळे सुरुवातीला मागून ऐकू येणारा प्रोजेक्टरच्या रिळांचा घरघराटही मला तालबद्ध, नशा आणणारा वगैरे वाटायला लागला. पडद्यावर टोनीचा पाय घसरला तरी मला ते त्याचे नृत्यपदन्यासकौशल्य वाटायला लागले आणि आपल्या कानांना तो घरघराट वाटतोय किंवा आपल्या डोळ्यांना पाय घसरल्याचे वाटले याचा अर्थ आपल्याच कानांमध्ये आणि डोळ्यांमध्ये दोष आहे, अशी मी बराच वेळ माझ्या मना सज्जनाची समजूत घालत होतो; पण पुढे पुढे हे समजूत घालणे व्यर्थ ठरले. चित्रपटाचे संगीत खरोखरच उन्मादक नसले तरी उत्तेजक, पायांना सहज ताल देईल असे आहे; पण संपूर्ण दोन तासांच्या चित्रपटात सुमारे एक तास पंचेचाळीस मिनिटे हे संगीत 'पार्श्व' म्हणून, कोपऱ्यातले संगीत बनून लांब बाजूला उभे असते. उरलेल्या वेळात नृत्यस्पर्धेची सुमारे सातआठ मिनिटे वगळल्यास प्रेक्षकाच्या डोळ्यांवर बलात्कार करणारी पडद्यावरील मारवाडी भडक हिरव्या, तांबड्या, निळ्या, पिवळ्या दिव्यांची गलिच्छ उघडझाप आणि नृत्य या नावाखाली चाललेल्या डोंबारी हालचाली या संगीताची सगळी चवच घालवून टाकतात. या डोंबारी नृत्याचा एक स्वच्छंद, प्रत्ययकारी आविष्कार पाहायचा असल्यास टोनीचे एकट्याचे नृत्य पाहावे. (त्याला डोंबारी नृत्य म्हणणे हा डोंबाऱ्यांचा अपमान आहे; कारण त्यांच्या कसरती खेळातसुद्धा एक दिलफेक लय असते.) केसाच्या टोकापासून पायाच्या नखापर्यंत सतत peristaltic movement सारख्या लाटा पाठविणे, मधूनच आकडी भरल्याप्रमाणे उसळी मारणे, बेडूकउड्या मारणे वा लंगडी घालणे या सगळ्यांमधून टोनीच्या हाडांचा, स्नायूंचा लवचिकपणा, पाहिजे तेव्हा पाहिजे तो स्नायू हलविण्याची हातोटी आणि एकूण जिम्नॅस्टिक्समधील कौशल्य प्रगट होत असले, तरी 'नृत्य' नावाची एक कला मात्र लोळागोळा होऊन थंड पडलेली असते. आपल्या गणपतिविसर्जनाच्या मिरवणुकीतील रोंबासोंबाचा पाया घालणारे भगवान–गीताबालीचे 'अलबेला'-मधील नाचणेसुद्धा या टोनी–नृत्यापेक्षा किती तरी पट अधिक मादक आणि आकर्षक आहे.

याउलट दोन जोड्यांनी सादर केलेली नृत्यस्पर्धा हा प्रकार तितकाच आकर्षक आणि सुरेख होता. त्यातही टोनी आणि स्टीफनी नृत्यामध्ये धुंद होऊन उत्कटतेने एकमेकांचे चुंबन घेतात, तो प्रकार (त्या वेळी टाकलेला मळकट धूसर निळा प्रकाश सोडल्यास) सुरेख आणि दोघांच्याही नृत्याला असलेल्या ताल आणि लयीबरोबर एक वेगळा जिवंतपणा आणि आवेग देणारा; पण हा नृत्यस्पर्धेचा अपवाद सोडल्यास संपूर्ण चित्रपटभर संगीताचा श्राव्य परिणाम चित्रपटाच्या दृश्य भागाने पार बेसुरा करून टाकलेला.

चित्रपटाच्या या संगीत व नृत्य भागाबद्दलच विलक्षण उत्सुकता होती. बाकी चित्रपटात फारसा अर्थही नाही; पण हा संगीतनृत्याचा डोंगर पोखरून शेवटी तीनचार मिनिटांच्या या नृत्यस्पर्धेचा उंदीर बाहेर पडतो. ☐